

विशेष वृत्त
पृष्ठ 26-47

वर्ष: 7 अंक: 07

1-15 ऑक्टोबर, 2026 (निःशुल्क)

न्यू इंडिया समाचार

भारताची दूरदृष्टी बनली जागतिक मिशन

भारताने 'मानवता प्रथम, लोक-केंद्रित विकास' या भावनेने विश्व बंधुत्वाचा नवीन अध्याय सुरू करत18 व्या ब्रिक्स शिखर परिषदेत (2026) दिला संदेश - समावेशक विकास तोच जो प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचतो...

आम्हाला फॉलो करा @NISPIBIndia



भारतीय हवाई दल दिन | 94 वा वर्धापन दिन (8ऑक्टोबर, 2026)

'शौर्य आणि पराक्रमाचे प्रतीक'

भारतीय हवाई दल

भारतीय हवाई दल हे प्रत्येक नागरिकासाठी अभिमानाचे प्रतीक आहे. राष्ट्राचे संरक्षण असो किंवा आपत्तीच्या वेळी जीव वाचवणे असो, आपले शूर सैनिक नेहमीच धैर्य आणि निष्ठेने आघाडीवर उभे राहतात. इतकेच नाही, तर आपल्या सामर्थ्याने आणि प्रत्येक आव्हानाला सामोरे जाण्याच्या सज्जतेने या दलाने राष्ट्राला सातत्याने अभिमान मिळवून दिला आहे. उत्कृष्ट सेवा आणि बलिदानाद्वारे हवाई क्षेत्राची सुरक्षा सुनिश्चित करणाऱ्या भारतीय हवाई दलाच्या शौर्याचा, वचनबद्धतेचा आणि निष्ठेचा प्रत्येक नागरिकाला वाटतो अभिमान...





भारतीय हवाई दल हे शौर्य, शिस्त आणि अचूकतेचे प्रतीक आहे. अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीतही त्यांनी आपल्या आकाशाचे रक्षण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. नैसर्गिक आपत्तींच्या काळातही त्यांची भूमिका अत्यंत प्रशंसनीय राहिली आहे. त्यांची वचनबद्धता, व्यावसायिक कौशल्ये आणि अदम्य धैर्य प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटायला लावतात. **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



न्यू इंडिया
समाचार

वर्षः 7, अंकः 07 । 1-15 ऑक्टोबर, 2026

मुख्य संपादक
धीरेन्द्र ओझा
प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

मुख्य सल्लागार संपादक
संतोष कुमार

वरिष्ठ सहाय्यक सल्लागार संपादक
पवन कुमार

सहाय्यक सल्लागार संपादक
अखिलेश कुमार
चन्दन कुमार चौधरी

भाषा संपादन
सुमित कुमार (इंग्रजी)
रजनीश मिश्रा (इंग्रजी)
नदीम अहमद (उर्दू)

सीनियर डिझायनर
फूलचंद तिवारी

डिझायनर
सत्यम सिंह
अनिल कुमार



13 भाषांमध्ये उपलब्ध असलेले न्यू इंडिया समाचार वाचण्यासाठी क्लिक करा...

https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

न्यू इंडिया समाचारचे जुने अंक वाचण्यासाठी क्लिक करा...

https://newindiasamachar.pib.gov.in/archive.aspx

न्यू इंडिया समाचारविषयक सततच्या अपडेटसाठी फॉलो करा: : @NISPIBIndia

आतील पानांवर...

भारताच्या नेतृत्वाखाली मानवतेचा आदर्श बनली ब्रिक्स 2026



मुखपृष्ठ कथा

भारत पहिल्या दिवसापासून ब्रिक्सच्या प्रवासाचा एक भाग राहिला आहे आणि आज पृथ्वीवरील प्रत्येक दुसरा माणूस ब्रिक्स देशात राहतो. नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे संपन्न झालेल्या 18 व्या ब्रिक्स शिखर परिषदेने ब्रिक्सच्या प्रवासाची 20 वर्षे साजरी केली. भारताने 2026 मध्ये चौथ्यांदा अध्यक्षपद स्वीकारले आणि 'नवी दिल्ली जाहीरनाम्या' द्वारे ब्रिक्सला दिली एक नवीन, अधिक प्रभावी मानवतावादी दिशा... | 6-25



आपल्या सुशासनाच्या प्रारूपामुळे प्रथम गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि आता 12 वर्षांपासून पंतप्रधान म्हणून देत आहेत देशाला एक नवी दिशा... गुजरातमध्ये 7 ऑक्टोबर 2001 रोजी त्यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आणि तेव्हापासून त्यांच्या अविरत सेवेच्या आणि समर्पणाच्या प्रवासाला 25 वर्षे पूर्ण झाली आहेत. सादर आहे एक विशेष वृत्तांत... | 26-47

यूपीआय... एका सभ्यतेची कहाणी
पंतप्रधान मोदींच्या हस्ते मुंबईत 'ग्लोबल फिनटेक फेस्ट 2026' चे उद्घाटन | 48-49

मालवाहतूक मार्गिका: विकसित होणारी भारताची जीवनरेखा
पीएम मोदींनी गुजरातला दिले 35,000 कोटी रुपयांचे नजराणे | 50-51

खरी शक्ती... ज्ञानातून जागृतीकडे आणि जागृतीतून परिवर्तन
पंतप्रधान मोदींनी राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेत्यांना दिला मंत्र | 52-53

रेल्वे कनेक्टिव्हिटीचा विस्तार, ईपीएफओची वेतन सीमा आता 25 हजार
केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत झाले अनेक महत्वपूर्ण निर्णय | 54-55

अंतराळ संशोधनाचा मंत्र सहकार्य आहे, संघर्ष नव्हे.
आंतरराष्ट्रीय अंतराळ शिखर परिषदेतील पंतप्रधान मोदींचे भाषण | 56

'नशामुक्त भारत' संकल्प, 2029 पर्यंत होणार साकार
गृहमंत्री अमित शाह म्हणाले- देश 2029 पर्यंत होईल 'नशामुक्त भारत' | 57

भारताची प्राचीन प्रतिभा, फ्रान्सच्या आधुनिक अभियांत्रिकीचा संगम
पीएम मोदींनी पॅरिसमध्ये स्वामीनारायण मंदिराचे केले लोकार्पण | 58-59

व्यक्तिमत्व : तिरुप्पुर कुमारन
ज्यांनी खाली पडू नाही दिला राष्ट्रध्वज | 60

एसआरसीसी शताब्दी समारंभ

140 कोटी भारतीय मिळून... भारताला बनवतील विकसित आणि आत्मनिर्भर



दिल्ली विद्यापीठाच्या श्रीराम कॉलेज ऑफ कॉमर्सच्या शताब्दीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, 140 कोटी देशवासी मिळून भारताला बनवतील विकसित आणि आत्मनिर्भर... | 4-5

प्रकाशक: कंचन प्रसाद, महासंचालक, सीबीसी (केंद्रीय संचार ब्युरो)। **पत्रव्यवहार आणि ईमेल साठी पत्ताः** खोली क्रमांक 1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली-110003. **ईमेल- response-nis@pib.gov.in आर. एन. आय. नंबर DELHIN/2020/78812**

संपादकांच्या लेखणीतून...

भारताच्या नेतृत्वाखाली ब्रिक्सचा नवा अध्याय

सादर नमस्कार

ब्रिक्सच्या 20 व्या वर्धापनदिनी भारताचे या समूहाचे चौथे अध्यक्षपद हे एक ऐतिहासिक संधी घेऊन आले. प्रमुख उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमध्ये आर्थिक धोरणांचा समन्वय साधण्यासाठी ब्रिक्स एक महत्त्वाचे व्यासपीठ म्हणून उदयास आले आहे. जगातील अकरा उदयोन्मुख अर्थव्यवस्था जागतिक प्रशासनाच्या मुद्द्यांवर समान दृष्टिकोन तयार करतात. तसेच ते 'ग्लोबल साउथ'ची उद्दिष्टे पुढे नेण्यासाठीही एक प्रभावी माध्यम बनले आहे.

'लवचिकता, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वत विकासासाठी उभारणी' या संकल्पनेवर आधारित परिषदेत भारताने जागतिक स्तरावर विकसनशील देशांच्या प्राधान्यक्रमांवर प्रकाश टाकला. जटिल भू-राजकीय परिस्थिती असूनही भारताने संतुलित, सर्वसमावेशक, विकास-केंद्रित आणि लोक-केंद्रित दृष्टिकोन कायम ठेवत सदस्यांमध्ये प्रमुख मुद्द्यांवर यशस्वीपणे सहमती घडवून आणली.

भारताने हे व्यासपीठ सरकारी सीमांच्या पलीकडे विस्तारले आहे आणि त्याला सामान्य नागरिक, शेतकरी, उद्योजक, महिला आणि तरुणांपर्यंत पोहोचवले आहे. देशभरातील 30 हून अधिक शहरांमध्ये आयोजित केलेल्या 400 हून अधिक बैठका 'लोककेंद्रित' आणि 'मानवता प्रथम' या दृष्टिकोनाला केवळ एक घोषणा न ठेवता, एक कार्यपद्धती बनवण्याच्या भारताच्या वचनबद्धतेची साक्ष देतात.

12-13 सप्टेंबर 2026 रोजी नवी दिल्लीत आयोजित 18 वी ब्रिक्स शिखर परिषद या प्रवासाचा कळस होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक प्रशासनातील सुधारणांवर भर दिला आणि 'विशेषाधिकारांच्या पिरॅमिड'चे 'भागीदारीच्या व्यासपीठात' रूपांतर करण्याचे आवाहन केले. एकमताने स्वीकारलेल्या नवी दिल्ली जाहीरनाम्यात दहशतवादाविरोधात शून्य सहनशीलता, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतील सुधारणा आणि ग्लोबल साऊथमधील देशांचा आवाज बळकट करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करण्यात आला.

भारताचे अध्यक्षपद ही केवळ एक राजनैतिक जबाबदारी नसून जागतिक बहुध्रुवीयतेच्या दिशेने टाकलेले एक ठोस पाऊल आहे आणि हीच या अंकाची मुखपृष्ठ कथा आहे. शिवाय, हा एक सुखद योगायोग आहे की एकीकडे ब्रिक्सचे अध्यक्षपद भूषवणाऱ्या भारताने जगाला मानवतेचा संदेश दिला आहे, तर दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळाची 25 वर्षे पूर्ण होत आहेत. हा 25 वर्षांचा प्रवास या अंकात एक विशेष वृत्तांत म्हणूनही सादर करण्यात आला आहे.

याव्यतिरिक्त, व्यक्तिमत्व विभागात राष्ट्रध्वज खाली पडू न देणारे तिरुप्पूर कुमारन, केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पंधरवडाभरातील कार्यक्रमांचा समावेश आहे.

या मासिकात 8 ऑक्टोबर रोजी साजऱ्या होणाऱ्या हवाई दल दिनानिमित्त आतल्या पानावर विशेष मजकूर आणि 15 ऑक्टोबर रोजी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त कृतज्ञ राष्ट्राने वाहिलेली आदरांजली मागच्या पृष्ठावर आहे.

कृपया आम्हाला तुमच्या सूचना पाठवत राहा.

(धीरेन्द्र ओझा)

हिंदी, इंग्रजी व इतर 11 भाषांमध्ये उपलब्ध अंक वाचा/डाऊनलोड करा.
https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

आपली मते...





विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण आहे हे पाक्षिक

मला ईमेलवर 'न्यू इंडिया समाचार' अंक नियमितपणे मिळतो. सरकारी उपक्रम, योजना आणि चालू घडामोडींविषयी माहिती प्रसारित करण्यासाठी हे एक मौल्यवान माध्यम आहे. हे विद्यार्थी, संशोधक आणि सर्वसामान्य लोकांसाठी खूप महत्त्वाचे आहे.

nikhil4249@gmail.com

विकास आणि परिवर्तनात्मक कार्यांविषयी मिळते माहिती

मी 'न्यू इंडिया समाचार'च्या संपूर्ण संपादकीय चमूचे मनःपूर्वक कौतुक करतो. हे एक अत्यंत माहितीपूर्ण आणि उपयुक्त प्रकाशन आहे. एक नियमित वाचक म्हणून मला हे पाक्षिक संपूर्ण भारतात सुरू असलेल्या महत्त्वपूर्ण विकास आणि परिवर्तनात्मक कार्यांविषयक माहितीचा एक मौल्यवान स्रोत वाटतो.

michaelbks@gmail.com

स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आणि लेखनकामांसाठी होते सहाय्य

मी कर्नाटक राज्याच्या बागलकोट जिल्ह्यात राहणारा एक विद्यार्थी आणि लेखक आहे. मी माझ्या अभ्यासासाठी, स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आणि लेखनाच्या कामांसाठी 'न्यू इंडिया समाचार' हा अंक नियमितपणे वाचतो. माहितीचा खजिना असलेले हे एक उत्कृष्ट पाक्षिक आहे.

rahimanpoetry@gmail.com

मिळते भरपूर सारी माहिती

'न्यू इंडिया' समाचार अंक उत्कृष्ट असतो. मी त्याचा प्रत्येक अंक वाचतो. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या परदेश दौऱ्यांबद्दल आणि परराष्ट्र धोरणाबद्दल जाणून घेण्यासाठी मी नेहमीच उत्सुक असतो. मी ते ऑनलाइन वाचतो. त्यातून मला भरपूर माहिती मिळते.

ashishprabhatmishra@gmail.com

भारताचा विकास, नियोजन आणि बदलता चेहरा यांचा मार्गदर्शक

मी एका स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहे. याच काळात मला न्यू इंडिया' समाचारबद्दल समजले. माझ्या लक्षात आले की, हे केवळ एक नियतकालिक नसून भारताचा विकास, नियोजन आणि बदलता चेहरा यांवरील एक मार्गदर्शक आहे. हे पाक्षिक वाचकांसाठी ज्ञानाचा खजिना आहे.

सुनील कुमार बोहरा

bohramadawas@gmail.com

पत्रव्यवहार आणि ईमेल साठी पत्ताः खोली क्रमांक -1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली- 110003

ईमेल- response-nis@pib.gov.in



140 कोटी भारतीय मिळून...

भारताला बनवू विकसित आणि आत्मनिर्भर

भारताचा जलद विकास आणि मजबूत अर्थव्यवस्था हे सिद्ध करते की देशाने आता आपला आळस झटकून गतिमान पद्धतीने निर्णय घेतले आहेत. जागतिक अस्थिरतेच्या काळातही देशाचा 7.8% विकास दर हा त्याच्या आर्थिक सामर्थ्याचा पुरावा आहे. दिल्ली विद्यापीठाच्या श्रीराम कॉलेज ऑफ कॉमर्सच्या शताब्दीनिमित्त 5 सप्टेंबर रोजी आयोजित एका कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की 140 कोटी देशबांधव एकत्र येऊन भारताला बनवतील विकसित आणि आत्मनिर्भर...

जेव्हा एखादी संस्था आपली 100 वर्षे पूर्ण करते, तेव्हा ती अगणित यश आणि प्रेरणांचा महासागर बनते. श्रीराम कॉलेज ऑफ कॉमर्सची (एसआरसीसी) 100 वर्षांतील ऐतिहासिक कामगिरी ही देश आणि शिक्षणक्षेत्र या दोघांसाठीही अभिमानाची बाब आहे. दर्यागंजमधील एका छोट्या इमारतीपासून एका प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थेपर्यंत पोहोचलेल्या या महाविद्यालयाच्या प्रवासाचा उल्लेख करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, या महाविद्यालयाने अनेक पिढ्यांचे भविष्य घडवले आहे. आज या महाविद्यालयाच्या नावातच एक विशेष सन्मानाची भावना जाणवते. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, "आजही दिल्ली विद्यापीठात आपण एसआरसीसीचे आहोत, असे नुसते म्हणणे हीच एक अभिमानाची बाब आहे."

महाविद्यालयाच्या समृद्ध वारशाची प्रशंसा करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की येथील विद्यार्थ्यांनी अनेक क्षेत्रांमध्ये संस्थेला जागतिक स्तरावर गौरव मिळवून दिला आहे. दिवंगत अरुण जेटली आणि संजीव सन्याल यांसारख्या नामांकित माजी विद्यार्थ्यांसोबत काम करण्याच्या आपल्या वैयक्तिक अनुभवांचे स्मरण करून ते म्हणाले की या महाविद्यालयाचे पदवीधर कलाकार, राजकारणी आणि न्यायाधीश म्हणून देशाची सेवा करत आहेत.

भूतकाळातील आव्हानांची आजच्या यशांशी तुलना करताना पंतप्रधान मोदींनी यावर भर दिला की दहशतवादाचा पराभव झाला असून सशस्त्र दले आता शत्रूच्या घरात घुसून कडवा प्रहार करत आहेत. जम्मू आणि काश्मीरपासून ईशान्येकडे शांतता प्रस्थापित झाली आहे. आज संपूर्ण जग भारताच्या धोरणात्मक गतिशीलतेचे आणि सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून कौतुक करत आहे.

आयातदारापासून निर्यातदार झाला...

'मेक इन इंडिया' उपक्रमाच्या यशामुळे देश एका प्रमुख आयातदारापासून जगातील अग्रगण्य निर्यातदार होण्यात यशस्वी झाला आहे. स्मार्टफोनची निर्यात 25 लाख कोटी रुपयांच्या पुढे गेली आहे, तर स्वदेशी संरक्षण उत्पादनाने जवळपास 2 लाख कोटी रुपयांचा विक्रमी टप्पा गाठला आहे. 2013-14 मध्ये संरक्षण निर्यात केवळ 600-700 कोटी रुपये होती, ती आता 40,000 कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे.

दृढ आणि अढळ संकल्प...

युवाशक्तीवर आणि 140 कोटी देशवासियांच्या क्षमतेवर अखंड विश्वास व्यक्त करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समृद्ध, आत्मनिर्भर आणि विकसित भारतासाठी एक आराखडा सादर केला. भविष्यातील प्रमुख उद्दिष्टांचा उल्लेख करताना ते म्हणाले की कृषी निर्यातीचे जागतिक केंद्र बनणे, स्वतःचे अंतराळ स्थानक स्थापन करणे आणि ऑलिम्पिक खेळांचे आयोजन करणे, हे भारताचे ध्येय आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले, "हे केवळ शब्द नाहीत, हा आमचा दृढ आणि अढळ संकल्प आहे."



एसआरसीसीच्या शताब्दी सोहळ्यासाठी मेट्रो रेल्वेने प्रवास करून पोहोचले पंतप्रधान मोदी, बालकांशी साधला संवाद.

भारतीयांनी करावे जगाचे नेतृत्व ...

21 व्या शतकातील तरुणाईच्या महत्त्वाकांक्षी विचारसरणीमुळेच आपले तरुण स्टार्टअप्स आणि युनिकॉर्नसारख्या क्षेत्रांमध्ये जगात अग्रेसर बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहेत. तरुण पिढीने आधीच्या पिढ्यांपेक्षाही मोठी स्वप्ने पाहिली पाहिजेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की आज जेव्हा भारतीय जगातील आघाडीच्या कंपन्यांचे नेतृत्व करत आहेत तर भारतीयांनी स्थापन केलेल्या कंपन्या संपूर्ण जगाचे नेतृत्व का करू शकत नाहीत?

माझा विश्वास आहे... आपण 140 कोटी भारतीय मिळून आपल्या देशाला विकसित बनवू... आत्मनिर्भरही बनवू. मी लहान आणि सोपी ध्येये घेऊन चालणारा माणूस नाही. मी देशासाठी मोठी ध्येये ठेवतो आणि ती साध्य करण्यासाठी माझे सर्वस्व पणाला लावतो.

– नरेंद्र मोदी, पंतप्रधान



पश्चिम आशियातील युद्ध आणि जागतिक व्यापारातील व्यत्ययांच्या काळातही 7.8 टक्के तिमाही विकास दर गाठणे, हे भारताचे अंगभूत सामर्थ्य दर्शवते.

टीकाकारांना या आकड्यांनी दिले उत्तर

टीका करणाऱ्यांना उत्तर देण्यासाठी ठोस आर्थिक आकडेवारी सादर करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की एप्रिल ते जून दरम्यान वीज निर्मितीत 9 टक्के वाढ झाली, तर एकूण वाहनांच्या विक्रीत 20 टक्क्यांहून अधिक वाढ झाली, ज्यात दुचाकींच्या विक्रीतील 20% आणि तीनचाकींच्या विक्रीतील जवळपास 30% वाढीचा समावेश आहे. त्यांनी युक्तिवाद केला की पोलाद आणि सिमेंटच्या वापरामध्ये झालेली 8% वाढ ही बांधकाम, गृहनिर्माण आणि व्यावसायिक क्षेत्रांमधील जलद विस्तार दर्शवते. मार्च 2014 पर्यंत भारतातील निम्म्याहून अधिक लोकसंख्येकडे बँक खाते नव्हते, तर आज जन धन योजनेच्या माध्यमातून जवळपास 60 कोटी नागरिक बँकिंग प्रणालीशी जोडले गेले आहेत. ■

पीएम मोदी यांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी स्कॅन करा.

भारताच्या नेतृत्वाखाली मानवतेचा आदर्श बनली ब्रिक्स 2026



भारत पहिल्या दिवसापासून ब्रिक्सच्या कहाणीचा एक भाग राहिला आहे. आज पृथ्वीवरील प्रत्येक दुसरी व्यक्ती ब्रिक्स देशात राहते. हा समूह जगाच्या जवळपास 50% लोकसंख्येचे, 40% जीडीपीचे आणि 25% पेक्षा जास्त व्यापाराचे प्रतिनिधित्व करतो. गेल्या 20 वर्षांत जागतिक अर्थव्यवस्था अडीच पटीने वाढली आहे, तर ब्रिक्स देशांचा एकत्रित जीडीपी साडेचार पटीने वाढला आहे. यावर्षी 12-13 सप्टेंबर 2026 रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित 18 व्या ब्रिक्स शिखर परिषदेत ब्रिक्सच्या प्रवासाची 20 वर्षे साजरी करण्यात आली. 2026 मध्ये चौथ्यांदा अध्यक्षपद स्वीकारताना भारताने "लवचिकता, नावीन्य, सहकार्य आणि शाश्वत विकासासाठी उभारणी" ही संकल्पना स्वीकारली. हाच तो मंत्र आहे जो गेल्या 12 वर्षांपासून भारताच्या आर्थिक धोरणाचा आधार राहिला आहे. वाढत्या व्यापारी अडथळ्यांच्या पार्श्वभूमीवर, भारत आर्थिक सेतू आणि विश्वासाचे प्रतीक बनला आहे आणि 'नवी दिल्ली जाहीरनाम्याद्वारे त्याने ब्रिक्सला दिली आहे एक नवी, अधिक प्रभावी मानवतावादी दिशा...



18 व्या ब्रिक्स शिखर परिषदेचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.



नवीन भारत जागतिक अनिश्चिततेच्या काळात वाढ आणि स्थैर्याची खात्री देत आहे. आज जगभरात व्यापारातील अडथळे वाढत असताना भारत आर्थिक सेतू उभारत आहे. संयुक्त राष्ट्र असो, जी-20 असो किंवा इतर प्रभावशाली गट असोत, भारत आज जागतिक संस्थांचे नेतृत्व करताना वसुधैव कुटुंबकम् या भावनेने जगाला नवा आकार आणि नवी दिशा देत आहे. याच पार्श्वभूमीवर ब्रिक्स 2026 चे अध्यक्षपद सांभाळताना भारताने जगाला स्पष्ट संदेश दिला आहे की, जर आपले भविष्य सामायिक असेल, तर त्याच्या निर्मितीचा अधिकारही सामायिक असला पाहिजे. भारताच्या दूरदृष्टीचाच परिणाम म्हणून आज ब्रिक्स देश जागतिक नवोन्मेष आणि उपाययोजनांची महत्त्वपूर्ण केंद्रे बनत आहेत. नवी दिल्ली येथे आयोजित ब्रिक्स शिखर परिषद 2026 ने जगातील आव्हानांना मानवकेंद्रित दृष्टीकोनातून उत्तर देण्याचा मार्ग दाखविला.

आज जग एकाच वेळी विविध आघाड्यांवर वेगवेगळ्या आव्हानांना सामोरे जात आहे; मग ते हवामान संकट असो, जागतिक पुरवठा साखळीतील अडथळे असोत किंवा बहुपक्षीय संस्थांची मंद कार्यपद्धती असो. अशा काळात ब्रिक्ससारख्या मंचाची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. आज ब्रिक्स केवळ आर्थिक चर्चांपुरता मर्यादित राहिलेला नाही; तर जागतिक प्रशासन सुधारणेपासून ते तंत्रज्ञान, आरोग्य, शिक्षण आणि हवामान या सर्व क्षेत्रांत ठोस आणि निर्णायक पुढाकार घेत आहे. भारत हा

> *“भारताने ब्रिक्सच्या मंचावरून मैत्री, सहभाग आणि सहकार्याला पुढे नेले आहे. आमचा प्रयत्न असा राहिला आहे की ब्रिक्स सहकार्य केवळ सरकारांपुरते मर्यादित राहू नये. आपले नवोद्योजक, शेतकरी, संशोधक, महिला, युवा आणि सामान्य नागरिकही त्याचे सक्रिय भागीदार व्हावेत.*
>
> **–नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

ब्रिक्सचा संस्थापक सदस्य आहे आणि त्याने आतापर्यंत 2012, 2016, 2021 आणि 2026 मध्ये चार वेळा अध्यक्षपद भूषवले आहे. प्रत्येक अध्यक्षपदाच्या कालावधीत भारताने या मंचाला नवी दिशा दिली आहे.

भारताने 2026 अध्यक्षता काळात लवचिकता, नवोन्मेष, सहकार्य आणि सातत्याने विकास हे चार स्तंभ निश्चित केले होते. ही संकल्पना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2025 मध्ये ब्राझीलमधील रिओ दी जनेरियो येथे झालेल्या 17व्या ब्रिक्स शिखर परिषदेत मांडली होती.

ब्रिक्स म्हणजे अर्धे जग, 40 टक्के ताकद

सदस्य देश	11 (ब्राझील, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका, इजिप्त, इथिओपिया, इंडोनेशिया, इराण, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती)
ब्रिक्स + भागीदार देश (संपूर्ण परिवार)	21 देश
जागतिक लोकसंख्येतील हिस्सा	सुमारे 50%
जागतिक जीडीपी मधील हिस्सा	सुमारे 40%
जागतिक व्यापारातील हिस्सा	सुमारे 25 %
मागील 20 वर्षांतील जागतिक जीडीपी वाढ	सुमारे अडीच पट
याच कालावधीत ब्रिक्स देशांच्या संयुक्त जीडीपीमध्ये झालेली वाढ	सुमारे साडेचार पट
भारताच्या अध्यक्षतेत आयोजित बैठका/कार्यक्रम	400 पेक्षा अधिक
या बैठकींचे यजमान पद भूषवलेली भारतीय शहरे	30 पेक्षा अधिक
ब्रिक्स महिला व्यापार आघाडी बैठक (भारत, 2026) मध्ये सहभागी झालेले महिला व्यावसायिक नेतृत्व	सुमारे 200

भारताचा अध्यक्षपदाचा कालावधी जनकेंद्रित आणि मानवता प्रथम या दृष्टीकोनावर आधारित होता. याच विचाराला भारताने आपल्या अध्यक्षतेच्या काळात प्रत्यक्ष कार्यक्रमांमध्ये रूपांतरित केले. यासाठी आर्थिक आणि सामाजिक लवचिकता मजबूत करण्यापासून ते डिजीटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या नव्या तंत्रज्ञानाची परस्पर देवाणघेवाण करण्यावर भर देण्यात आला. भारताच्या अध्यक्षतेसाठी तयार करण्यात आलेला ब्रिक्स इंडिया 2026 चे ओळख चिन्ह देखील याच भावनेचे प्रतीक आहे. या चिन्हातील फुलाच्या पाकळ्या सर्व ब्रिक्स सदस्य देशांचे तजेलदार रंग दर्शवतात. त्या त्यांच्या सामूहिक शक्ती आणि एकतेला अधोरेखित करतात. मध्यभागी असलेला 'नमस्कार' भारताची आत्मीयता, सन्मान आणि सुसंवादी सहकार्याची भावना दर्शवतो. त्याचबरोबर चिन्हामध्ये ब्रिक्सचे तीन प्रमुख स्तंभ सूक्ष्मपणे दाखवले आहेत; राजनैतिक - सुरक्षा सहकार्य, आर्थिक - वित्तीय भागीदारी, .लोकांमधील परस्पर संपर्क



अकरा देश, एक मंच असा घडला ब्रिक्स

ब्रिक्स हा जगातील 11 प्रमुख उदयोन्मुख बाजारपेठा आणि विकसनशील देशांचा समूह आहे. यामध्ये ब्राझील, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका, इजिप्त, इथिओपिया, इंडोनेशिया, इराण, सौदी अरेबिया



आणि संयुक्त अरब अमिराती यांचा समावेश आहे. हा समूह जागतिक आणि प्रादेशिक महत्त्वाच्या समकालीन विषयांवर सल्लामसलत आणि सहकार्य करण्यासाठी एक प्रभावी मंच म्हणून कार्य करतो. या मंचाची पायाभरणी 2006 मध्ये न्यूयॉर्क येथे संयुक्त राष्ट्र महासभेच्या निमित्ताने झालेल्या पहिल्या ब्रिक (BRIC) परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत झाली. मात्र ब्रिक (BRIC) हे संक्षिप्त नाव वर्ष 2001 मध्ये गोल्डमन सॅक्स यांनी प्रकाशित केलेल्या जागतिक अर्थशास्त्र विषयक निबंध "द वर्ल्ड नीड्स बेटर इकॉनॉमिक ब्रिक्स (BRICs)" मध्ये पहिल्यांदा वापरण्यात आले होते. या निबंधात इकॉनॉमेट्रिक विश्लेषणाच्या आधारे असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता की ब्राझील, रशिया, भारत आणि चीन हे पुढील पाच दशकांत जगातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये सामील होतील. या देशांची वाढती आर्थिक शक्ती आणि तीन खंडांमध्ये पसरलेली त्यांची व्यापक भौगोलिक उपस्थिती यामुळे त्यांचे उदयोन्मुख जागतिक महत्त्व ठळकपणे मांडण्यात आले. यानंतर ब्रिक ही संकल्पना एका औपचारिक समूहात विकसित झाली. वर्ष 2006 मध्ये या समूहाच्या स्थापनेनंतर तीन वर्षांनी, 2009 मध्ये रशियातील येकातेरिनबर्ग येथे त्याची पहिली शिखर

> *आज जेव्हा जगात व्यापारातील अडथळे वाढत आहेत, तेव्हा भारत आर्थिक सेतू उभारत आहे. 2014 नंतर आम्ही जगातील सुमारे 40 देशांसोबत मुक्त व्यापार करार केले आहेत. ब्रिक्स मध्येही आमचा प्रयास अडथळे कमी करण्याचा आणि व्यवसायासाठीच्या संधींमध्ये वाढ करण्याचा आहे.*
>
> **–नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

परिषद आयोजित करण्यात आली. 2010 मध्ये दक्षिण आफ्रिकेला या समूहात सामील करण्याबाबत सहमती झाली आणि 2011 मध्ये सान्या शिखर परिषदेनंतर दक्षिण आफ्रिकेच्या प्रवेशासह या समुहाला ब्रिक्सचे औपचारिक रूप आले. गेल्या तीन वर्षांत या परिवाराचा विस्तार वेगाने झाला आहे.


टाइमलाइन - 20 वर्षांचा प्रवास, भारताचे चार अध्यक्षता कालावधी (2006-2026)

2006	ब्रिकची स्थापना	न्यूयॉर्क येथे संयुक्त राष्ट्र महासभेच्या निमित्ताने ब्रिक परराष्ट्र मंत्र्यांची पहिली बैठक
2009	पहिली शिखर परिषद	रशियातील येकातेरिनबर्ग येथे आयोजित
2011	ब्रिक्सचा जन्म	दक्षिण आफ्रिका सामील झाल्यानंतर ब्रिकचे ब्रिक्स मध्ये रूपांतर झाले (सान्या शिखर परिषद)
2012	भारताचे पहिले अध्यक्षपद	नवी दिल्ली येथे चौथी शिखर परिषद. विषय - 'जागतिक स्थैर्य, सुरक्षा आणि समृद्धीसाठी BRICS भागीदारी' अशी दिल्ली घोषणा स्वीकारण्यात आली
2016	भारताचे दुसरे अध्यक्षपद	गोवा येथे 8 वी शिखर परिषद. विषय - 'जबाबदार, समावेशक आणि सामूहिक उपाययोजनांची निर्मिती' गोवा घोषणा आणि बिमस्टेक आउटरीच आयोजित करण्यात आले
2021	भारताचे तिसरे अध्यक्षपद	नवी दिल्ली येथे 13 वी शिखर परिषद. विषय - 'ब्रिक्स@15 - सातत्य, एकीकरण आणि सर्वसंमतीसाठी सहकार्य' नवी दिल्ली घोषणा स्वीकारण्यात आली
2024	विस्ताराचा पहिला टप्पा	इजिप्त, इथिओपिया, इराण, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती पूर्ण सदस्य बनले
2025	विस्ताराचा दुसरा टप्पा	इंडोनेशिया पूर्ण सदस्य बनला. 10 देश भागीदार देश झाले. रिओ डी जनेरिओ येथे 17 वी शिखर परिषद झाली
2026	भारताचे चौथे अध्यक्षपद (ब्रिक्सला 20 वर्षे पूर्ण)	नवी दिल्ली येथे 18 वी शिखर परिषद. विषय - 'लवचिकता, नवोन्मेष, सहकार्य आणि सातत्यपूर्ण विकासासाठीचे निर्माण' 140 परिच्छेदांचे नवी दिल्ली घोषणापत्र स्वीकारण्यात आले
2027	पुढील अध्यक्षपद	चीनकडे अध्यक्षपद आणि 19 व्या शिखर परिषदेचे यजमान पद सोपवण्यात आले

जानेवारी 2024 पासून इजिप्त, इथिओपिया, इराण, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती हे ब्रिक्सचे पूर्ण सदस्य झाले आणि जानेवारी 2025 मध्ये इंडोनेशियाचाही या यादीत समावेश झाला. याच वर्षी बेलारूस, बोलिव्हिया, कझाकिस्तान, क्यूबा, मलेशिया, नायजेरिया, थायलंड, युगांडा, उझबेकिस्तान आणि व्हिएतनाम हे ब्रिक्सचे भागीदार देश बनले. म्हणजेच, अवघ्या 20 वर्षांत चार देशांपासून सुरू झालेला हा समूह आज 21 देशांच्या विशाल परिवारात परिवर्तित झाला आहे. हा असा विस्तार आहे, जो या मंचाची विश्वासार्हता, महत्त्व आणि आकर्षण अधोरेखित करतो.

संघर्षांच्या काळात भारताने उभारला सेतू

2026 हे वर्ष अशा काळात आले, जेव्हा जग अनेक आघाड्यांवर तणावाला सामोरे जात होते. एका बाजूला पश्चिम आशियातील संघर्ष आणि युक्रेन - रशिया तणावाची छाया होती; तर दुसऱ्या बाजूला व्यापारातील वाढते अडथळे आणि बहुपक्षीय संस्थांवरील विश्वास घटताना दिसून येत होता. अशा वातावरणात वेगवेगळ्या संस्कृती,





राजकीय व्यवस्था आणि आर्थिक हितसंबंध असलेल्या देशांना एका मंचावर आणून सर्वसहमती मिळवणे हे सोपे काम नव्हते. भारताने ही जबाबदारी अत्यंत प्रभावीपणे पार पाडली. 18व्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या उद्घाटन सत्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, ब्रिक्स आज आपल्या वयात येण्याच्या टप्प्यावर पोहोचला आहे. ज्याप्रमाणे 20 वर्षांचे वय प्रगल्भता आणि जबाबदारीच्या नव्या पर्वाची सुरुवात दर्शवते, त्याचप्रमाणे ब्रिक्सदेखील आता आपल्या स्वप्नांसोबत जबाबदाऱ्या स्वीकारत आहे. पंतप्रधानांनी विशेष भर देत सांगितले की ब्रिक्सची ताकद कोणाच्या विरोधात असण्यात नाही; तर सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याच्या विचारात आहे. सदस्य देश परस्पर सन्मान आणि सर्वसहमतीच्या भावनेने पुढे जातात. हीच भावना नवी दिल्ली घोषणापत्रात स्पष्टपणे दिसून आली. एका बाजूला दहशतवादाविरोधात अत्यंत कठोर आणि स्पष्ट भूमिका घेण्यात आली. घोषणापत्रात एप्रिल 2025 मध्ये जम्मू कश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी

> *आपले भविष्य सामायिक आहे, त्यामुळे त्या भविष्याला आकार देण्याचा अधिकारही सर्वांना समान असला पाहिजे - आवाज उठवण्यापासून प्रभाव निर्माण करण्यापर्यंत आणि विशेषाधिकारांपासून भागीदारीपर्यंत.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

हल्ल्याचा कठोर निषेध करण्यात आला. दहशतवादाबाबत शून्य सहनशीलता आणि दुहेरी निकष लागू न करण्याचे आवाहन करण्यात आले. त्याच वेळी गाझा, लेबनॉन, सीरिया आणि सुदान यांसारख्या संवेदनशील मुद्द्यांवर सर्व सदस्य देशांच्या विविध राष्ट्रीय दृष्टिकोनांचा



भारताच्या अध्यक्षतेखाली आयोजित ब्रिक्स शिखर परिषदा

2026 : 18वी ब्रिक्स शिखर परिषद - 12 आणि 13 सप्टेंबर 2026 रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे भारताने हिचे यजमान पद भूषवले. हिची संकल्पना — 'लवचिकता, नवोन्मेष, सहकार्य आणि सातत्यपूर्ण विकासासाठीचे निर्माण' अशी होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2025 मध्ये रिओ शिखर परिषदेत ही संकल्पना मांडली होती, जी 'मानवता प्रथम' आणि जनकेंद्रित दृष्टिकोनावर आधारित आहे. 2026 मध्ये ब्रिक्सच्या स्थापनेला 20 वर्षे पूर्ण झाली.

- या घोषणापत्रात 140 मुद्द्यांचा समावेश करण्यात आला. यामध्ये संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत सुधारणा, दहशतवादाच्या विरोधात कठोर भूमिका, वाढ आणि विकास यासाठी ब्रिक्स कृती बल, ब्रिक्स कनेक्ट, ब्रिक्स धान्याची देवाणघेवाण, हवामान बदल आणि पॅरिस करार, तसेच नवी विकास बँक यांसारख्या प्रमुख मुद्द्यांचा समावेश होता.

2021 : 13वी ब्रिक्स शिखर परिषद - 9 सप्टेंबर 2021 रोजी ही दूरदृश्य पद्धतीने आयोजित करण्यात आली. हिची संकल्पना — 'ब्रिक्स @15 - सातत्य, मजबुती आणि सहमतीसाठी सहकार्य' अशी होती.

- या घोषणापत्रात बहुपक्षीय व्यवस्थेत सुधारणा, दहशतवादाचा सामना, एसडीजींसाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर आणि लोकांमधील संपर्क वाढवण्यावर भर देण्यात आला. भारताने ब्रिक्सची कार्यपद्धती सुलभ केली आणि डिजिटल आरोग्य शिखर परिषद तसेच पहिली जलमंत्र्यांची बैठक यांसारखे नवीन मंच सुरू केले.

2016 : 8वी ब्रिक्स शिखर परिषद - 15-16 ऑक्टोबर 2016 रोजी गोवा येथे ही परिषद झाली. हिची संकल्पना — 'जबाबदार, समावेशक आणि सामूहिक उपाययोजनांची निर्मिती' अशी होती.

- गोवा घोषणापत्र आणि कृती आराखड्यात नव्या विकास बँकेचे काम सुरू करण्याचे आणि अक्षय ऊर्जेसाठी देण्यात आलेल्या पहिल्या कर्जाचे स्वागत करण्यात आले. तसेच संयुक्त राष्ट्रांमध्ये सुधारणा करण्याच्या गरजेवर भर देण्यात आला, जेणेकरून विकसनशील देशांचा सहभाग वाढू शकेल.

2012 : चौथी ब्रिक्स शिखर परिषद : 29 मार्च 2012 रोजी नवी दिल्ली येथे ही परिषद आयोजित करण्यात आली. हिची संकल्पना — 'जागतिक स्थिरता, सुरक्षा आणि समृद्धीसाठी ब्रिक्सची भागीदारी' अशी होती.

- यामध्ये जगाच्या अर्थव्यवस्थेतील विषम सुधारणा, देशांवरील वाढत्या कर्जाच्या जोखमी आणि सातत्याने विकास यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.

आदर राखत संतुलित भाषा वापरण्यात आली. इतके विविध हितसंबंध असलेल्या देशांची एका समान घोषणापत्रावर सहमती मिळवता आली, हे भारताच्या राजनैतिक परिपक्वतेचाच परिणाम होता. रिओ दी जनेरिओ येथे 2025 च्या शिखर परिषदेतही पंतप्रधान मोदी यांनी याच विचारावर भर देऊन सांगितले होते की, विसाव्या शतकात निर्माण झालेल्या जागतिक संघटना एकविसाव्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यास सक्षम नाहीत आणि त्यांना बहुध्रुवीय व समावेशक जागतिक व्यवस्थेला अनुसरून सुधारणे



आवश्यक आहे. ब्रिक्सची व्याप्ती ही या मंचाची काळानुरूप बदल स्वीकारण्याच्या क्षमतेची ग्वाही देते, यावर त्यांनी भर दिला. भारताने आपल्या अध्यक्षपदाच्या काळात याच भावनेला पुढे नेत व्यापार, आरोग्य, तंत्रज्ञान आणि हवामान यासारख्या व्यावहारिक क्षेत्रांत ठोस पुढाकार घेतला. जेणेकरून जगातील अस्थिरतेच्या काळात ब्रिक्स सहकार्य आणि भरवशाचा एक आदर्श नमुना ठरेल.

नवी दिल्ली घोषणापत्र - बदलाचा 140 सूत्रीय आराखडा

18व्या BRICS शिखर परिषदेत स्वीकारण्यात आलेले नवी दिल्ली घोषणापत्र हे ब्रिक्सच्या दोन दशकांच्या प्रवासाचे आणि भारताच्या अध्यक्षपदाच्या काळात झालेल्या 400 पेक्षा अधिक बैठका आणि कार्यक्रमांचा सारांश आहे. 'लवचिकता, नवोन्मेष, सहकार्य आणि सातत्यपूर्ण विकासासाठीचे निर्माण' अशी या घोषणापत्राची संकल्पना आहे. हे 140 परिच्छेदांचे व्यापक घोषणापत्र असून त्यामध्ये जागतिक प्रशासनातील सुधारणा, आरोग्य, शेती, तंत्रज्ञान, हवामान, संस्कृती यांसह अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांचा समावेश आहे. घोषणापत्रातील सर्वात उल्लेखनीय मुद्दा म्हणजे सदस्य देशांची संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत सुधारणा घडवून आणण्याच्या भूमिकेबाबत एकजूट. चीन आणि रशियाने संयुक्त राष्ट्रांमध्ये, विशेषतः सुरक्षा परिषदेत, भारत आणि ब्राझीलच्या अधिक प्रतिनिधित्वाच्या आकांक्षांना आपला पाठिंबा पुन्हा व्यक्त

> *"नवोन्मेषाच्या अंतर्गत ब्रिक्स इनक्युबेटर नेटवर्क आपल्या स्टार्ट अप्स आणि इनक्युबेटरना एकमेकांशी जोडेल. लघुउद्योगांना ज्ञान, वित्त आणि नवीन बाजारपेठांशी जोडण्यासाठी ब्रिक्स एमएसएमई सहकार्य पोर्टलने पुढाकार घेतला आहे.*
>
> **–नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

केला. घोषणापत्रात स्पष्टपणे नमूद करण्यात आले की 20व्या शतकात निर्माण झालेल्या जागतिक संस्था आजच्या वास्तवाचे पूर्णपणे प्रतिनिधित्व करत नाहीत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय नाणे निधी, जागतिक बँक आणि जागतिक व्यापार संघटना यांसारख्या संस्थांमध्ये तातडीने सुधारणा करण्याची गरज आहे. दहशतवादाच्या विरोधात घोषणापत्रात अत्यंत ठाम भूमिका घेण्यात आली. सदस्य देशांनी एप्रिल 2025 मध्ये जम्मू कश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा कठोर निषेध केला आणि दहशतवादाच्या सर्व प्रकारांविरोधात लढण्याप्रती आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.



भारताच्या ब्रिक्स अध्यक्षपदाचे प्रमुख आधारस्तंभ

लवचिकता

- जागतिक अनिश्चितता, पुरवठा साखळीतील व्यत्यय, आरोग्यविषयक आव्हाने आणि हवामानविषयक धोके यांना तोंड देण्यासाठी आर्थिक, सामाजिक आणि संस्थात्मक लवचिकता बळकट करणे.

नवोन्मेष

- प्रभावी सेवा वितरण आणि भविष्यासाठी सज्ज विकासाला सक्षम करण्यासाठी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, फिनटेक, एआय आणि माहिती आदान-प्रदान यांसारख्या नवीन आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करणे.

सहकार्य

- धोरण समन्वय, विकास वित्त, व्यापार सुविधा, जागतिक संस्थात्मक प्रशासनात सुधारणा आणि लोक-केंद्रित भागीदारीच्या माध्यमातून ब्रिक्स सदस्यांदरम्यान बहुपक्षीय प्रतिबद्धता दृढ करणे.

शाश्वत विकास

- राष्ट्रीय आणि जागतिक प्राधान्यक्रमानुसार हवामान विषयक कृती, हरित वित्त, ऊर्जा रूपांतरण आणि शाश्वत विकासाच्या दिशेने सामूहिक प्रयत्नांना चालना देणे.

ब्रिक्स इंडिया 2026 चा लोगो

ब्रिक्स 2026 चा लोगो म्हणजे परंपरा आणि आधुनिकतेचा एक सुंदर संगम आहे. यात फुलांच्या पाकळ्यांचे रंग हे सर्व ब्रिक्स सदस्य देशांच्या उर्मीचे प्रतिबिंब आहेत. हे देशांची एकता आणि सामूहिक शक्तीचे प्रतीक आहे. मध्यभागी असलेली 'नमस्ते'ची मुद्रा भारताची प्राचीन परंपरा, आपलेपणा, आदर आणि एकत्रितपणे काम करण्याची वृत्ती दर्शवते. हा लोगो तीन मुख्य स्तंभ देखील दर्शवतोः

- राजकीय आणि संरक्षण सहकार्य
- आर्थिक आणि वित्तीय भागीदारी
- संस्कृती आणि लोकांमधील परस्पर संवाद-सहकार्य

असाही भर देण्यात आला की दहशतवादाचा कोणत्याही धर्म, राष्ट्रीयत्व किंवा दहशतवादाचा सामना करण्यासाठी दुहेरी उपाययोजना स्वीकारार्ह नाहीत. आर्थिक आघाडीवर, या घोषणेमध्ये न्यू डेव्हलपमेंट बँकेच्या (एनडीबी) दुसऱ्या 'सुवर्ण दशकातील' प्रवेशाचे स्वागत करण्यात आले आणि मे 2026 मध्ये मॉस्को येथे होणाऱ्या तिच्या 11व्या वार्षिक बैठकीची नोंद घेण्यात आली. भारतीय अध्यक्षतेखाली विकसित करण्यात आलेले 'ब्रिक्स-एनडीबी नॉलेज पोर्टल' देखील सुरू करण्यात आले, ज्यात सदस्य देशांचे विकासात्मक अनुभव आणि सर्वोत्तम पद्धतींचा मिलाफ आहे. सीमापार



देशातील 30 शहरांमध्ये 400 हून अधिक बैठकांमध्ये ब्रिक्सचे विचारमंथन

भारताच्या अध्यक्षतेखाली ब्रिक्स सदस्य राष्ट्रे व संघटनांच्या उपस्थितीत झालेल्या या शिखर परिषदेने, परिषदेपूर्वी देशभरातील 30 शहरांमध्ये झालेल्या मागील 400 बैठकांमध्ये निघालेल्या निष्कर्षांना आणि एकमताला अधिक पुढे नेले. राजकीय आणि संरक्षण सहकार्य, आर्थिक आणि वित्तीय सहकार्य, आणि सांस्कृतिक व लोकांमधील परस्पर संवाद हे सहकार्याचे तीन मुख्य आधारस्तंभ होते. भारताच्या अध्यक्षतेखाली, ब्रिक्सच्या विविध विषयात्मक क्षेत्रांमध्ये 50 हून अधिक उद्दिष्टे साध्य झाली. यापैकी अनेक उद्दिष्टे प्लॅटफॉर्म, आराखडे आणि मार्गदर्शक तत्त्वांच्या स्वरूपात विकसित करण्यात आली. ब्रिक्सच्या तिसऱ्या दशकातही निरंतर सहकार्य आणि भागीदारीला प्रोत्साहन देणे हा यामागील उद्देश आहे. बैठकांमध्ये झालेले एकमत ब्रिक्स नवी दिल्ली जाहीरनाम्यात समाविष्ट करण्यात आले. नवी दिल्ली जाहीरनाम्यात 140 मुद्दे समाविष्ट होते, त्यापैकी काही सर्वात महत्त्वाचे मुद्दे येथे सादर केले आहेत.

संपूर्ण जाहीरनामा वाचण्यासाठी, **https://www.mea.gov.in/bilat-er-al-documents?dtl/**41776 या लिंकवर क्लिक करा.

ब्रिक्स नवी दिल्ली जाहीरनाम्यातील काही महत्त्वाचे मुद्दे

- **संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद सुधारणा :** संयुक्त राष्ट्र सुधारणा आणि सुरक्षा परिषदेत विकसनशील देशांचे प्रतिनिधित्व वाढवण्यावर भर देण्यात आला. चीन आणि रशियाने भारत आणि ब्राझीलच्या अधिक मोठ्या भूमिकेच्या आकांक्षांना आपल्या पाठिंब्याचा पुनरुच्चार केला.
- **दहशतवादाविरोधात कठोर भूमिका:** जम्मू आणि काश्मीरमध्ये 22 एप्रिल 2025 रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध करण्यात आला. सर्व प्रकारचा दहशतवाद, सीमापार दहशतवाद, दहशतवादी वित्तपुरवठा आणि सुरक्षित आश्रयस्थानांविरोधात शून्य सहिष्णुतेचे आवाहन करण्यात आले.
- **किम्बर्ली प्रक्रियेत भारताचे अध्यक्षपद :** 2026 मध्ये किम्बर्ली प्रक्रियेत भारताच्या अध्यक्षपदाचे स्वागत; ब्रिक्समध्ये आफ्रिकन हिरे उत्पादक देशांसोबतच्या सहकार्याला पाठिंबा.
- **गिफ्ट सिटीमध्ये ब्रिक्स रिस्क लॅब :** गुजरातच्या गिफ्ट सिटी आयएफएससीमध्ये ब्रिक्स रिस्क लॅब आयोजित करण्याच्या भारताच्या प्रस्तावावर पुढील चर्चेला समर्थन.
- **विकास आणि वाढीसाठी ब्रिक्स कृती दल :** विकास प्रारूपे, डिजिटल परिवर्तन, एआय आणि विकास वित्त यावर सहकार्य करण्यासाठी भारताच्या पुढाकाराने विकास आणि वाढ कृती दलाची स्थापना.
- **ब्रिक्स-एनडीबी नॉलेज पोर्टल:** भारताच्या अध्यक्षतेखाली ब्रिक्स-एनडीबी नॉलेज पोर्टल सुरू करण्यात आले, जे विकास अनुभव, सर्वोत्तम पद्धती आणि धोरणात्मक नवकल्पना सामायिक करण्यासाठी एक मंच असेल.
- **डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा :** ब्रिक्स देशांसाठी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा भांडार (रिपॉझिटरीज) आणि डीपीआय उपाययोजनांचा एक प्रायोगिक प्रकल्प सुरू करण्याचा प्रस्ताव.

पेमेंट अधिक जलद, स्वस्त आणि सुरक्षित करण्यासाठी 'ब्रिक्स पेमेंट्स कृती दलाच्या' प्रयत्नांना चालना देण्यासही मान्यता देण्यात आली. कृत्रिम बुद्धिमत्तेवरील जाहीरनाम्यात याला आर्थिक आणि शाश्वत विकासाची एक मोठी संधी म्हणून मान्यता दिली, तसेच त्याची सुरक्षितता, सर्वसमावेशकता आणि विश्वासार्हता सुनिश्चित करण्याच्या गरजेवर भर दिला. सदस्य देशांनी फेब्रुवारी 2026 मध्ये एआय इम्पॅक्ट समिटचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल



- **एआय सहकार्य :** आर्थिक वाढ आणि शाश्वत विकासासाठी एआयला एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून मान्यता आणि सुरक्षित, सर्वसमावेशक, विश्वसनीय व सुलभ एआयसाठी आंतरराष्ट्रीय सहकार्यावर भर. भारताच्या एआय इम्पॅक्ट समिट 2026 चे स्वागत.
- **निम्हन्स सोबत मानसिक आरोग्य नेटवर्क :** ब्रिक्स सेंटर्स ऑफ एक्सलन्स नेटवर्कचे समन्वयक म्हणून निम्हन्सच्या समावेशासाठी समर्थन; जो मानसिक आरोग्यावरील संशोधन आणि धोरण सहकार्यासाठीचा मंच.
- **महत्त्वपूर्ण खनिजे :** महत्त्वपूर्ण खनिजांसाठी विश्वसनीय, वैविध्यपूर्ण आणि लवचिक पुरवठा साखळी आणि संसाधन संपन्न देशांमध्ये मूल्यवर्धनावर भर.
- **चेन्नई सहमती आणि विज्ञान रिपॉझिटरी :** चेन्नई सहमती संयुक्त घोषणेचे स्वागत, ब्रिक्स सायन्स अँड रिसर्च रिपॉझिटरी आणि ग्रेन सेंटर्सच्या दिशेने सहकार्य.
- **सौर फोटोव्होल्टेइक सहकार्य :** ब्रिक्स सौर फोटोव्होल्टेइक सहकार्य आराखडा विकसित करण्यासाठी समर्थन; तंत्रज्ञान, वित्त आणि क्षमता बांधणीमध्ये सहकार्य.
- **इंडिया सेंटर फॉर ब्रिक्स इंडस्ट्रियल कॉम्पिटन्सी:** इंडिया सेंटर फॉर ब्रिक्स इंडस्ट्रियल कॉम्पिटन्सी (**ICBIC**) च्या स्थापनेचे स्वागत.
- **ब्रिक्स एसएमई मंच, आग्रा :** भारताच्या अध्यक्षतेखाली पहिला ब्रिक्स एसएमई मंच आग्रा येथे आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये एमएसएमईसाठी वित्त आणि तंत्रज्ञानाची उपलब्धता वाढवण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले.
- **ब्रिक्स इनक्यूबेटर नेटवर्क:** ब्रिक्स इनक्यूबेटर नेटवर्कच्या स्थापनेचे स्वागत आणि ब्रिक्स **स्टार्टअप नवोन्मेष निधीवर पुढील विचारविनिमय.**
- **कर सहकार्य:** भारताच्या अध्यक्षतेखाली ब्रिक्स कर प्राधिकरणांच्या सहकार्यासाठी नवीन कार्यगट; टॅक्स सपोर्ट नेटवर्क आणि टॅक्स क्रॉस-लर्निंग लॅब उपक्रम.
- **महिलांची डिजिटल क्षमता बांधणी:** भारताने सुरू केलेल्या, महिला सक्षमीकरणातील सर्वोत्तम पद्धतींचा डिजिटल संग्रह असलेल्या 'ब्रिक्स महिला डिजिटल क्षमता बांधणी मार्गदर्शक तत्त्वां'चे स्वागत.
- **पारंपरिक आणि स्वदेशी ज्ञान:** भारताच्या या उपक्रमात 'पारंपरिक आणि स्वदेशी ज्ञान प्रणालींमधील शैक्षणिक सहकार्यासाठी मार्गदर्शक तत्त्वां'चे स्वागत आहे.
- **शिक्षण आणि कौशल्ये:** ब्रिक्स-टीसीएला सहकार्याचे व्यासपीठ म्हणून मान्यता देऊन, शिक्षण, डिजिटल साक्षरता, कौशल्य विकास आणि मनुष्यबळ सज्जता बळकट करण्यावर भर.
- **ब्रिक्स कनेक्ट:** क्षमता बांधणी, रोजगारक्षमता आणि नवीन तंत्रज्ञान/कौशल्ये यासाठी ब्रिक्स कनेक्ट स्वीकारण्यात आले; दूरस्थ रोजगारासाठी हा एक आंतरराष्ट्रीय डिजिटल व्यासपीठ उपक्रम आहे.
- **ब्रिक्स रिमोट सेन्सिंग उपग्रह तारकामंडल:** रिमोट सेन्सिंग सॅटेलाइट कॉन्स्टेलेशनच्या कामगिरीचे स्वागत करण्यात आले; ब्रिक्स स्पेस कौन्सिल आणि नवीन अंतराळ संस्थांच्या समावेशाच्या दिशेने प्रगती झाली.

भारताचे अभिनंदन केले.

जागतिक प्रशासनावरील सत्रादरम्यान पंतप्रधान मोदींनी मांडलेले तीन प्रस्ताव सर्वात लक्षवेधी होते. त्यांनी जागतिक प्रशासनाच्या रचनेची तुलना पिरॅमिडशी केली, ज्यात सत्ता शिखरावर केंद्रित असते, तर तळाशी असे देश असतात जे निर्णयांनी प्रभावित होतात पण त्यांना आकार देऊ शकत नाहीत. या 'विशेषाधिकारांच्या पिरॅमिड'चे 'भागीदारीच्या



- **माहिती तंत्रज्ञान आणि सायबर गुन्हेगारी:** सुरक्षित, स्थिर आणि आंतरकार्यक्षम आयसीटी (**ICT**) वातावरणावर भर, सायबर गुन्हेगारी विरोधी संयुक्त राष्ट्र कराराच्या अंमलबजावणीसाठी सहकार्य.
- **सायबर सुरक्षा आणि डीपफेक:** सायबर गुन्हेगारी, चुकीची माहिती, दिशाभूल करणारी माहिती, द्वेषपूर्ण भाषण आणि डीपफेक सारख्या डिजिटल आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सहकार्य.
- **स्थानिक चलनांमध्ये पेमेंट:** ब्रिक्स देशांमधील सीमापार पेमेंट अधिक जलद, कमी खर्चिक, सुरक्षित आणि सुलभ करण्यासाठी प्रयत्न, आणि स्थानिक चलनांमध्ये व्यापार समझोत्यावर चर्चा सुरू राहिली.
- **सेटलमेंट आणि डिपॉझिटरी पायाभूत सुविधा :** सेटलमेंट आणि डिपॉझिटरी प्रणालींवरील तांत्रिक कार्यशाळेनंतर माहिती आणि अनुभव सामायिक करण्यावर सहकार्य.
- **सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी (MSMEs) इन्व्हॉइस डिस्काउंटिंग :** जयपूर करारांतर्गत ब्रिक्समध्ये इन्व्हॉइस डिस्काउंटिंग यंत्रणा स्थापित करण्यासाठी अभ्यास, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (**MSMEs**) खेळते भांडवल पुरवणे हे उद्दिष्ट आहे.
- **जागतिक मूल्य साखळ्या:** ब्रिक्स जागतिक मूल्य साखळ्या लवचिक आणि सर्वसमावेशक बनवण्यावर लक्ष केंद्रित करण्याबरोबरच विकसनशील देशांना उच्च-मूल्य क्षेत्रांमध्ये प्रोत्साहन देते.
- **ब्रिक्स धान्य विनिमय:** कृषी उत्पादने आणि वस्तूंपर्यंत विस्तार करण्याच्या शक्यतेसह, ब्रिक्स धान्य व्यापार मंच/ब्रिक्स धान्य विनिमय स्थापन करण्याच्या उपक्रमावर पुढील चर्चा.
- **ब्रिक्स ॲग्रिन:** कृषी निविष्ठा, अनुवंशिक संसाधने आणि माहितीसाठी ब्रिक्स ॲग्रिन (**BRICS AGRIN**) स्थापन करण्यास सहमती दर्शवली; बियाणे प्रणालीमधील शेतकऱ्यांच्या हक्कांवरील जागतिक मंचाचे स्वागत केले.
- **ऊर्जा सुरक्षा:** ऊर्जा सुरक्षा, शाश्वत ऊर्जा बाजारपेठा आणि लवचिक ऊर्जा पायाभूत सुविधांवर भर; ब्रिक्स युवा ऊर्जा शिखर परिषदेचे स्वागत.
- **स्मार्ट ग्रिड्स आणि ऊर्जा साठवण:** स्मार्ट ग्रिड्स आणि ऊर्जा साठवणुकीसाठीच्या डिजिटल सेंटर ऑफ एक्सलन्सचा उपक्रम असलेल्या 'ब्रिक्स स्मार्ट ग्रिड्स आणि ऊर्जा साठवण मार्गदर्शक तत्त्वां'चे स्वागत.
- **हवामान बदल आणि पॅरिस करार:** पॅरिस कराराची पूर्ण अंमलबजावणी, अनुकूलन, नुकसान-तोटा आणि विकसनशील देशांसाठी हवामान वित्तपुरवठा यावर भर.

व्यासपीठात' रूपांतर करण्याचे आवाहन करत, त्यांनी प्रतिनिधित्व, उत्तरदायित्व आणि नियमनिर्मिती या तीन स्तंभांवर आधारित 'ब्रिक्स सुधारणा आराखडा' (BRICS Reform Roadmap) तयार करण्याचा प्रस्ताव मांडला.

त्यांनी ब्रिक्सचे सातत्य टिकवून ठेवण्यासाठी 'ब्रिक्स सातत्य आणि अंमलबजावणी यंत्रणा' स्थापन करण्याचा प्रस्तावही मांडला, जेणेकरून दरवर्षी अध्यक्षपद बदलत असूनही निर्णयांचे निरीक्षण आणि अंमलबजावणी विस्कळीत होणार नाही. सागरी प्रवाशांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी त्यांनी 'खलाशी आपत्कालीन सहाय्यक नेटवर्क' तयार करण्याचा सल्लाही दिला. जाहीरनाम्यात शेवटी, सदस्य देशांनी 2026 मधील भारताच्या अध्यक्षपदाबद्दल आणि नवी दिल्लीतील शिखर परिषदेच्या यशस्वी आयोजनाबद्दल भारत सरकार आणि तेथील जनतेचे आभार मानले, तसेच 2027 मधील अध्यक्षपदासाठी आणि 19 व्या शिखर परिषदेच्या आयोजनासाठी



- **ब्रिक्स कार्बन मार्केट भागीदारी:** ब्रिक्स कार्बन मार्केट भागीदारीच्या माध्यमातून कार्बन बाजारांवर सहकार्य, क्षमता बांधणी आणि अनुभव सामायिकरणासाठी पाठिंबा.
- **आंतरराष्ट्रीय बिग कॅट अलायन्स:** आंतरराष्ट्रीय बिग कॅट अलायन्स स्थापन करण्याच्या भारताच्या पुढाकाराचा उल्लेख आणि ब्रिक्स देशांकडून मोठ्या मांजर कुळातील श्वापदांच्या संवर्धनासाठी सहकार्याचे आवाहन.
- **आपत्ती व्यवस्थापन:** आपत्तीचा धोका कमी करण्यासाठी सहकार्य; आपत्ती व्यवस्थापन पूर्वसूचना डेटा एकीकरण मार्गदर्शक तत्त्वे आणि हवामान-अनुकूल शहरी पायाभूत सुविधांसाठी ऐच्छिक तत्त्वांचे स्वागत.
- **शाश्वत वाहतूक:** शाश्वत विमान इंधन, वाहतूक डीकार्बनायझेशन आणि ब्रिक्स अर्बन मोबिलिटी हबच्या स्थापनेचे स्वागत; तसेच लॉजिस्टिक्स पुरवठा-साखळी सहकार्य आराखड्याचा समावेश.
- **शहरीकरण मंच:** नवी दिल्लीतील ब्रिक्स शहरीकरण मंच आणि मंत्रीस्तरीय घोषणेचे स्वागत; आणि ब्रिक्स अर्बन रिसर्च अँड नॉलेज नेटवर्कच्या स्थापनेचे स्वागत.
- **आरोग्य आणि क्षयरोग:** सार्वत्रिक आरोग्य संरक्षणावर सहकार्य; क्षयरोग संशोधन, सामायिक तंत्रज्ञान आणि एकात्मिक पूर्वसूचना प्रणालीसाठी समर्पित उप कार्यगटाची स्थापना.
- **नवीन विकास बँक:** राष्ट्रीय विकास बँकांची भूमिका बळकट करणे, स्थानिक चलनातील वित्तपुरवठा वाढवणे, निधीच्या स्रोतांमध्ये विविधता आणणे आणि ग्लोबल साऊथ देशांमध्ये पायाभूत सुविधांमधील गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यावर भर.
- **भारताचे अध्यक्षपद आणि चीनला पाठिंबा:** ब्रिक्सने भारताच्या 2026 च्या अध्यक्षपदाची प्रशंसा केली आणि नवी दिल्ली शिखर परिषदेचे आयोजन केल्याबद्दल भारताचे आभार मानले तसेच 2027 च्या ब्रिक्स अध्यक्षपदासाठी आणि शिखर परिषदेसाठी चीनला पूर्ण पाठिंबा दिला.

चीनला आपला पूर्ण पाठिंबा दर्शवला.

तीस शहरे, चारशे बैठका, नऊ महिन्यांचे महामंथन

1 जानेवारी 2026 रोजी अध्यक्षपद स्वीकारल्यापासून, भारताने वर्षभर एका सुनियोजित वेळापत्रकानुसार काम करण्यास सुरुवात केली. ब्रिक्स सहकार्य केवळ शिखर परिषदेच्या दोन दिवसांपुरते मर्यादित न राहता, ते प्रत्येक मंत्रालय, प्रत्येक क्षेत्र आणि समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावे हा यामागील उद्देश होता. देशभरातील तीसहून अधिक शहरांमध्ये वर्षभर चारशेहून अधिक बैठका आणि कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यामध्ये मंत्रीस्तरीय बैठकांपासून ते कार्यशाळा, मंच आणि परिषदांपर्यंत विविध कार्यक्रमांचा समावेश होता. शिखर परिषदेच्या अगदी आधीच्या आठवड्यांमध्ये झालेल्या मंत्रीस्तरीय बैठकांनी अध्यक्षपदाच्या



कार्यकाळाची दिशा निश्चित केली. चेन्नई येथे झालेल्या 14 व्या ब्रिक्स विज्ञान मंत्रीस्तरीय बैठकीत "चेन्नई जाहीरनाम्याला" मंजुरी देण्यात आली. त्यामध्ये, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम तंत्रज्ञान आणि जैवतंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यावर आणि ब्रिक्स विज्ञान व संशोधन भांडार तयार करण्यावर एकमत झाले. 7 ऑगस्ट रोजी भुवनेश्वर येथे झालेल्या 13 व्या शिक्षण मंत्र्यांच्या बैठकीत, प्राथमिक शिक्षण आणि मूलभूत साक्षरता सुधारण्यावर, तसेच शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नैतिक वापरावर सहमती झाली. 18 ऑगस्ट रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या 12 व्या पर्यावरण मंत्र्यांच्या बैठकीत, भारताने शाश्वत जीवनशैली, वनीकरण, चक्रीय अर्थव्यवस्था आणि हवामान अनुकूलन यांना आपले चार प्राधान्यक्रम म्हणून मांडले. 21 ऑगस्ट रोजी जयपूर येथे झालेल्या पर्यटन मंत्र्यांच्या बैठकीत, पर्यटनात तंत्रज्ञानाचा वापर आणि शाश्वत पर्यटनावर भर देणारे 'जयपूर घोषणापत्र' स्वीकारण्यात आले. 22 ऑगस्ट रोजी विशाखापट्टणम येथे झालेल्या युवा मंत्र्यांच्या बैठकीत प्रतिनिधींनी 'एक पेड मां के नाम अंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले.

आरोग्य क्षेत्रात, 23 जुलै रोजी चंदीगड येथे झालेली 16 वी ब्रिक्स आरोग्य मंत्र्यांची बैठक विशेष महत्त्वाची ठरली, जिथे सार्वत्रिक आरोग्य सेवा, क्षयरोग निर्मूलन आणि साथीच्या रोगांसाठी पूर्वसूचना प्रणाली यावर एकमत झाले आणि निम्हन्स च्या समन्वयाने मानसिक आरोग्यावर एक नवीन नेटवर्क तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. इंदूर येथे झालेल्या

> *"तंत्रज्ञान आणि महत्त्वपूर्ण खनिजांचे शस्त्रास्त्रीकरण आपल्या सामायिक प्रगतीमध्ये अडथळा आणू शकते. म्हणूनच आम्ही तंत्रज्ञान स्वीकृतीमध्ये सर्वसमावेशकतेवर भर दिला आहे.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

कृषी मंत्र्यांच्या बैठकीत शेतकरी-केंद्रित ब्रिक्स ॲग्रीन (कृषी-निविष्ठा, अनुवंशिक संसाधने आणि माहिती नेटवर्क) मंच स्थापन करण्यास सहमती दर्शवण्यात आली. कोची येथील महिला मंत्र्यांची बैठक, भोपाळ येथील सांस्कृतिक मंत्र्यांची बैठक (जिथे 'भोपाळ घोषणापत्र' स्वीकारण्यात आले), नागपूर येथील परिवहन मंत्र्यांची बैठक आणि आग्रा येथील पहिला ब्रिक्स लघु आणि मध्यम उद्योग मंच म्हणजे भारताचे अध्यक्षपद व्यापक आणि सर्वसमावेशक असल्याचे द्योतक होते.

11 सप्टेंबर रोजी नवी दिल्ली येथे आयोजित ब्रिक्स बिझनेस फोरम 2026 हा आजपर्यंतचा सर्वात मोठा ब्रिक्स बिझनेस फोरम होता. या कार्यक्रमाला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, गेल्या वीस वर्षांत जागतिक

“ब्रिक्समध्ये विकसित करण्यात आलेल्या उपायांचा लाभ केवळ ब्रिक्सपर्यंतच मर्यादित राहू नये. असे पर्याय ‘ग्लोबल साउथ‘च्या आवश्यकतेनुरूप स्वीकारता आणि सहजतेने वापरता आले पाहिजेत, असे आमचे म्हणणे आहे.

-नरेंद्र मोदी, पंतप्रधान

जीडीपी जवळपास अडीच पटीने वाढला आहे, तर ब्रिक्स देशांचा एकत्रित जीडीपी साडेचार पटीने वाढला आहे. याचा अर्थ असा की, ब्रिक्सची आर्थिक शक्ती जगाच्या तुलनेत जवळपास दुप्पट वेगाने वाढली आहे.

भारतामध्ये दोन लाखांपेक्षा जास्त स्टार्टअप आणि शंभराहून अधिक युनिकॉर्न, यूपीआय यासारख्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा निर्माण झाल्या आहेत. 2014 नंतरच्या या सुविधा आणि जवळपास 40 देशांबरोबर झालेल्या मुक्त व्यापार करारांचा उल्लेख करून ब्रिक्स व्यापार परिषदेला आग्रह केला की, त्यांनी दरवर्षी व्यापार व्यवहारांमध्ये येणारे अडथळे, समस्या यांचा एक अहवाल तयार करावा. स्टार्टअपना नवीन बाजारपेठेमध्ये विस्तार करण्यासाठी मदत केली जावी आणि एक हजारभर व्यवसायांमध्ये नव्याने भागिदारी विकसित करावी.

मंचापासून ते मुलाखतीपर्यंत पंतप्रधान मोदी यांची कूटनीती

शिखर परिषदेबरोबरच पंतप्रधान मोदी यांनी जागतिक नेत्यांबरोबर अधिक चांगले संबंध प्रस्थापित करण्यासाठी व्दिपक्षीय बैठकींच्या माध्यमाव्दारे चर्चा केली; त्यामुळे ब्रिक्सचे अध्यक्षपद भूषवणे भारताच्या दृष्टीने अधिक सार्थक बनले. 12 सप्टेंबरला चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याबरोबर झालेल्या मुलाखतीमध्ये उभय नेत्यांनी ऑगस्ट 2025 मध्ये झालेल्या तियानजिन बैठकीनंतर व्दिपक्षीय संबंधांमध्ये झालेल्या प्रगतीचे स्वागत केले. दोन्ही बाजूंनी एकमेकांचा आदर, परस्परांतील संवेदनशीलता आणि परस्परांचे हित जोपासणे, या तीन गोष्टींबांबत एकमेकांचे मार्गदर्शन घेतले पाहिजे आणि सीमा क्षेत्रांमध्ये शांतता आणि स्थैर्य राखले पाहिजे. हाच व्दिपक्षीय संबंधांमध्ये निरंतर विकास घडवून आणण्याचा मूळ आधार आहे, यावर पंतप्रधान मोदी यांनी भर दिला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 13 सप्टेंबर रोजी कजाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष कासिम -जोमार्ट तोकायेव यांची भेट घेवून संवाद साधला. यावेळी त्यांनी सामरिक, व्यापार, संरक्षण, ऊर्जा आणि महत्वपूर्ण खनिजे यांच्यासह अनेक क्षेत्रांतील व्दिपक्षीय सहकार्याची समीक्षा केली. याच दिवशी युगांडाच्या उपराष्ट्रपती जेसिका रोज एपेल अलुपो यांच्याबरोबर पंतप्रधानांची बैठक झाली. या बैठकीत पंतप्रधानांनी युगांडाच्या ‘व्हिजन 2040‘ ला भारताचे



18 व्या ब्रिक्स परिषदेचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करा.



समर्थन असल्याची ग्वाही दिली. तसेच नायजेरियाचे उपराष्ट्रपती काशिम शेत्तिमा मुस्तफा यांच्याबरोबर पंतप्रधान मोदी यांनी व्दिपक्षीय बैठक चर्चा केली. त्यामध्ये व्यापार, ऊर्जा, कृषी आणि डिजिटल तंत्रज्ञान यांच्यासह प्रमुख क्षेत्रांमध्ये भारत आणि नायजेरिया यांच्यातील सामरिक भागीदारी अधिक बळकट करण्याविषयी उभय नेत्यांमध्ये सहमती बनली.

दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष सिरिल रामाफोसा यांच्याबरोबर झालेल्या बैठकीमध्ये पंतप्रधान मोदी यांनी दक्षिण आफ्रिकेतून भारतामध्ये आणलेल्या चित्त्यांचे स्थानांतरण यशस्वी झाल्याचा उल्लेख केला. तसेच दक्षिण आफ्रिकेने 'इंटरनॅशनल बिग कॅट अलायन्स' मध्ये सहभागी व्हावे, याचे निमंत्रण दिले. आफ्रिकेच्या संघाचे अध्यक्ष आणि बुरूंडीचे राष्ट्रपती ॲवरिस्ट नदायिशिमिये यांच्याबरोबर झालेल्या चर्चेमध्ये उभय नेत्यांनी चौथ्या भारत- आफ्रिका आघाडी शिखर परिषदेच्या आयोजनाविषयी चर्चा केली. त्याचबरोबर पंतप्रधानांनी इबोलाच्या वाढत्या प्रादुर्भावाचे संकट संपुष्टात आणण्यासाठी आफ्रिकन संघाने केलेल्या नेतृत्वाचे कौतुक केले.

या सर्व बैठकींमध्ये एक सामायिक शृंखला होती, ती म्हणजे भारताने उठवलेला 'ग्लोबल साउथ' चा आवाज दमदार व्हावा, यासाठी आणि बहुध्रुवीय, समावेशक आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या दिशेने सर्वांनी मिळून कार्य करण्याचा केलेला आग्रह होय. याच शृंखलेची मालिका शिखर परिषदेतील औपचारिक सत्रांना व्दिपक्षीय कूटनीतीनुसार पुढे सुरू ठेवण्यात आली.

या व्दिपक्षीय मुलाखतींनंतर अनेक नेत्यांनी भारताने आतिथ्यशील यजमानपद भूषविल्याबद्दल कौतुक केले. दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष सिरिल रामाफोसा यांनी उत्साही आतिथ्याबद्दल आणि शिखर परिषदेच्या यशस्वी, उत्तम आयोजनाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार व्यक्त

> *"ग्लोबल साउथ वैश्विक संकटांचा सामना करण्याच्या बाबतीत सर्वात आघाडीवर आहे. परंतु निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये सर्वात मागे आहे. आपल्याला 'पिरॅमिड ऑफ प्रिव्हिलेज' ऐवजी 'प्लॅटफॉर्म ऑफ पार्टनरशिप' मध्ये परिवर्तन करावे लागेल.*
>
> **–नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

केले. नवी दिल्ली घोषणापत्रामध्येही सर्व सदस्य देशांनी सामूहिक स्वरूपाने 2026 मध्ये भारताच्या अध्यक्षतेचे कौतुक केले. आणि नवी दिल्लीमध्ये 18 व्या शिखर परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी भारत सरकार आणि भारतीय जनतेविषयी आभार व्यक्त केले.

'नमस्ते' जयघोषः संस्कृतीशी जोडला ब्रिक्स परिवार

भारताने आर्थिक आणि सामरिक मुद्यांबरोबरच आपल्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिखर परिषदेत सांस्कृतिक देवाणघेवाण करण्यालाही तितकेच महत्व दिले. भोपाळमध्ये आयोजित 11 व्या ब्रिक्स संस्कृती मंत्र्यांच्या बैठकीमध्ये स्वीकारण्यात आलेल्या 'भोपाळ घोषणा' मध्ये सांस्कृतिक वारशाचे संरक्षण, संग्रहालये-अभिलेखागार यांच्यामध्ये सहकार्य आणि कलाकारांसाठी एक संयुक्त नोंदणी कार्यक्रम हाती घेण्यासंबंधीच्या उपक्रमांबाबत सहमती बनली. याचबरोबर ब्रिक्स संस्कृती महोत्सव, नाट्य महोत्सव आणि चित्रपट महोत्सव यांचे आयोजन करून; सदस्य देशांच्या



सांस्कृतिक विविधतेला एक व्यासपीठ दिले. 20 वर्षांच्या ब्रिक्स आघाडीला संस्मरणीय करण्यासाठी 12 सप्टेंबर, 2026 रोजी नवी दिल्लीमध्ये दोन स्मृती टपाल तिकिटांचे प्रकाशन करण्यात आले. - 'ब्रिक्स सहकार्याची दोन दशकेः 2006-2026'. एक तिकीट आपआपसांतील आदर आणि एकजूटतेचा मंच या स्वरूपामध्ये ब्रिक्स उदयोन्मुख झाल्याचे दिसून येते. तर दुसरे टपाल तिकीट भारताच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिखर परिषदेत 'मानवता सर्वप्रथम' आणि 'लोक-केंद्रीत' दृष्टिकोन यांना महत्व देत असून त्याचेच प्रतीक चिह्न प्रदर्शित केले आहे.

या जागतिक परिषदेच्या काळामध्ये भारताच्यावतीने परदेशी पाहुणे मंडळींना स्थानिक संस्कृती, कला यांच्यांशी संबंधित स्मृतिचिन्हे भेट स्वरूप देण्यात आली. यामध्ये विशेषत्वाने 'एक जिल्हा-एक उत्पादन' या उपक्रमांतर्गत उत्तर प्रदेशात तयार केलेल्या पश्मिना शाली , वाराणसीचे रेशमी ब्रोकेड, कन्नौजचे अत्तर, राजस्थानी मीनाकारी आणि खादी उत्पादनासारख्या वस्तू स्मरणभेटी म्हणून देण्यात आल्या.

"ज्यावेळी सागरी मार्गाने मालवाहतूक आणि पुरवठा शृंखला सुनिश्चित होईल, त्याचं बरोबर जलमार्ग सुरक्षित होईल, त्याचवेळी जागतिक व्यापारामध्ये वृद्धी होईल. मुक्त सागरी मार्ग आणि सुरक्षित समुद्री मालवाहतूक यांचा भारत दृढ समर्थक आहे.

-नरेंद्र मोदी, पंतप्रधान.

युवकांचा उत्साह, महिलांचे नेतृत्व बनले ब्रिक्सचा मानवी चेहरा

भारताच्या अध्यक्षतेचे एक मोठे विशेषत्व म्हणजे, ब्रिक्स परिषदेच्या आयोजनाच्या कामात सहकार्य घेतना, सरकारी चौकटीऐवजी सर्वसामान्य नागरिकांना स्थान दिले. विशेष म्हणजे युवावर्ग आणि महिला यांच्यापर्यंत ब्रिक्सला पोहाचवले.



युवकांचा सहभाग: 22 ऑगस्ट, 2026 रोजी विशाखापट्टणम इथे झालेल्या युवा मंत्र्यांच्या बैठकीमध्ये शिक्षण, कौशल्य विकास, रोजगार आणि युवा उद्योजकांसाठी वाढीव सहकार्य करणे, यावर सहमती व्यक्त केली. त्याचबरोबर युवकांच्या निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये सार्थक भागीदारी आणि युवा नेतृत्वाला प्रोत्साहन देण्यावर भर दिला गेला. यावेळी प्रतिनिधींनी 'एक पेड माँ के नाम' उपक्रमाअंतर्गत वृक्षारोपणही केले. या प्रतीकात्मक कार्यक्रमामुळे आलेल्या पाहुण्यांचे भारताबरोबर पर्यावरणीय आणि भावनिक ऋणानुबंध जोडले गेले. नवी दिल्ली घोषणपत्रामध्येही ब्रिक्स युवा मंडळ आणि ब्रिक्स युवा शिखर परिषद भूमिकेविषयी सर्वांनी प्रशंसा करून शिक्षण, कौशल्य विकास, उद्योजकता, आरोग्य, आणि पर्यावरण या क्षेत्रांमध्ये युवाकांचा सहभाग वाढविण्याचे आवाहन करण्यात आले. त्याचबरोबर ब्रिक्स युवा सहकार्य आराखड्याविषयी झालेल्या प्रगतीचे स्वागतही करण्यात आले.

महिला नेतृत्व : कोच्ची येथे आयोजित ब्रिक्स महिला मंत्रिस्तरीय बैठकीत महिला नेतृत्व विकासाची संकल्पना मध्यवर्ती ठेवण्यात आली होती. यामध्ये महिलांना आर्थिक विकास आणि सामाजिक परिवर्तनाची प्रेरणादायक शक्ती या स्वरूपात मान्यता देण्यात आली. या बैठकीमध्ये ब्रिक्स महिला डिजिटल क्षमता निर्माण दिशानिर्देशांच्या विकासाचे स्वागत केले. त्याचबरोबर ब्रिक्स महिला व्यापार संघटना (डब्ल्यूबीए) च्या 2026 मधील घडामोडींनुसार

> *महामारी, हवामान परिवर्तन आणि पुरवठा साखळीत पडणारा खंड यांच्यामुळे आज परस्परांना जोडलेल्या जगामध्ये आता कोणतेही संकट एका विशिष्ट क्षेत्रापुरते मर्यादित राहू शकत नाही, हे दाखवून दिले. म्हणूनच आम्ही ब्रिक्स समूहामध्ये संकटातून बाहेर पडण्याची क्षमता वृद्धी करण्यावर विशेष भर दिला आहे.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

भारतामध्ये जवळपास 200 महिला व्यापार- व्यावसायिकांनी भागीदारी नोंदवली. या उपक्रमाचा उद्देश्य महिलांच्या नेतृत्वाखालील उद्योगांसाठी अर्थ पुरवठा, बाजारपेठ, तंत्रज्ञान आणि कौशल्य विकास यांची चांगली उपलब्धता व्हावी, अशा सुविधा निर्माण करणे हा आहे.

युवकांचा उत्साह आणि महिलांचे नेतृत्व यावरून असे दिसून येते की, भारताच्या अध्यक्षतेखाली ब्रिक्स केवळ कूटनीती आणि अर्थकारण यांचा मंच राहिलेला नाही, तर हा एक कोट्यवधी लोकांपर्यंत पोहचलेल्या एका समूहाला चांगले भविष्य आहे.

भारतासह अवघ्या चार देशांनी मिळून 20 वर्षांपूर्वी ब्रिक्सविषयी जे स्वप्न पाहिले होते, ते आज निश्चित स्वरूपात पूर्ण झाले असावे.

12 वर्षांमध्ये अशा मंचांवरून जगाचा आवाज बुलंद आवाज बनला भारत !

- 2016: भारताने 2016 मध्ये ब्रिक्सचे अध्यक्षपद भूषवले होते.
- 2018: भारताने 'इंटरनॅशनल थर्मोन्यूक्लिअर एक्सपेरिमेंटल रिॲक्टर कौन्सिल' (आयटीईआर) च्या मंडळाचे 1 जानेवारी, 2018 मध्ये दोन वर्षासाठी अध्यक्षपद सांभाळले
- 2018 -2020: भारत आयएसए असेंब्लीचा अध्यक्ष म्हणून कार्यरत; फ्रान्स सह-अध्यक्ष होते.
- 2019: भारताने -किंबरले प्रोसेसचे अध्यक्षपद सांभाळले
- 2019-2020: भारताने जीएफडीआरआर म्हणजेच 'ग्लोबल फॅसिलिटी फॉर डिझाझस्टर रिडक्शन ॲंड रिकव्हरी'च्या सल्लागार समूहाचे सह-अध्यक्ष म्हणून भूमिका पार पाडली.
- 2020-2021: डब्ल्यूएचओ एक्झेक्युटिव्ह बोर्डाचे अध्यक्षपद डॉ. हर्षवर्धन यांनी भूषविले.
- 2020-2021: भारताने आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या प्रशासकीय मंडळाचे अध्यक्षपद भूषविले.
- 2020-2022: आयएसए असेंब्लीचे अध्यक्ष आणि सह-अध्यक्ष म्हणून भारत आणि फ्रान्स यांची पुन्हा निवड
- 2021: भारताने जानेवारी ते डिसेंबर 2021 पर्यंत ब्रिक्सचे अध्यक्षपद सांभाळले.
- 2021: भारताने ऑगस्ट 2021 मध्ये यूएनएससी म्हणजेच संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे अध्यक्षपद भूषविले.
- 2022: भारताने डिसेंबर 2022 मध्ये यूएनएससी म्हणजेच संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे अध्यक्षपद भूषविले.
- 2022-2023: भारताने 17 डिसेंबर 2022 ते 4 जुलै,2023 पर्यंत शांघाय सहकार्य संस्थेचे अध्यक्षपद सांभाळले.
- 2022-2024: भारताने आंतरराष्ट्रीय सौर आघाडीचे अध्यक्षपद सांभाळले.
- 2022-2023: भारताने 1 डिसेंबर 2022 ते 30 नोव्हेंबर 2023 कालावधीत 'जी 20' चे अध्यक्षपद भूषविले.
- 2023: भारताने 2023 मध्ये 'वासेनार अरेंजमेंट'च्या पूर्ण सत्राचे अध्यक्षस्थान भूषविले. यापूर्वी 2017 मध्ये भारत या आंतरराष्ट्रीय संघटनेचे सदस्य बनला होता.
- 2024-2026: भारताकडे वर्ष 2024 ते 2026 साठी आयएसए असेंब्लीचे अध्यक्ष आहे.
- 2024-26: भारताने 29 मे, 2024 रोजी, पहिल्यांदा 'कोलंबो प्रोसेस'चे अध्यक्षपद सांभाळले. हा कार्यकाळ 2024-26 आहे.
- 2024-2025: भारताने जुलै 2024 मध्ये आशियाई आपत्ती पूर्वसज्जता केंद्राचे अध्यक्षपद सांभाळले.
- 2026: भारत 2026 साठी 'इंटरनॅशनल इंन्स्टिट्युट ऑफ डेमॉक्रसी ॲंड इलेक्ट्रोरल असिस्टंस कौन्सिल मेंबर स्टेटस्' चे अध्यक्षपद सांभाळत आहे.
- 2026: भारताने 1 जानेवारी 2026 रोजी चौथ्यांदा ब्रिक्सचे अध्यक्षपद स्वीकारले.

कारण ब्रिक्स समूहाअंतर्गत संपूर्ण जगातील लोकसंख्येपैकी अर्धी लोकसंख्या आणि 40 टक्के अर्थव्यवस्था आल्या आहेत. या सर्वांचे प्रतिनिधित्व करणारा आजचा ब्रिक्स समूह आहे. 2026 मध्ये भारताच्या अध्यक्षतेखाली झालेल्या 18 व्या शिखर परिषदेमध्ये हा प्रवास एका निर्णायक टप्प्यावर आला असल्याचे सिद्ध झाले आहे. हा एक 'कमिंग ऑफ एज' असा क्षण असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले. भारताच्या अध्यक्षपदाच्या काळामध्ये ब्रिक्समध्ये स्वप्नांबरोबरच जबाबदारी आणि सामूहिक शक्तीला ठोस, व्यावहारिक परिणामांमध्ये परिवर्तित करण्यात आले. भारताने वर्षभर घेण्यात आलेल्या 400 पेक्षा अधिक बैठका, डझनभर घोषणा आणि नवीन उपक्रमाच्या माध्यमातून असे सिद्ध कले की, ब्रिक्स सहकार्य केवळ सरकारपर्यंतच मर्यादित नाही.

तर शेतकरी बांधव, महिला, युवावर्ग, उद्योजक आणि संशोधक यांच्यापर्यंत पोहोचवणे शक्य आहे. दहशतवादाविषयी स्पष्ट आणि कठोर दृष्टिकोन, वैश्विक संस्थांमध्ये सुधारणा करण्याच्या आवश्यकतेची मागणी, गाझा-सुदान - सिरिया यासाख्या संवेदनशील मुद्यांवर संतुलित कूटनीती आणि त्याचबरोबर न्यू डेव्हलपमेंट बॅंक, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच हवामान परिवर्तन यासारख्या भविष्योन्मुखी क्षेत्रांमध्ये ठोस पावले उचलण्याची कृती करण्यात आली. यावेळी सर्वांनी मिळून 'नवी दिल्ली घोषणापत्रा'ला एक ऐतिहासिक दस्तावेज बनवले. भारताच्या अध्यक्षतेखाली पार पडलेली ब्रिक्स 2026 शिखर परिषद केवळ एक यशस्वी कार्यक्रम नाही तर मानवतेसाठी समन्वय, सामंजस्य आणि सामूहिक जबाबदारीचे एक कायमस्वरूपी आदर्शाचे उदाहरण मानले जाईल. आता ही जबाबदारी 2027 मध्ये चीनकडे असणार आहे. चीनमधील आयोजनानंतर आगामी वर्षांमध्ये ब्रिक्सची दशा आणि दिशा काय असेल, हे निश्चित होईल. ■

पंतप्रधान नरेंद्र मोदी : सुशासनाची 25 वर्षे

निर्णय, आव्हाने यांच्यातून केलेला परिवर्तनाचा प्रवास

स्वतंत्र भारतातील एका गरीब कुंटुबामध्ये जन्मलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सेवा हाच संकल्प, आजच्या नवीन भारताचा मूलमंत्र बनला आहे. संपूर्ण राष्ट्राला आपले कुटुंब मानून भारताला नवीन दिशा देण्यासाठी कार्यरत असलेले पंतप्रधान मोदी यांचा एकच धर्म आहे, तो म्हणजे - राष्ट्र धर्म ! त्यांच्या दृष्टीने एकच पवित्र ग्रंथ आहे तो म्हणजे - राज्यघटना! एकच भक्ती आहे, ती म्हणजे - भारत भक्ती! एकच शक्ती आहे, ती म्हणजे - लोक शक्ती! एकच संस्कार, ध्यास आहे- 140 कोटी भारतीयांची सुरक्षा आणि समृद्धी! त्यांच्या सरकारचा एकच मंत्र आहे- 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास! सुशासनाच्या आपल्या या मंत्राला प्रथम 13 वर्ष गुजरातचे मुख्यमंत्रीच्या रूपामध्ये आणि आता 12 वर्षांपासून पंतप्रधान या रूपाने कार्यरत राहून ते राष्ट्राला नवीन दिशा देत आहेत. ...गुजरातमध्ये मुख्यमंत्री पदाची त्यांनी सर्वप्रथम 7 ऑक्टोबर, 2001 रोजी शपथ घेतली. त्या क्षणापासून त्यांची अविरत लोकसेवा सुरू आहे. समर्पणाच्या त्यांच्या या यात्रेला 25 वर्षे पूर्ण होत आहेत. सादर आहे एक विशेष अहवाल....

पंतप्रधान नरेंद्र मोदी एका कर्मनिष्ठ कार्यकर्त्याप्रमाणे मेहनत करतात, एका मुत्सद्द्याप्रमाणे देशाची प्रतिष्ठा वाढवतात, संघ नायकाप्रमाणे देशाचे नेतृत्व करतात, भावनाप्रधान राजकारण्याप्रमाणे संवेदनशील निर्णय घेतात, निर्भीड सेनापतीप्रमाणे राष्ट्ररक्षणात निश्चल पहाडासारखे उभे राहतात आणि दिव्याच्या ज्योतीप्रमाणे कायम ऊर्ध्व दिशेनेच विचार करतात. सदैव एका सारथ्याची भूमिका बजावणारे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जेव्हा हे विधान केले, तेव्हा त्यांचा संकेत अत्यंत स्पष्ट होता की, राष्ट्रसेवेच्या वाटचालीत या टप्प्यापर्यंत पोहोचलेल्या पंतप्रधान मोदी यांच्या सार्वजनिक जीवनात असंख्य चढ उतार आले, परंतु ते थांबले नाहीत. याचे कारण असे की त्यांनी राजकारणाचा धडाही राष्ट्रनीतीच्या भाषेत शिकून त्यालाच आपल्या जीवनाचा संस्कार बनवले आणि सर्वसमावेशक विकासाची नवी गाथा रचली. न थांबता, न थकता, न अडखळता आणि अथक परिश्रम करत पुढे वाटचाल करत राहणे, नवी उद्दिष्टे निश्चित करणे आणि ती अंतिम ध्येयापर्यंत नेत विकासाची भक्कम गाथा रचणे, हीच पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाची वेगळी ओळख आहे. त्यांचे स्वतःचे कुटुंब आज असेच सामान्य जीवन जगत आहे, कारण त्यांच्यासाठी 140 कोटींपेक्षा जास्त देशवासी हेच त्यांचे कुटुंब आहे.

येत्या 7 ऑक्टोबर रोजी एक शासनप्रमुख म्हणून नरेंद्र मोदी यांच्या सेवेला 25 वर्षे पूर्ण होत आहेत. या 25 वर्षांच्या वाटचालीकडे केवळ राजकीय पदे आणि निवडणुकीतील विजयांच्या अनुषंगाने पाहिले जाऊ शकत नाही. तर ही सातत्याने बदलत असलेल्या आव्हानांदरम्यान घेतलेल्या निर्णयांची आणि त्यातून लाभलेल्या नव्या दिशांची गाथा आहे. गुजरातमध्ये त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात भूकंप, दुष्काळ, पाण्याची टंचाई आणि धार्मिक हिंसाचारासारख्या गंभीर आव्हानांसोबत झाली. पुढे दहशतवाद आणि पुरासारख्या आपत्तींशी लढा देत राज्याने नवी दिशा घेतली. राष्ट्रीय स्तरावर आर्थिक सुधारणा, बँकिंग क्षेत्र, नक्षलवाद, सीमावर्ती भागातील आव्हाने, जम्मू कश्मीर, साथरोग आणि जागतिक युद्धांच्या परिस्थितीने त्यांच्या नेतृत्वाची परीक्षा घेतली. परंतु या 25 वर्षांचा एक धागा कायम राहिला, तो म्हणजे संकटाला अडथळा न मानता त्याच्याशी लढा देत, त्याला बदलाची संधी बनवणे. खरे तर पंतप्रधान मोदी एका देश आणि देशाला प्रतिष्ठा मिळवून देणे हे ध्येय असलेल्या एका आदर्शवादी नेत्याच्या रूपात प्रस्थापित झाले आहेत. आपल्या 25 वर्षांच्या सुशासनाच्या वाटचालीत ते कधीही तुकड्या तुकड्यांत विचार न करता, परिपूर्णतेने विचार करणाऱ्या, दूरचा विचार करणाऱ्या आणि जो विचार करतात तो पूर्णत्वास नेणारे एक दूरदृष्टी असलेले नेते बनले आहेत.

गुजरातचे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी विकासाचे वेगळे प्रारुप स्थापित करण्याच्या दिशेने काम सुरू केले. त्यासाठी त्यांनी विशेषतः शालेय शिक्षणावर लक्ष केंद्रित केले. परंतु याच दरम्यान गुजरात दंगलीमुळे विरोधकांना त्यांच्याविरोधात आघाडी उघडण्याची संधी मिळाली. मात्र या तीव्र हल्ल्यांनी ते कमकुवत झाले नाहीत, तर अधिक धैर्याने काम करत राहिले. परिणामी प्रत्येक वेळी विरोधक हताश होत गेले. मात्र पंतप्रधान मोदी यांचे असे कोणते वैशिष्ट्य आहे की विरोधक त्यांना घेरू शकत नाहीत? याचे उत्तर जाणून घ्यायचे असल्यास नरेंद्र मोदी यांच्या कार्यशैलीचे बारकावे समजून घ्यावे लागतील. त्यांची विचार करण्याची पद्धत समजून घ्यावी लागेल. खरेतर पंतप्रधान मोदी कोणत्याही कामाच्या योजनेचा विचार करतात, तेव्हा त्याची सुरुवात फलनिष्पत्तीपासून. म्हणजेच कोणत्या धोरणाचा, विधानाचा आणि योजनेचा काय परिणाम होईल, ते या बाबींचा प्रत्यक्ष जमिनीवरील अंमलबजावणीच्या स्तरापासून विचार करण्यास सुरुवात करतात. त्यांची विचारांची ही वेगळी पद्धतच त्यांना इतर राजकारण्यांपासून वेगळी बनवते. त्यांच्या अशा या विचार पद्धतीमुळेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी कोणतीही योजना जेव्हा तिची जमिनीवर अंमलबजावणी करण्याची पूर्ण तयारी झालेली असते तेव्हाच समोर आणतात.

हा कालखंड म्हणजे केवळ 25 वर्षांचा प्रवास नाही, तर सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणाचे ध्येय आहे. या काळात गरीबांचे कल्याण, मध्यमवर्गाला सक्षम करणे, महिलांचे सक्षमीकरण करून नारी शक्तीच्या नेतृत्वात विकासाचे ध्येय साध्य करणे, शेतकरी हिताच्या धोरणांच्या माध्यमातून पेरणीच्या प्रत्येक टप्प्यात अन्नदात्यांसमोरील समस्यांचे निवारण करणे, युवा वर्गासाठी शिक्षण तसेच रोजगाराच्या संधी आणि सामाजिक न्यायाच्या सुनिश्चिततेसह राष्ट्राच्या विकासासाठी घेतलेला अविस्मरणीय पुढाकार आहे. हा कालखंड 2047 पर्यंत भारताला विकसित बनवण्याच्या ध्येयाचा आधारस्तंभ बनला आहे. कोणतीही योजना असो, त्यामागे पंतप्रधान मोदी यांच्या संघर्षमय जीवनाची एक गाथा दडलेली आहे, ते दुःख त्यांनी अतिशय जवळून अनुभवले आहे. गुजरातच्या मुख्यमंत्र्यांपासून ते देशाच्या पंतप्रधानमंत्रीपदापर्यंतचा त्यांचा प्रवास मोजक्या शब्दांत मांडायचा झाल्यास, त्यांनी विकासवादाला मुख्य प्रवाहात आणून इतर सामाजिक कुप्रथा उद्ध्वस्त केल्या आहेत, विकास हा देशाच्या राजकारणाचा, कार्यधोरणाचा आणि राष्ट्रधोरणाचा मुख्य आधार बनवला आहे.

चला, जाणून घेऊ या पंतप्रधान मोदी यांच्या सुशासनमय प्रवासाची 25 वर्षे, त्यांच्या विशिष्ट कार्यशैलीतून, कार्यातून आणि परिणामांतून...

25 आव्हाने, 25 वर्षे एका राजकारण्याचा प्रवास

25 वर्षांचा हा प्रवास केवळ 25 आव्हानांची यादी नाही. ही संकटांदरम्यान घेतलेले निर्णय आणि त्यातून घडलेल्या बदलांची कहाणी आहे. संकटाला अंत न मानता, नव्या संकल्पाची सुरुवात मानणे हेच या प्रवासाचे मुख्य सूत्र आहे. याच सूत्राच्या आधारे पंतप्रधान मोदी गेल्या 25 वर्षांत देशाला पुढे नेत आहेत...

1. संकटातील गुजरात, नव्या सुरुवातीची संधी

ऑक्टोबर 2001 मध्ये नरेंद्र मोदी यांनी गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. तेव्हा हे राज्य भूकंप, दुष्काळ आणि सहकारी बँकांच्या संकटाशी लढा देत होते. राज्याच्या पुनर्रउभारणीला गती देण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांना कच्छ इथे पाठवले गेले. बंधारे, कालव्यांचा विस्तार आणि जलसंधारणाला प्राधान्य दिले गेले. 2003 मध्ये देशातील पहिला राज्य आपत्ती व्यवस्थापन कायदा बनला.

2. जेव्हा हिंसाचाराच्या विळख्यातून मुक्त झाली संपूर्ण पिढी

फेब्रुवारी 2002 मध्ये गोध्रा कांड आणि त्यानंतरच्या हिंसाचाराने परिस्थिती गंभीर बनली. मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी कायदा सुव्यवस्था, गुंतवणूक आणि रोजगारावर लक्ष केंद्रित करून हिंसाचाराचे चक्र रोखले, परिणामी गेल्या 24 वर्षांत तसा हिंसाचार पुन्हा घडला नाही.



3. पहिल्या निवडणुकीची परीक्षा, मिळाले अधिक सामर्थ्य

2002 मध्ये नरेंद्र मोदी यांनी विधानसभा बरखास्त करून 14 महिन्यांच्या कामाच्या आधारावर जनादेश मागितला. डिसेंबरमध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपला 182 पैकी 127 जागा आणि 49.85 टक्के मते मिळाली.

4. दहशतवादाचा धोका असतानाही स्थैर्य

सप्टेंबर 2002 मध्ये अक्षरधाम हल्ला आणि जुलै 2008 मध्ये अहमदाबादमध्ये 70 मिनिटांत 21 बॉम्बस्फोट झाले. या घटनांना धार्मिक हिंसाचारात बदलू दिले गेले नाही, सुरक्षा यंत्रणा मजबूत केली गेली आणि दिशा बदलू दिली नाही.

5. पाण्याचा तुटवडा ते जलसुरक्षा

नर्मदा धरण योजना 1961 पासून कित्येक दशके रखडली होती. 1.8 लाखांपेक्षा जास्त बंधारे बांधले गेले, सुजलाम सुफलाम आणि सौनी योजनेद्वारे पाणी पोहोचवले गेले. 2017 मध्ये धरण पूर्ण उंचीपर्यंत पोहोचले, यामुळे 9000 पेक्षा जास्त गावांना आणि 170 शहरांना पिण्याचे पाणी मिळाले. गुजरातने पाण्यासाठी वाट पाहण्याऐवजी पाण्यासोबत विकास करण्यास सुरुवात केली.

6. पुरानंतर नवी व्यवस्था

2006 मध्ये तापी नदीच्या पुरामुळे सुरतचा सुमारे 95 टक्के भाग पाण्याखाली गेला होता, त्यानंतर पाण्याचा निचरा आणि इशारा देणारी यंत्रणा बळकट करण्यात आली. आठ वर्षांनंतर जम्मू कश्मीरमधील पुराच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी श्रीनगरला पोहोचले आणि नंतर दिवाळी साजरी करण्यासाठी पुन्हा गेले. त्याच्या प्रतिसादाची पद्धत कायम होती - परिस्थिती समजून घेणे, वेगाने काम करणे आणि जमिनीवरील समस्यांचे निवारण करणे.



7. आरोपांच्या गर्तेतही बदलाचे दशक

2002 नंतर नरेंद्र मोदी यांच्यावर अनेक आरोप झाले, परंतु त्यांनी सूडाऐवजी कामालाच आपले उत्तर बनवले. 2007 आणि 2012 मध्ये गुजरातने त्यांना पुन्हा निवडून दिले.

8. पाटणा स्फोट

27 ऑक्टोबर 2013 रोजी पाटणा इथल्या सभेच्या परिसरात सात बॉम्बस्फोट झाले, यात सहा जणांचा मृत्यू झाला आणि 85 जण जखमी झाले. स्फोट होऊनही नरेंद्र मोदी यांनी भाषण सुरूच ठेवले, सभा पूर्ण केली आणि गर्दीला शांत राहण्याचे आवाहन केले.

9. 30 वर्षांनंतर पूर्ण बहुमताचे सरकार

नरेंद्र मोदी यांनी नऊ महिन्यांत सुमारे 400 सभा घेतल्या आणि तीन लाख किलोमीटरचा प्रवास केला. 2014 मध्ये भाजपला 282 जागा मिळाल्या आणि 30 वर्षांनंतर पूर्ण बहुमताचे सरकार स्थापन झाले.

10. फ्रेजाइल फाईव्ह कडून वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था

2013 मध्ये भारत जगातील पाच नाजूक अर्थव्यवस्थांपैकी (फ्रेजाइल फाईव्ह) एक मानला जात होता, महागाईचा दर सुमारे 10% होता. महागाईचे लक्ष्य, नादारी आणि दिवाळखोरी संहिता (**IBC**), वस्तू आणि सेवा कर (**GST**) या सुधारणांमुळे अनेक जागतिक संकटांच्या परिस्थितीनंतरही अर्थव्यवस्था वाढतच राहिली, 2027 या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत विकासाचा दर 7.8% राहिला.

11. व्यवसाय सुलभता

2014 मध्ये व्यवसाय सुलभतेच्या क्रमवारीत भारत 142 व्या स्थानावर होता. वस्तू आणि सेवा कर, डिजिटल मंजुऱ्या, मालवाहनाच्या विशेष मार्गिका, नादारी आणि दिवाळखोरी संहिता यांसारखी पावले उचलली गेल्यामुळे 2020 पर्यंत भारत 63 व्या स्थानावर पोहोचला.

12. बँकिंग क्षेत्राची स्वच्छता

फोन बँकिंग आणि एव्हरग्रीनींमुळे बँकांची खरी स्थिती लपवल्यासारखी होती. मालमत्ता गुणवत्ता पुनरावलोकनानंतर थकीत कर्जांचे प्रमाण सुमारे 15 टक्के असल्याचे समोर आले. 4**R** सुधारणांचे धोरण अमलात आणले गेले. नादारी आणि दिवाळखोरी संहितेने याला अधिक बळकटी दिली.

13. नक्षलवादाचा अंत

2010 च्या दंतेवाडा हल्ल्यात 76 जवान शहीद झाले होते, 2014 मध्ये 126 जिल्हे नक्षलग्रस्त होते. सुरक्षा विषयक मोहिमांसोबतच रस्ते, शाळा आणि बँकिंग सुविधा पोहोचल्या. मुख्य प्रवाहात परत येणाऱ्यांची संख्या वर्षाला 421 वरून वाढून 6558 झाली. मार्च 2026 पर्यंत एकही जिल्हा नक्षलग्रस्त राहिला नाही.

14. सार्वभौमत्वाचे रक्षण

2017 मध्ये डोकलाम इथे भारत आणि चीनचे सैन्य 73 दिवस समोरासमोर ठाकले होते आणि भारत मात्र मागे हटला नाही. 2020 मध्ये गलवान इथेही सैन्य ठाम उभे राहिले. राष्ट्र प्रथम हाच आधार बनला.

15. वस्तू आणि सेवा कर : एक देश, एक कर व्यवस्था

17 वर्षांचे प्रयत्न जुलै 2017 मध्ये वस्तू आणि सेवा कराच्या अंमलबजावणीने पूर्णत्वाला गेले. जुनी थकबाकी आणि महसूल वाढीच्या हमीवर सहमती झाली आणि देश एक सामायिक बाजारपेठ बनला.

16. ईशान्य भारत आणि कश्मीरपर्यंत दळणवळणीय जोडणी

सप्टेंबर 2025 मध्ये आयझॉल रेल्वेने जोडले गेले, जून 2025 मध्ये तब्बल 28 वर्षांनंतर उधमपूर - श्रीनगर - बारामुल्ला मार्ग सुरू झाला. चिनाब पुलामुळे कश्मीरच्या वाहतूक जोडणीला नवे बळ मिळाले.

17. ईशान्य भारतात शांतता

2019 नंतर 12 करारांमध्ये स्वायत्तता, मदत आणि पुनर्वसनाची तरतूद केली गेली. सुमारे 11 हजार बंडखोरांनी शस्त्रे खाली ठेवली, हिंसाचाराच्या घटनांचे प्रमाण 71 टक्क्याने कमी झाले आणि एप्रिल 2022 मध्ये बोडो लँडमधून सशस्त्र दले विशेष अधिकार कायदा (**AFSPA**) हटवण्यात आला.



18. दहशतवादाविरोधात नवे धोरण

2016 मधील सर्जिकल स्ट्राईक, 2019 मधील बालाकोट आणि मे 2025 मधील ऑपरेशन सिंदूर अंतर्गत एका रात्रीत पाकिस्तानचे नऊ तळ उद्ध्वस्त केले गेले. दहशतवादी हल्ल्याला लष्करी उत्तर दिले जाईल हे धोरण स्पष्ट झाले. दहशतवादी आणि त्यांना आश्रय देणारे यांना वेगळे मानले जाणार नाही.

19. कलम 370: एक देश, एक राज्यघटना

70 वर्षांपासून लागू असलेले कलम 370, 2019 या वर्षात हटवण्यात आले. राष्ट्रपतींचा आदेश, संसदेचा प्रस्ताव आणि पुनर्रचना कायदा एकाच दिवशी मंजूर झाले. सर्वोच्च न्यायालयाने डिसेंबर 2023 मध्ये ही प्रक्रिया वैध ठरवली, या बदलानंतर 2024 मध्ये विधानसभा निवडणुका पार पडल्या.

20. अयोध्येत श्रीराम मंदिर

पाच शतकांच्या प्रतीक्षेनंतर नोव्हेंबर 2019 मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर विवादित जागा मंदिराच्या उभारणीसाठी सोपवली गेली. 22 जानेवारी 2024 रोजी प्राणप्रतिष्ठा झाली आणि नोव्हेंबर 2025 मध्ये धर्मध्वजारोहणासह मुख्य बांधकाम पूर्ण झाले.

21. रेल्वे रुळांनी वाढवला भारताचा वेग

2008 मध्ये मंजूर झालेल्या मालवहनासाठीच्या विशेष मार्गिकेवर (फ्रेट कॉरिडॉर) 2014 पर्यंत एक किलोमीटरचाही मार्ग तयार झाला नव्हता. मात्र त्यानंतरच बांधकाम आणि गुंतवणुकीला वेग आला. नंतर 45,000 कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करून मालगाड्यांची वाहतुकीला गतिमानता दिली गेली, मात्र याआधी यासाठी केवळ 4,000 कोटी रुपये खर्च केले गेले होते.

22. दोन अब्ज लशींच्या मात्रा

भारत बायोटेक आणि आयसीएमआरने बनवलेली कोव्हॅक्सीन तसेच पुण्यातील कोविशील्डच्या उत्पादनामुळे जानेवारी 2021 मध्ये सुरु झालेल्या मोहीमेने दोन अब्ज लस मात्रांचा टप्पा गाठला. कोविनच्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रियेचे व्यवस्थापन केले गेले. यासोबतच भारताने सुमारे 100 देशांनाही लस पुरवली.

23. नद्यांचे सामर्थ्य

डिसेंबर 2024 मध्ये केन-बेतवा प्रकल्प सुरू झाला. याअंतर्गत बुंदेलखंडमधील 11 लाख हेक्टर जमिनीला सिंचनाखाली आणण्याचे लक्ष्य आहे. जलमार्गाद्वारे होणारी मालवाहतूक 2013-14 मधील 1.8 कोटी टनांवरून वाढून 2024-25 मध्ये 14.5 कोटी टनावर पोहोचली. एप्रिल 2025 मध्ये पहलगाम इथल्या हल्ल्यानंतर सिंधू पाणी करार स्थगित करण्यात आला.

24. रशिया-युक्रेन युद्ध

फेब्रुवारी 2022 मधील युद्धानंतर ऑपरेशन गंगा अंतर्गत तीन आठवड्यांत 22,500 भारतीयांना 90 विमानांद्वारे सुरक्षित बाहेर काढण्यात आले. रशियातून येणाऱ्या कच्च्या तेलाचा वाटा 2 टक्क्यांवरून वाढून एक तृतीयांश पर्यंत पोहोचला, यानंतरही महागाईचा दर दोन अंकी संख्येच्या खालीच राहिला.

25. पश्चिम आशियातील युद्ध

28 फेब्रुवारी 2026 नंतर होर्मुझ सामुद्रधुनी बंद झाल्याने ऊर्जा पुरवठ्यावर ताण वाढला, कारण अर्धे कच्चे तेल याच मार्गाने येत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इराण आणि अमेरिका या दोन्ही देशांशी संवाद साधला. आयात शुल्कात कपात आणि सततच्या पुरवठ्यामुळे अर्थव्यवस्थेचा वाढीचा दर 7.8 टक्के राहिला.



आज दहशतवाद पसरवणारे हताश झाले आहेत. पाकिस्तानने कोणतेही दुष्कृत्य केल्यास भारताचे लष्कर त्यांना घरात घुसून मारते. जम्मू कश्मीरपासून ईशान्य भारतापर्यंत शांतता वाढली आहे. माओवादी दहशतवाद आणि नक्षलवादाचे कंबरडे मोडले गेले आहे.

-नरेंद्र मोदी, पंतप्रधान

सुधारणा : भारताच्या शासन व्यवस्थेत सुधारणांचे पर्व

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 25 वर्षांच्या सुशासनमय वाटचालीने भारतात सुधारणांचे नवे पर्वच आणले आहे. या काळात गुजरातपासून ते केंद्र शासनाच्या अनेक क्षेत्रांअंतर्गत योजना, प्रक्रिया आणि काम करण्याच्या पद्धतींनाच बदलून टाकणारे संस्थात्मक बदल घडून आले आहेत. पाण्यापासून ते बँकिंगपर्यंत, करव्यवस्थेपासून ते कामगारांपर्यंत, शिक्षणापासून ते अंतराळापर्यंत आणि कायद्यापासून ते सामाजिक सुधारणांपर्यंत, या संबंधीच्या उपक्रमांमध्ये शासनाच्या कामाच्या पद्धतींमधील बदलाला केंद्रस्थानी ठेवले गेले.

गुजरातमध्ये झालेल्या सुधारणा

1. जल सुधारणा, 2003

दुष्काळाशी लढा देणाऱ्या गुजरातमध्ये बंधारे, शेततळी, पुनर्भरण विहिरी आणि कालव्यांना एकाच योजनेशी जोडण्यात आले. सुजलाम सुफलाम आणि सौनी या योजनांमुळे पाणी आणि सिंचनाची क्षमता वाढली. 2019 पर्यंत 1.85 लाखांपेक्षा जास्त बंधारे बांधले गेले.

2. निर्मल गुजरात, 2006

स्वच्छतेची जबाबदारी पंचायती, शाळा, महिला बचत गट आणि स्थानिक संस्थांपर्यंत झिरपली. हीच पद्धत पुढे स्वच्छ भारत अभियानाचा आधार बनली.

3. गुंतवणुकदारांसाठी एक खिडकी व्यवस्था, 2013

मंजुऱ्यांना एक खिडकी व्यवस्थेशी जोडण्याची सुरुवात झाली, नंतर ही प्रक्रिया राष्ट्रीय स्तरापर्यंत झिरपली. आज या व्यवस्थेच्या माध्यमातून 32 केंद्रीय मंत्रालये 33 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसोबत जोडली गेली आहेत.

4. गुजरातमध्ये बंदर क्रांती

समुद्रकिनाऱ्याला औद्योगिक पायाभूत सुविधांच्या रूपात विकसित केले गेले. बंदरांना रस्ते, रेल्वे, वीज आणि उद्योगांशी जोडले गेले. मुंद्रा, हजीरा आणि पिपावाव ही याची उदाहरणे ठरली आहेत.





हस्तांतरण, कृषी आणि मानवी भांडवल

5. प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण, 2014

जन-धन, आधार आणि मोबाईल (**JAM Trinity**) या त्रिसूत्रीच्या माध्यमातून लाभाची रक्कम थेट पडताळणी झालेल्या बँक खात्यांत पोहोचू लागली. 320 योजनांअंतर्गत 53 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम हस्तांतरित केली गेली, यामुळे 5 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त बचत झाल्याचा अंदाज आहे.

6. नीम युक्त युरिया, 2015

युरियावर कडुनिंबाचा थर दिल्याने त्याचा काळाबाजार आणि औद्योगिक वापरावर बंदी आली. शेतकऱ्यांसाठी युरियाची उपलब्धता वाढली आणि सरकारी तिजोरीचीही सुमारे 10,000 कोटी रुपयांची बचत झाल्याचा अंदाज आहे.

7. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण , 2020

29 जुलै 2020 रोजी या धोरणाला मंजूरी मिळाली. याअंतर्गत 1968 पासून लागू असलेल्या 10+2 रचनेऐवजी 5+3+3+4 ही नवी रचना स्वीकारली गेली. सुरुवातीच्या वर्षांचाही शिक्षण व्यवस्थेत अंतर्भाव केला गेला. कला, विज्ञान, वाणिज्य आणि व्यावसायिक शिक्षणातील कठोर निर्बंध शिथिल करण्यात आले.

8. राष्ट्रीय वैद्यकीय आयोग कायदा, 2019

वैद्यकीय शिक्षणाच्या नियमनाला बहु-परिषदीय व्यवस्थेत परावर्तीत केले गेले. वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या 2014 मधील 387 वरून वाढून 846 पेक्षा जास्त झाली. एमबीबीएस प्रवेशाच्या जागाही 51,348 वरून वाढून 1,39,864 पेक्षा जास्त आणि पदव्युत्तर प्रवेशाच्या जागा 30,191 वरून वाढून सुमारे 86,360 इतक्या झाल्या.



अर्थव्यवस्थेची पुनर्उभारणी

9. बँकिंग सुधारणा, 2014

मालमत्ता गुणवत्ता पुनरावलोकनामुळे बँकांची खरी स्थितीगती समोर आली. भांडवल वाढ, विलिनीकरण आणि दिवाळखोरी संबंधीत प्रक्रियेमुळे बँकिंग व्यवस्थेला बळकटी मिळाली.

10. उदार थेट परकीय गुंतवणूक धोरण, 2014

विविध क्षेत्रांत थेट परकीय गुंतवणुकीच्या मर्यादा आणि प्रक्रिया सोप्या करण्यात आल्या. 2014-25 मध्ये भारताने 748.78 अब्ज डॉलरची थेट परकीय गुंतवणुकीचे लक्ष्य साध्य केले.

11. फेमा आणि जागतिक वित्तीय एकात्मिकरण

परकीय चलन, परकीय कर्ज, परकीय गुंतवणूक आणि सीमेपलीकडील देशांतून होणाऱ्या व्यवहारांसाठीचे नियम सोपे केले गेले. यामुळे वैध स्वरुपाच्या उद्योग व्यवसायांसमोरील अडथळे कमी झाले. भारतीय कंपन्यांसाठी परदेशात व्यवसाय करणे सोपे झाले.

12. नादारी आणि दिवाळखोरी संहिता - आयबीसी, 2016

डबघाईस आलेल्या कंपन्यांसाठी कालबद्ध प्रक्रिया आणली गेली त्यामुळे कर्जपुरवठादारांची भूमिका मध्यवर्ती बनली. मार्च 2026 पर्यंत 1419 प्रकरणांमध्ये निवारणासंबंधीच्या योजनांना मंजुरी मिळाली. यामुळे सुमारे 4.32 लाख कोटी रुपये परत मिळाले.

13 वस्तू आणि सेवा कर, 2017

अनेक केंद्रीय आणि राज्य करांच्या जागी एक सामायिक कर व्यवस्था आणली. यामुळे भारत एक सामायिक बाजारपेठ बनला आणि नोंदणीकृत करदाते तसेच कर संकलनात वाढ झाली.

14. प्राप्तीकर सुधारणा, 2014

प्रत्यक्ष उपस्थितीशिवायच्या असेसमेंटमुळे करदाता आणि अधिकारी यांना थेट संपर्कात राहण्याची गरज कमी झाला. नव्या कर व्यवस्थेअंतर्गत तसेच 2025 च्या नव्या प्राप्तीकर कायद्या अंतर्गत दर, कलमे आणि प्रक्रियेचे सुलभीकरण केले गेले. 2025-26 च्या अर्थसंकल्पात 12 लाख रुपयांपर्यंतच्या वार्षिक उत्पन्नावर कोणताही प्राप्तीकर लागणार नसल्याची घोषणा केली, यासोबतच नोकरदार करदात्यांसाठी 75,000 रुपयांची मानक वजावट (**Standard Deduction**) मिळून ही मर्यादा 12.75 लाख रुपये केली गेली.

15. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची सुधारित व्याख्या, 2020 आणि 2025

गुंतवणूक आणि उलाढालीच्या संयुक्त मानकांमुळे लहान कंपन्यांच्या प्रगतीमधील अडथळे कमी झाले. यामुळे कंपन्यांना मिळणारे लाभ बंद होऊ नयेत यासाठी 2025 मध्ये या मर्यादा आणखी वाढवण्यात आल्या.

16. उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजना (पीएलआय), 2020

मार्च 2026 पर्यंत 2.40 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आली, आणि त्याचवेळी 20 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्तीचे उत्पादन झाले. 15.2 लाख कोटी रुपयांच्या वस्तूंची निर्यात झाली. तसेच सुमारे 14 लाख रोजगारांचीही निर्मिती झाली.

“भारताच्या धोरणात्मक निर्णयांना मिळालेला हा वेग जगातील इतर देशही पाहत आहेत, समजून घेत आहेत. म्हणूनच ते भारतासोबत आपली भागीदारी विस्तारत आहेत. गेल्या दशकभराच्या काळात सुमारे 40 देशांसोबत व्यापारी करार झाले आहेत.

-नरेंद्र मोदी, पंतप्रधान



कायदा, न्याय आणि दैनंदिन जीवनमान सुलभता

17. वाणिज्यिक न्यायालय, 2015

व्यावसायिक खटल्यांचा निपटारा करण्यासाठी वेगळी व्यवस्था, निश्चित कालबद्ध सीमा आणि इलेक्ट्रॉनिक प्रक्रिया सुरू झाल्या आहेत. शहरी भागात खटल्यांचा निपटारा करण्यासाठीचा कालावधी आता वर्षांवरून कमी होऊन महिन्यांवर आला आहे. न्याय विभागानुसार, दिल्लीत निकालांचा कालावधी 424 दिवस आणि मुंबईमध्ये 306 दिवस इतका झाला आहे.

18. जुने कायदे रद्दबातल आणि जन विश्वास कायदा, 2023

2014 पासून आतापर्यंत, केंद्र सरकारमधील 1500 पेक्षा अधिक कालबाह्य कायदे रद्द करण्यात आले आहेत. 183 तरतुदी फौजदारी गुन्ह्यांच्या श्रेणीतून बाहेर काढत, छोट्या तांत्रिक चुकांसाठी आता दिवाणी खटले आणि दंडाची तरतूद करण्याचा मार्ग स्वीकारला गेला.

19. भारतीय न्याय संहिता, 2023

भारतीय न्याय संहितेने 1860 च्या भारतीय दंड संहितेची जागा घेतली असून, 1 जुलै 2024 पासून हे नवे कायदे लागू झाले आहेत. या नव्या संहिता वसाहतवादी मानसिकतेतून स्वातंत्र्याचा पर्याय ठरल्या. महिला आणि मुलांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांवर अंकुश लावण्यास प्राधान्य देण्यात आले. संघटित गुन्हेगारी, दहशतवाद आणि जमावाने केलेली हिंसा याविरोधात कडक तरतुदी करण्यात आल्या आहेत.

20. श्रम संहिता, 2025

एकूण 29 जुन्या श्रम कायद्यांच्या जागी वेतन, औद्योगिक संबंध, सामाजिक सुरक्षा आणि कार्यस्थळावरील सुरक्षा यांच्याशी संबंधित चार संहिता लागू करण्यात आल्या आहेत. यामुळे कायद्यांचे अनुपालन सुलभ झाले असून गिग-प्लॅटफॉर्मवरील कामगारही सामाजिक सुरक्षेच्या कक्षेत आले आहेत

धोरणात्मक क्षमता

21. अंतराळ क्षेत्रातील सुधारणा, 2020

खाजगी क्षेत्रासाठी अंतराळविषयक कामांचे मार्ग खुले करण्यात आले आहेत. इन-स्पेसच्या (**IN-SPACe**) माध्यमातून संस्थागत व्यवस्था तयार करण्यात आली आहे. 2026 पर्यंत सुमारे 440 नोंदणीकृत स्टार्ट-अप संस्था समोर आल्या असून खाजगी गुंतवणूक 618 दशलक्ष डॉलर्सपेक्षा अधिक झाली आहे. 18 जुलै 2026 रोजी स्कायमार्कच्या विक्रम-1 ने श्रीहरिकोटा येथून झेप घेतली आणि पहिल्याच प्रयत्नात ते आपल्या कक्षेत पोहोचले.

22. संरक्षण क्षेत्रातील सुधारणा, 2020

संरक्षण उत्पादनात भारतीय बनावटीला व उत्पादनाला प्राधान्य देण्यात आले. संरक्षण निर्यात वर्ष 2013-14 च्या सुमारे 680 कोटी रुपयांवरून वाढून 38,400 कोटी रुपयांपेक्षा अधिक झाली. शस्त्रास्त्रे आयात करणारा देश आता त्यांचा प्रमुख निर्यातदार बनला आहे.

23. सेमीकंडक्टर अभियान, 2021

भारतात चिप फॅब्रिकेशन, पॅकेजिंग आणि डिझाइनची संपूर्ण मूल्यसाखळी विकसित करण्याची योजना आखण्यात आली आहे. सुमारे 1.6 लाख कोटी रुपये खर्चाच्या 10 प्रकल्पांना मंजुरी मिळाली आहे. हे प्रकल्प गुजरात, आसाम आणि इतर राज्यांत विस्तारले असून, त्यामुळे एकापेक्षा अधिक भागांत ही क्षमता विकसित होत आहे.

सामाजिक सुधार

24. तीन तलाक, 2019

तात्काळ तिहेरी तलाक पद्धत रद्द ठरवून दंडनीय गुन्हा करण्यात आला. तसेच पोटगी आणि अल्पवयीन मुलांच्या संरक्षणाची तरतूद करण्यात आली. कायदा लागू झाल्यानंतर एका वर्षात अशा प्रकरणांच्या नोंदीत 82 टक्के घट झाली. या कायद्यामुळे दीर्घकाळ कायदेशीर संरक्षणापासून वंचित राहिलेल्या महिलांना घटनात्मक संरक्षण मिळाले.

25. वक्फ सुधारणा कायदा, 2025

वक्फ मालमत्तेशी संबंधित दाव्यांची चौकशी आणि अपीलाची व्यवस्था अधिक सक्षम करण्यात आली. सरकारी जमिनीवरील दाव्यांची चौकशी वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत करण्याची तसेच उच्च न्यायालयात दाद मागण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. आता वक्फविषयक दावेही पुराव्यांच्या आधारे निकाली निघतील.





नव्या भारताच्या भव्य निर्माणाची गाथा

शासनप्रमुख म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 25 वर्षांच्या प्रवासाकडे 'भारताच्या पायाभूत वास्तूरचनेचा सुवर्णकाळ' म्हणून पाहिले जाते. या काळात देशात झालेल्या अनेक भव्य निर्माणकार्यांनी भारताच्या बदलत्या विकासयात्रेचे अभिमानास्पद चित्र साकारले आहे. पूल आणि बोगद्यांपासून ते विमानतळ, बंदरे, शहरी वाहतूक, संसद, स्मारके, संग्रहालये, तीर्थक्षेत्रे आणि स्मार्ट शहरे यांपर्यंत विस्तारलेल्या या प्रकल्पांनी संपर्क, सुविधा, वारसा आणि भविष्यातील गरजा यांचा एकत्रित विचार केला आहे. या बांधकामांची ही विविधताच त्यांना 'नव्या भारताची भव्य वास्तूरचना' आणि विकासाच्या नकाशावरील महत्त्वाचे टप्पे म्हणून अधोरेखित करते.

1. **बोगीबील आणि डॉ. भूपेन हजारिका सेतू - ईशान्य भारतातील सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा संपर्क:** ब्रह्मपुत्रा नदीवरील 4.94 किलोमीटर लांबीचा बोगीबील पूल हा भारतातील सर्वांत लांब संयुक्त रेल्वे-रस्ते पूल आहे. 25 डिसेंबर 2018 रोजी उद्घाटन झालेल्या या पुलामुळे दिब्रुगड-इटानगरदरम्यानचे रस्त्याचे अंतर 150 किलोमीटरने, तर रेल्वेचे अंतर सुमारे 200 किलोमीटरने कमी झाले. त्याचप्रमाणे, 9.15 किलोमीटर लांबीच्या डॉ. भूपेन हजारिका सेतूमुळे वरच्या आसामला पूर्व अरुणाचल प्रदेशाशी जोडणारी कायमस्वरूपी रस्ते सुविधा मिळाली. भूपेन हजारिका सेतूमुळे दोन्ही राज्यांतील अंतर सुमारे 165 किलोमीटरने कमी झाले. हे दोन्ही पूल लष्करी वाहतुकीच्या गरजा लक्षात घेऊन बांधण्यात आले आहेत.

2. **अटल सेतू आणि सुदर्शन सेतू-सागरी संपर्काचे नवे आयाम:** मुंबईतील 21.8 किलोमीटर लांबीचा सहापदरी 'अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतू' हा भारतातील सर्वांत लांब सागरी सेतू आहे. यामुळे शिवडी ते न्हावा शेवा प्रवासाचा कालावधी सुमारे दोन तासांवरून अवघ्या 20 मिनिटांवर आला आहे. गुजरातमधील 2.32 किलोमीटर लांबीचा सुदर्शन सेतू हा भारतातील सर्वांत लांब केबल-स्टेड पूल आहे. या पुलामुळे बेट द्वारकेसाठी कायमस्वरूपी रस्ते संपर्क उपलब्ध झाला आहे. द्वारकेकडे जाणाऱ्या या पुलाच्या पादचारी मार्गांवर भगवद्गीतेतील श्लोक आणि डेकवर सुमारे 1 मेगावॅट क्षमतेचे सौर पॅनेल बसवण्यात आले आहेत.

3. **चिनाब आणि अंजी खड्ड -काश्मीरला रेल्वेने जोडणारी संपर्क व्यवस्था** नदीपात्रापासून 359 मीटर उंच आणि 1,315 मीटर लांबीचा चिनाब रेल्वे पूल हा जगातील सर्वांत उंच रेल्वे कमान पूल आहे. 6 जून 2025 रोजी त्याचे उद्घाटन झाल्यानंतर काश्मीर रेल्वे मार्गावरील दुर्गम भागाचा संपर्क पूर्ण झाला. याच दिवशी अंजी खड्ड पूलही सुरू करण्यात आला. हा भारतातील पहिला केबल-स्टेड रेल्वे पूल आहे. 725 मीटर लांबीच्या या पुलाचा **Y**-आकाराचा तोलखांब (पायलॉन) 193 मीटर उंच आहे.

4. **नवीन पंबन पूल-समुद्रावर आधुनिक रेल्वे संपर्क** भारताच्या पहिल्या व्हर्टिकल-लिफ्ट रेल्वे सागरी पुलामुळे रामेश्वरमचा मुख्य भूमीशी रेल्वे संपर्क पुन्हा प्रस्थापित झाला आहे. 550 कोटी रुपये खर्चून बांधलेल्या या पुलाचा 72.5 मीटरचा नेव्हिगेशनल स्पॅन 17 मीटरपर्यंत वर उचलता येतो. विशेष कोटिंग असलेल्या स्टेनलेस स्टील रिइन्फोर्समेंटचा वापर करून सागरी वातावरणापासून पुलाचे दीर्घकालीन संरक्षण करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

5. **अटल बोगदा आणि सेला बोगदा: सीमावर्ती भागांना वर्षभर संपर्क :** 9.02 किलोमीटर लांबीच्या अटल बोगद्यामुळे लाहौल-स्पितीला वर्षभर दळणवळणाची सुविधा मिळाली असून मनाली ते सरचू हे अंतर 46 किलोमीटरने कमी झाले आहे. सेला बोगद्यामुळे मुसळधार हिमवृष्टीच्या काळातही तवांगला वर्षभर अखंड संपर्क उपलब्ध झाला आहे. या बोगद्याची लांबी 1,555 मीटर असून 8.6 किलोमीटरचे जोडरस्तेही विकसित करण्यात आले आहेत.



6. **केम्पेगौडा आणि गुवाहाटी विमानतळ- वाढती विमान वाहतूक क्षमता:** बंगळुरू विमानतळाच्या टर्मिनल-2 मुळे वार्षिक प्रवासी क्षमता सुमारे 2.5 कोटींवरून 5 ते 6 कोटींपर्यंत वाढली आहे. ग्रीन वॉल, हँगिंग गार्डन आणि आउटडोअर गार्डन ही त्याची वैशिष्ट्ये आहेत; तर गुवाहाटीच्या नव्या टर्मिनलमुळे प्रवासी क्षमता 34 लाखांवरून 1.3 कोटींहून अधिक झाली आहे. या टर्मिनलमध्ये सुमारे 140 मेट्रिक टन बांबू आणि जवळपास 1 लाख देशी वनस्पतींचा समावेश असलेले 'स्काय फॉरेस्ट' साकारण्यात आले आहे.

7. **जेवर आंतरराष्ट्रीय विमानतळ- एनसीआरचे दुसरे प्रमुख विमान वाहतूक केंद्र:** 11,200 कोटी रुपये खर्चाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन 28 मार्च 2026 रोजी झाले. इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील वाढता ताण कमी करणे आणि पश्चिम उत्तर प्रदेशातील हवाई संपर्काच्या गरजा पूर्ण करण्याच्या उद्देशाने हे विमानतळ उभारण्यात आले आहे. पूर्ण क्षमतेने विकसित झाल्यानंतर भारतातील सर्वांत मोठ्या विमानतळांमध्ये त्याचा समावेश होईल.

8. **विझिंजम बंदर-भारताचे सागरी ट्रान्सशिपमेंट केंद्र:** 2 मे 2025 रोजी लोकार्पण झालेले विझिंजम हे भारतातील पहिले समर्पित कंटेनर ट्रान्सशिपमेंट आणि पहिले अर्ध-स्वयंचलित बंदर आहे. सुमारे 20 मीटरच्या नैसर्गिक खोलीमुळे (ड्राफ्ट) मोठ्या मालवाहू जहाजांना येथे थेट प्रवेश मिळतो. परदेशी बंदरांवर होणारे ट्रान्सशिपमेंट भारतात खेचून आणणे आणि त्यातून मिळणारा महसूल देशातच राखण्याच्या उद्देशाने हे बंदर विकसित करण्यात आले आहे.

9. **कोची वॉटर मेट्रो आणि नमो भारत: शहरी वाहतुकीची नवी मॉडेल्स:** कोची वॉटर मेट्रो ही भारतातील पहिली जल-मेट्रो आहे. यात 78 बॅटरी-इलेक्ट्रिक हायब्रिड नौका असून, त्या 15 मार्गांवरील 38 टर्मिनल्सना जोडतात. इतक्या मोठ्या व्याप्तीचे हे जगातील पहिले बॅटरी ऊर्जेवर चालणारे वॉटर मेट्रो नेटवर्क ठरले आहे. दुसरीकडे, 82.15 किलोमीटर लांबीच्या दिल्ली-गाझियाबाद-मेरठ 'नमो भारत' आरआरटीएसची रचना ताशी 180 किलोमीटरच्या कमाल वेगासाठी करण्यात आली आहे.

10. **नमो घाट आणि वाराणसी मल्टी-मॉडल टर्मिनल नदीमार्गे संपर्क :** 95 कोटी रुपये खर्चून विकसित करण्यात आलेल्या नमो घाटावर व्ह्यूइंग डेक, कॅफेटेरिया, हेरिटेज म्युरल आणि क्रूझ बर्थ उभारण्यात आले आहेत. वाराणसी मल्टी-मॉडल टर्मिनल हे राष्ट्रीय जलमार्ग-1 वरील पहिले टर्मिनल आहे. येथून 1500 ते 2000 टन क्षमतेची जहाजे वाहतूक करू शकतात. याच ठिकाणाहून स्वातंत्र्यानंतरची देशातील पहिली अंतर्देशीय जलमार्ग कंटेनर सेवा सुरू झाली.

11. **स्वर्णिम संकुल आणि नवीन संसद भवन- सुशासनाचा नवा परिसर:** गांधीनगरचे स्वर्णिम संकुल हे राज्यातील सर्व प्रशासकीय विभागांना एकाच छताखाली आणणारा प्रकल्प आहे. यामुळे सामायिक सेवा आणि प्रशासकीय कामकाज सुलभ झाले. नवी दिल्लीतील नवीन संसद भवनाच्या त्रिकोणी वास्तूमध्ये लोकसभेसाठी 888 आणि राज्यसभेसाठी 384 आसनांची व्यवस्था आहे. 28 मे 2023 रोजी उद्घाटन झालेल्या या संसदेत देशातील विविध राज्यांतील वैशिष्ट्यपूर्ण कलाकुसर, स्थापत्य आणि ऐतिहासिक 'सेंगोल'ची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.

12. **सेंट्रल व्हिस्टा-कर्तव्य पथ, कर्तव्य भवन आणि सेवा तीर्थ:** केवळ 19 महिन्यांत पुनर्विकसित करण्यात आलेल्या कर्तव्य पथाचे उद्घाटन 8 सप्टेंबर 2022 रोजी झाले. कर्तव्य भवन-3 आणि सेवा तीर्थ सुरू झाल्यानंतर भाडेतत्त्वावरील विविध इमारतींमध्ये कार्यरत असलेल्या मंत्रालयांना एकाच सचिवालयात आणण्याची प्रक्रिया सुरू झाली. कर्तव्य भवन-3 ची रचना पारंपरिक इमारतींच्या तुलनेत 30 टक्के कमी ऊर्जा वापर लक्षात घेऊन करण्यात आली आहे.



13. **स्टॅच्यू ऑफ युनिटी-राष्ट्रभावनेचे विराट प्रतीक** 182 मीटर उंचीची ही जगातील सर्वांत उंच प्रतिमा आहे. 31 ऑक्टोबर 2018 रोजी लोकार्पण करण्यात आलेल्या या स्मारकाची उंची गुजरात विधानसभेच्या 182 जागांचे प्रतिनिधित्व करते. देशभरातील शेतकऱ्यांनी जुन्या शेती अवजारांमधून गोळा करून पाठवलेल्या लोखंडाचा वापर या भव्य प्रकल्पात करण्यात आला आहे.

14. **राष्ट्रीय युद्ध स्मारक आणि राष्ट्रीय पोलीस स्मारक बलिदानाला अभिवादन :** स्वातंत्र्योत्तर काळात देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या सैनिकांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेले 'राष्ट्रीय युद्ध स्मारक' हे देशातील पहिले स्मारक आहे; त्यावर 25,942 शूरवीरांची नावे कोरलेली आहेत. त्याचप्रमाणे 'राष्ट्रीय पोलीस स्मारक' हे कर्तव्य बजावताना हुतात्मा झालेल्या पोलिसांना समर्पित पहिले स्मारक असून, त्याच्या 'वॉल ऑफ व्हेलोर'वर हुतात्मा पोलिसांची नावे कोरण्यात आली आहेत.

15. **स्मृतिवन आणि जालियनवाला बाग- संकटाची स्मृती आणि इतिहास:** भुज येथे 470 एकरांहून अधिक क्षेत्रात विकसित करण्यात आलेल्या 'स्मृतीवन'मध्ये भूकंपातील 13,000 हून अधिक मृतांची नावे, 3 लाखांहून अधिक वृक्षांचे मियावाकी वन आणि 5**D** सिस्मिक सिम्युलेटर उभारण्यात आले आहे. अमृतसरच्या पुनर्विकसित जालियनवाला बागेत जनरल डायरच्या सैनिकांनी प्रवेश केलेल्या ऐतिहासिक मार्गाचे जतन शिल्पांच्या माध्यमातून करण्यात आले असून, नवीन दालने व लेझर लाइट-अँड-साउंड शोची सुविधा जोडण्यात आली आहे.

16. **नालंदा विद्यापीठ- ज्ञानपरंपरेचा आधुनिक विस्तार:** 455 एकरांत विस्तारलेल्या या नवीन संकुलाचे उद्घाटन 19 जून 2024 रोजी झाले. सौरऊर्जेवर चालणाऱ्या या नेट-झिरो संकुलात 2,000 क्षमतेचे ॲम्फीथिएटर आणि 100 एकरांपेक्षा मोठे कमल सागर आहे. पावसाच्या पाण्याच्या पुनर्वापरासाठी बिहारमधील पारंपरिक 'आहर-पाइन' जलप्रणालीचा वापर करण्यात आला आहे.



17. **प्रधानमंत्री संग्रहालय आणि दांडी कुटीर-इतिहासाचे आधुनिक सादरीकरण:** 14 एप्रिल 2022 रोजी खुले करण्यात आलेले 'प्रधानमंत्री संग्रहालय' हे भारताच्या प्रत्येक पंतप्रधानांच्या योगदानाला समर्पित देशातील पहिले संग्रहालय आहे. आधुनिक होलोग्राफी आणि डिजिटल दालनांच्या माध्यमातून स्वतंत्र भारताचा प्रवास येथे मांडण्यात आला आहे. गांधीनगरच्या दांडी कुटीरमध्ये 41 मीटर उंच शंकूच्या आकाराच्या घुमटात 3**D** मॅपिंग आणि 360-डिग्री प्रोजेक्शनद्वारे महात्मा गांधींच्या जीवनकार्याचा पट उलगडला आहे.

18. **आदिवासी स्वातंत्र्यसैनिक संग्रहालय आणि राष्ट्रीय सागरी वारसा संकुल:** स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासींच्या बलिदानाला समर्पित राष्ट्रीय संग्रहालय योजनेअंतर्गत प्रस्तावित 11 संग्रहालयांपैकी 2026 पर्यंत 4 संग्रहालये सुरू झाली आहेत; पहिले संग्रहालय रांची येथील जुन्या मध्यवर्ती कारागृहात उभारले गेले. तसेच लोथल (गुजरात) येथे उभारण्यात येत असलेले 'राष्ट्रीय सागरी वारसा संकुल' भारताच्या 4,500 वर्षांच्या प्राचीन सागरी वैभवाला समर्पित आहे.

19. **महात्मा मंदिर, भारत मंडपम आणि यशोभूमी - आंतरराष्ट्रीय परिषद क्षमतेचा विस्तार:** गांधीनगरचे महात्मा मंदिर सुमारे 40 एकर जागेत पसरलेले असून मुख्य सभागृहाची क्षमता 6,000 लोकांची आहे. नवी दिल्लीतील 'भारत मंडपम'मध्ये 7,000 क्षमतेचे सभागृह आणि 3,000 क्षमतेचे खुले ॲम्फीथिएटर आहे; तर 'यशोभूमी'मध्ये 1.07 लाख चौरस मीटरपेक्षा मोठे प्रदर्शन क्षेत्र आणि एकाच वेळी 11,000 हून अधिक प्रतिनिधी सामावून घेणारी परिषद दालने आहेत.

20. **रुद्राक्ष आणि नरेंद्र मोदी स्टेडियम-संस्कृतीपासून क्रीडा जगतापर्यंत:** वाराणसीचे रुद्राक्ष आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि संमेलन केंद्र हे शिवलिंगाच्या आकारात साकारण्यात आले असून त्यावर 108 ॲल्युमिनियम रुद्राक्ष लावण्यात आले आहेत. 1,200 क्षमतेचे हे केंद्र भारत-जपान मैत्री आणि वास्तुशास्त्राचा उत्तम नमुना आहे. तसेच अहमदाबादमधील 'नरेंद्र मोदी स्टेडियम' हे 1,32,000 आसनक्षमतेसह जगातील सर्वांत मोठे क्रिकेट स्टेडियम ठरले आहे.

21. साबरमती रिव्हरफ्रंट आणि कांकरिया तलाव-**नागरी सार्वजनिक जागांचे पुनरुज्जीवन:** साबरमती रिव्हरफ्रंट प्रकल्पाअंतर्गत 205 हेक्टर भागाचा कायापालट करून 11.25 किलोमीटर लांबीचा आधुनिक नदीकिनारा विकसित करण्यात आला आहे. त्यावरील पतंगाच्या आकाराचा 300 मीटर लांबीचा 'अटल पादचारी पूल' प्रमुख आकर्षण आहे. तसेच 15 व्या शतकातील कांकरिया तलावाचा जीर्णोद्धार करून 2.3 किलोमीटरचा लेकफ्रंट व कौटुंबिक मनोरंजनाचे केंद्र तयार करण्यात आले आहे.

22. काशी विश्वनाथ धाम आणि महाकाल लोक- **तीर्थक्षेत्रांना आधुनिक रूप:** काशी विश्वनाथ धाम कॉरिडोअरद्वारे 23 ऐतिहासिक वास्तूंचा जीर्णोद्धार करून ललिता घाट थेट मंदिराशी जोडण्यात आला, ज्यामुळे भाविकांचा गंगास्नान ते दर्शन हा प्रवास सुलभ झाला. उज्जैनचा 900 मीटर लांबीचा 'महाकाल लोक' 108 बलुआ दगडी स्तंभांनी नटलेला असून, त्यावर भगवान शंकराच्या आनंद तांडवाच्या विविध मुद्रा कोरण्यात आल्या आहेत.

23. केदारनाथ, सोमनाथ आणि अंबाजी-**वारसा आणि विकासाचा संगम:** 2013 च्या प्रलयंकारी पुरानंतर केदारनाथ धामचा आपदा-रोधक रचनेसह पुनर्विकास करण्यात आला; तेथे 35 टन वजनाची आदि शंकराचार्यांची भव्य समाधी मूर्ती स्थापित करण्यात आली आहे. सोमनाथमध्ये 1.48 किलोमीटरचा 'समुद्र दर्शन पथ' तयार करण्यात आला आहे. अंबाजी येथे 1,632 कोटी रुपयांच्या शक्ती कॉरिडोअरअंतर्गत मंदिर, गब्बर पर्वत आणि मानसरोवर यांना जोडणाऱ्या आधुनिक सुविधा, वाहनतळ आणि यात्री निवासांचे काम वेगाने सुरू आहे.

24. त्रिपुरा सुंदरी आणि श्रीराम जन्मभूमी मंदिर -**श्रद्धा आणि नवसंस्कृतीचे प्रकटीकरण :** त्रिपुरातील माता त्रिपुरा सुंदरी मंदिराजवळ 51 शक्तिपीठांच्या प्रतिकृती असलेले विशेष उद्यान उभारण्यात आले आहे. अयोध्येतील भव्य श्रीराम मंदिरात 22 जानेवारी 2024 रोजी प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न झाला. मंदिराच्या मूळ गर्भगृह रचनेत लोखंडाचा लवलेशही नसून, संपूर्ण बांधकाम पारंपरिक शिल्पकला आणि सर्वोत्तम अशा बन्सी पहाडपूरच्या दगडात साकारण्यात आले आहे.

25. गिफ्ट सिटी, धोलेरा आणि चरंका- **भविष्यातील अर्थव्यवस्था व हरित ऊर्जा:** 'गिफ्ट सिटी' (**GIFT City**) हे देशातील पहिले आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र (**IFSC**) आणि हरित स्मार्ट शहर आहे; जिथे डिस्ट्रिक्ट कुलिंग आणि स्वयंचलित कचरा व्यवस्थापन यंत्रणा कार्यरत आहे. धोलेरा विशेष गुंतवणूक क्षेत्रात पायाभूत सुविधा आधी उभारून नंतर उद्योगांना भूखंड दिले जात असून, 2024 चा सेमीकंडक्टर प्रकल्प हा त्याचा मुख्य आधार आहे. तसेच पाटण येथील चरंका सोलर पार्क हे देशातील मोठ्या प्रमाणावरील सौरऊर्जा निर्मितीचे सामायिक पायाभूत मॉडेल ठरले आहे.





25 उपक्रम लोकसेवेपासून लोकसहभागापर्यंत..

गुजरातमधून सुरू झालेल्या विकास आणि सुशासनाच्या प्रवासात अनेक असे लोककल्याणकारी उपक्रम राबवण्यात आले, ज्यांमुळे शासकीय सेवा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचल्या, संधींचा विस्तार झाला आणि जनजीवन अधिक सुकर बनले. या 25 वर्षांच्या प्रवासाचे सार म्हणजे: सुशासनातून सेवा, सेवेतून सशक्तीकरण आणि सशक्तीकरणातून विकसित भारताकडे वाटचाल. या प्रवासातील प्रमुख 5 उपक्रम:

1. कन्या शिक्षण आणि शाळा प्रवेशोत्सव

जीईआरमध्ये लक्षणीय सुधारणा; गळतीचे प्रमाण नगण्य

- वर्ष 2003 मध्ये सुरू झालेली ही मोहीम केवळ प्रशासकीय न राहता एक व्यापक लोकचळवळ ठरली. मंत्री, सनदी अधिकारी आणि शिक्षकांनी प्रत्यक्ष खेडोपाडी जाऊन पालकांशी संवाद साधत मुलांना, विशेषतः मुलींना शाळेत आणण्यासाठी प्रोत्साहित केले.

2. स्वागत (SWAGAT)

लाखो तक्रारींचे 99 टक्के थेट निवारण

- वर्ष 2003 मध्ये सुरू झालेल्या 'स्वागत' या ऑनलाइन तक्रार निवारण प्रणालीमुळे सर्वसामान्य नागरिकांना थेट मुख्यमंत्र्यांसमोर गाऱ्हाणे मांडण्याची पारदर्शक संधी मिळाली. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जनतेच्या 99 टक्के अडचणी सोडवून या उपक्रमाने नागरिक व प्रशासन यांच्यात विश्वासाचा सेतू बांधला.

3. ज्योतिग्राम योजना

18,000 हून अधिक गावांना अखंड वीजपुरवठा

- 2006 मध्ये फीडर विलगीकरणाचा क्रांतिकारी प्रयोग राबवून शेतीसाठी आणि घरगुती वापरासाठी वीजवाहिन्या स्वतंत्र करण्यात आल्या. यामुळे 18,000 हून अधिक गावांमध्ये चोवीस तास थ्री-फेज अखंड वीजपुरवठा शक्य झाला आणि कृषी वीज अनुदानावरील अनावश्यक ताणही घटला.

4. गरीब कल्याण मेळावे

आतापर्यंत 36,800 कोटी रुपयांहून अधिक; 1.66 कोटी लाभार्थी; 1600 हून अधिक मेळावे

वर्ष 2009 मध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाने लालफितीचा कारभार आणि मध्यस्थांची साखळी मोडून काढत सरकारी योजनांचे थेट वाटप केले. आतापर्यंत झालेल्या 1600 हून अधिक मेळाव्यांतून 1.66 कोटी लाभार्थ्यांना 38,800 कोटी रुपयांहून अधिक रकमेचे थेट लाभ हस्तांतरित करण्यात आले आहेत.

5. वनबंधू कल्याण योजना

आदिवासी विकासाचे 10-सूत्री गतिमान अभियान

वर्ष 2007 मध्ये सुरू करण्यात आलेल्या या व्यापक कार्यक्रमाने आदिवासी पट्ट्यातील विकासाला गती दिली. शिक्षण, आरोग्य, पक्की घरे, कौशल्य विकास, सिंचन आणि विद्युतीकरण या सुविधा एकाच छत्राखाली आणून वनवासी समुदायाला देशाच्या मुख्य प्रवाहात सन्मानाचे स्थान मिळवून दिले.



"मी छोटी आणि सुलभ उद्दिष्टे घेऊन चालणारी व्यक्ती नाही, मी संपूर्ण देशासाठी मोठे उद्दिष्ट ठेवतो आणि ते साध्य करण्यासाठी जिवाचे रान करून मेहनत घेतो.

-नरेंद्र मोदी, पंतप्रधान



6. सागरखेड सर्वांगीण विकास योजना

60 लाख लोक 3,000 किनारपट्टीवरील गावे

- 2007 मध्ये सुरू झालेल्या या योजनेअंतर्गत 3,000 किनारी गावे आणि 60 लाखांहून अधिक लोकांसाठी पायाभूत सुविधा, उपजीविका, सिंचन, क्षारता नियंत्रण, मत्स्यव्यवसाय आणि किनारी संरक्षण यांचा एकत्रित समावेश करण्यात आला. मच्छिमारांना जीपीएस, सुरक्षा उपकरणे, सौर दिवे आणि आपत्कालीन सूचना यांसारख्या सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या.

7. जन धन आणि थेट बँक हस्तांतरण

59 कोटीहून अधिक खाती. 3.17 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त ठेवी

- 2014 मध्ये प्रधानमंत्री जनधन योजनेमुळे बँकिंग सेवा प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचवण्याची मोहीम सुरु झाली. सप्टेंबर 2026 पर्यंत 59 कोटींहून अधिक खाती उघडण्यात आली आणि 3.17 लाख कोटी रुपयांहूनअधिक ठेवी जमा झाल्या. डीबीटीमुळे निधी थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात आला. 53.24 लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम हस्तांतरित करण्यात आली आणि अंदाजे 5 लाख कोटी रुपयांची बचत झाली.

8. मेक इन इंडिया

20 लाख कोटी रुपयांहून अधिक उत्पादन, पीएलआयमुळे 14 लाखांहून अधिक रोजगार

- पीएलपीएलआय म्हणजेच उत्पादनाशी निगडित प्रोत्साहन योजना, सेमी कंडक्टर आणि घटक उत्पादन कार्यक्रमांसह विविध उपक्रमांमुळे इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन 2014-15 मधील 1.9 लाख कोटी रुपयांवरून, 2025-26 मध्ये 13.11 लाख कोटी रुपयांपर्यंत वाढले. पीएलआयच्या 14 क्षेत्रांमध्ये 14 लाखांहून अधिक रोजगार निर्मिती झाली.



9. स्वच्छ भारत मिशन

12 कोटींहून अधिक शौचालय निर्मिती

- 2014 मध्ये सुरु केलेल्या या मोहिमेने स्वच्छतेला जनआंदोलनाचे स्वरूप दिले. 12 कोटींहून अधिकघरगुती शौचालये बांधण्यात आली आणि 2019 पर्यंत गावे हागणदारीमुक्त म्हणून घोषित करण्यात आली. स्वच्छ सर्वेक्षणामुळे शहरे आणि नगरांमध्ये निरोगी स्पर्धा तसेच नागरिकांचा सहभाग वाढण्यास प्रोत्साहन मिळाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2 ऑक्टोबर 2014 रोजी स्वतः झाडू हातात घेऊन पुढाकार घेत या मोहिमेचे नेतृत्व केले.

10. सामाजिक सुरक्षा

94 कोटी लोग, सामाजिक सुरक्षेची व्याप्ती: 64.3%

- प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना आणि ई-श्रम यांसारख्या उपक्रमांमुळे औपचारिक रोजगाराच्या कक्षेबाहेर असलेल्या लोकांपर्यंत सामाजिक सुरक्षा पोहोचवण्यात आली. 2025 पर्यंत 94.3 कोटी भारतीय सामाजिक सुरक्षेच्या कक्षेत आले, ज्यामुळे सामाजिक सुरक्षेची व्याप्ती 2015 मधील 19% वरून वाढून 64.3% झाली.
- नोव्हेंबर 2023 मध्ये सुरू करण्यात आलेले प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (पीएम-जनमन) भारतामधील 75 विशेषतः असुरक्षित आदिवासी समूह (**PVTGs**) विकासाच्या प्रवाहापासून वंचित राहू नयेत, याची खात्री करण्यासाठी हे एक केंद्रित अभियान आहे. यासाठी 24,000 कोटी रुपयांहून अधिक निधीची तरतूद करण्यात आली आहे.

11. सागरमाला कार्यक्रम

845 हून अधिक प्रकल्प,16 लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक

- 2015 मध्ये सुरू झालेल्या सागरमाला योजनेचा उद्देश बंदरांना रस्ते, रेल्वे, उद्योग आणि किनारपट्टीवरील समुदायांशी जोडणे हा आहे. 6.06 लाख कोटी रुपये किमतीचे 845 हून अधिक प्रकल्प निश्चित करण्यात आले असून, त्यापैकी 315 प्रकल्प पूर्ण झाले आहेत. प्रमुख बंदरांवर जहाजांचा सरासरी 'टर्न अराउंड' वेळ 2014 मधील 96 तासांवरून कमी होऊन 2025 मध्येसुमारे 49 तास झाला. भारतातील प्रमुख बंदरांची क्षमता 2014 मधील 873 एमटीपीएवरून जवळपास दुप्पट होत 2026 मध्ये 1,728 एमटीपीए झाली आहे.



12. प्रधानमंत्री मुद्रा योजना

57 कोटी+ कर्ज । 40 लाख+ कोटीं रुपयांचे वितरण

- 2015 मध्ये सुरू झालेल्या पीएम मुद्रा योजनेच्या माध्यमातून लहान उद्योजकांना तारण-मुक्त कर्ज दिले जाते. 57 कोटींहून अधिक कर्जदारांना 40 लाख कोटीरुपयांपेक्षा जास्त रक्कम वितरित करण्यात आली आहे. यापैकी 68% कर्ज महिलांना आणि 51% कर्ज अनुसूचित जाती/जमाती/इतर मागासवर्गीय कर्जदारांना देण्यात आले. 2024 मध्ये कर्ज मर्यादा 20 लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली.

13. स्टार्टअप इंडिया

2.5 लाख+ स्टार्टअप्स । 23.36 लाख+ नोकऱ्या

- 2016 मध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाने उद्योजकतेला एक राष्ट्रीय आकांक्षा बनवले. सप्टेंबर 2026 पर्यंत, अडीच लाखांहून अधिक मान्यताप्राप्त स्टार्टअप्सनी 23 लाखांहून अधिक थेट रोजगार निर्माण केले आहेत. जवळपास निम्मे स्टार्टअप्स टियर-II आणि टियर-III शहरांमधील आहेत, आणि जवळपास 50% स्टार्टअप्समध्ये किमान एक महिला संचालक किंवा भागीदार आहे.

14. प्रधानमंत्री उज्ज्वला योजना: धुरापासून मुक्ती

सुमारे 11 कोटींहून अधिक जोडण्या

- 2016 मध्ये सुरू झालेल्या उज्ज्वला योजनेअंतर्गत, मे 2026 पर्यंत 10.6 कोटींहून अधिक मोफत स्वयंपाकाच्या गॅस जोडण्या देण्यात आल्या. यामुळे धूर निघणाऱ्या इंधनावरील अवलंबित्व कमी झाले आणि महिलांच्या आरोग्य, वेळ तसेच संधींवर सकारात्मक परिणाम झाला.

15. डिजिटल पेमेंट क्रांती – यूपीआय

24,162 कोटी व्यवहार, 55 कोटींहून अधिक वापरकर्ते

- 2016 मध्ये सुरू झालेल्या यूपीआयने डिजिटल पेमेंटला दैनंदिन सोय बनवले आहे. यूपीआयच्या माध्यमातून होत असलेला वार्षिक व्यवहार 2016 मधील 1.78 कोटीवरून आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये 24.162 कोटी पर्यंत वाढला आहे. यामध्ये जून 2026 पर्यंत 55.5 कोटी वापरकर्ते आणि जुलै 2026 पर्यंत 741 बँका जोडल्या गेल्या आहेत. व्यवहाराचे मूल्य 0.07 लाख कोटी रुपयांवरून वाढून 314 लाख कोटी रुपये झाले. यूपीआय आता 11 देशांमध्ये कार्यरत आहे.

16. वस्तू आणि सेवा कर (जीएसटी)

एक राष्ट्र- एक कर । आर्थिक वर्ष 2025 मध्ये एकूण जीएसटी 22 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त

- 2017 मध्ये लागू झालेल्या जीएसटीने अनेक केंद्रीय आणि राज्य करांना एका समान चौकटीत एकत्रित करून 'एक राष्ट्र, एक कर, एक बाजार' या संकल्पनेला बळकटी दिली. करदात्यांची संख्या 2017 मधील 66.5 लाखांवरून मे 2026 मध्ये 1.65 कोटींपर्यंत वाढली आणि आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये एकूण जीएसटीसंकलन 22.27 लाख कोटी रुपये होण्याचा अंदाज होता.

17. आयुष्मान भारत आणि आरोग्य सुरक्षा

5 लाख रुपयांचे संरक्षण. 12 कोटींहून अधिक कुटुंबाना संरक्षण

- जून 2026 पर्यंत, 37,413 सरकारी आणि खासगी रुग्णालयांमध्ये 12.69 कोटी रुग्णांवर उपचार करण्यात आले, ज्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या 1.92 लाख कोटी रुपयांची बचत झाली. 70 वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांचाही समावेश आहे.

18. जल जीवन मिशन

12 कोटीं+ नळ जोडण्या, 82% पेक्षा जास्त व्याप्ती

- 2019 मध्ये सुरू झालेल्या या मोहिमेचे उद्दिष्ट ग्रामीण घरांपर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचवणे, हे आहे. 3.23 कोटी ग्रामीण कुटुंबांपासून वाढून जून 2026 पर्यंत सुमारे 16 कोटी कुटुंबांना नळ जोडणी मिळाली. 5 लाखांहून अधिक पाणी समित्यांची स्थापना करण्यात आली असून, 24.8 लाख महिलांना पाण्याच्या गुणवत्तेची चाचणी करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

19. पीएम-किसान

4 लाख कोटींहून अधिक रुपये, 9.44 कोटी शेतकरी

- 2019 पासून शेतकऱ्यांना दरवर्षी 6,000 रुपये तीन हप्त्यांमध्ये थेट त्यांच्या बँक खात्यांमध्ये दिले जात आहेत. याअंतर्गत जुलै 2026 पर्यंत 4 लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम वितरित करण्यात आली आहे.



20. लखपती दीदी आणि नमो ड्रोन दीदी

3 कोटींहून अधिक लखपती दीदी I

बचत गटांमध्ये 10.57 कोटी महिला

- लखपती दीदी योजनेने ग्रामीण महिलांना केवळ सहाय्य देण्यापलीकडे त्यांना शाश्वत उत्पन्न आणि उद्योजकतेशी जोडले. मे 2026 पर्यंत, 3.07 कोटी महिला लखपती दीदी बनल्या आहेत आणि 10.57 कोटींहून अधिक महिला स्वयं-सहायता गटांमध्ये संघटित झाल्या आहेत. नमो ड्रोन दीदी अंतर्गत 15,000 ड्रोनचे उद्दिष्ट आहे.

21. भारताची सौर क्रांती

164 गिगावॅटहून अधिक सौर ऊर्जा I

14.8 गिगावॅट क्षमतेचे छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प

- गुजरातच्या सौर उपक्रमातून मिळालेला अनुभवराष्ट्रीय विस्ताराचा पाया बनला. भारताची स्थापित सौर ऊर्जा क्षमता 2014 मधील 2.8 **GW** वरून जुलै 2026 मध्ये सुमारे 165 **GW** इतकी झाली. पीएम सूर्य घर योजनेअंतर्गत ऑगस्ट 2026 पर्यंत 51 लाख घरांचा समावेश झाला असून, 14.8 **GW** रूफ टॉप सौर ऊर्जा क्षमता स्थापित करण्यात आली आहे.

22. पीएम स्वनिधि

78+ लाख पथविक्रेते I 18,000+ कोटी रु. कर्ज

- 2020 मध्ये सुरू झालेल्या या योजनेद्वारे फेरीवाले आणि हातगाडी व्यावसायिकांना कोणत्याही तारणाशिवाय खेळत्या भांडवलासाठी कर्ज मिळवून देत औपचारिक वित्तीय व्यवस्थेशी जोडण्यात आले. ऑगस्ट 2026 पर्यंत 78 लाखांहून अधिक विक्रेत्यांना 1.18 कोटी रुपयांहून अधिक कर्जे देण्यात आली.

23. पीएम गतिशक्ती

16 मंत्रालयेः पायाभूत सुविधांसाठी एक एकीकृत नकाशा

- 2021 मध्ये सुरू झालेल्या राष्ट्रीय बृहद आराखड्याअंतर्गत 16 मंत्रालये आणि विभागांमधील पायाभूत सुविधांशी संबंधित डेटा एकत्रित केला. रस्ते, रेल्वे, बंदरे, विमानतळे आणि लॉजिस्टिक्स नेटवर्क यांचा एकत्रित आढावा घेतल्यामुळे प्रकल्पांमध्ये अधिक चांगला समन्वय साधण्यास आणि लॉजिस्टिक्सचा खर्च कमी करण्याच्या दिशेने प्रयत्नांना बळ मिळाले. हे प्लॅटफॉर्म आता 100 लाख कोटीरुपयांहून अधिक किमतीच्या पायाभूत सुविधांचे मॅपिंग करते.

24. स्वामित्व हक्क आणि नैसर्गिक शेती

3.30 लाख गावांचे सर्वेक्षण, 3.24 कोटी मालमत्ता कार्ड

- स्वामित्व योजनेअंतर्गत ड्रोन आणि **GIS** तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील मालमत्तांचे अचूक मॅपिंगकरून मालमत्ता हक्क अधिक मजबूत करण्यात आले. ऑगस्ट 2026 पर्यंत 3.30 लाख गावांमध्ये सर्वेक्षण करण्यात आले असून, 3.24 कोटी मालमत्ता कार्ड तयार करण्यात आली आहेत. नैसर्गिक शेतीच्या उपक्रमांतर्गत 20 लाखांहून अधिक शेतकरी आणि 10 लाख हेक्टरहून अधिक क्षेत्र जोडले गेले आहे.

25. खेळणारे राष्ट्र, जिंकणारे राष्ट्र

1,000+ खेलो इंडिया केंद्र I 2,700+ खेळाडू

- 1,000+ खेलो इंडिया केंद्रे कार्यरत आहेत. 2,700+ खेळाडूंना मदत मिळत आहे. टोकियो 2020 ऑलिम्पिकमधील सात पदके, आशियाई क्रीडा स्पर्धांमधील 107 पदके आणि 2022 मधील ऐतिहासिक थॉमस कप प्राप्त झाल्याने मिळालेले यश हे वाढत्या क्रीडा आत्मविश्वासाचे प्रतिबिंब दर्शवतात. गेल्या 13 वर्षांत भारताने तीन प्रमुख क्रीडा स्पर्धांमध्ये आपली सर्वोत्तम कामगिरी केली आहेः टोकियो 2020 ऑलिम्पिकमध्ये 7 पदके, हांगझोऊ 2023 आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये 107 पदके आणि गोल्ड कोस्ट 2018 राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये 66 पदके.





25 अभूतपूर्व उपक्रम ज्यांना जन आंदोलनाचे स्वरुप प्राप्त झाले

सरकारचे प्रमुख या नात्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या25 वर्षांच्या प्रवासातले देशात एक नवीन आयाम स्थापित केला आहे. यासोबत देशातील प्रत्येक नागरिकाला एक थेट आपलेपणा जाणवतो. या प्रवासात अनेक असे उपक्रम जोडले गेले ज्यांनी शासन, विकास, सार्वजनिक सहभाग आणि जागतिक स्तरावरील भारताच्या भूमिकेसाठी नवीन मापदंड स्थापित केले आहेत. हा प्रवास कल्पनांना योजनांशी आणि योजनांना सार्वजनिक सहभागाशी जोडण्याचा प्रयत्न दर्शवतो. या उपक्रमांनी भारताच्या विकास प्रवासाला एक वेगळी ओळख दिली आहे, ज्यामुळे देशांतर्गत आणि जागतिक स्तरावर नवीन मापदंड स्थापित झाले आहेत.

1. व्हायब्रण्ट गुजरात

गुंतवणुकीसाठी जगाला गांधीनगरमध्ये आमंत्रित करण्याच्या 2003 मधील उपक्रमाने राज्यांमधील स्पर्धेची नवी संकल्पना मांडली. एकल खिडकी मंजुरी आणि धोरणात्मक बांधिलकीच्या माध्यमातून गुंतवणूक आकर्षित करण्याचे हे मॉडेल नंतर इतर राज्यांपर्यंतही पोहोचले.

2. रण उत्सव

2005 मध्ये सुरू झालेला कच्छचा रण उत्सव, स्थानिक संगीत, कला, हस्तकला आणि खाद्य संस्कृतीला पर्यटनाशी जोडण्याचे माध्यम ठरला. दूरवर पसरलेले मिठाचे वाळवंट ग्रामीण सांस्कृतिक पर्यटनाचे एक मॉडेल बनले आणि कारागिरांना नवी बाजारपेठ मिळाली, ज्याचे पुढे जागतिक स्तरावर अनुकरण केले गेले.

3. कृषि महोत्सव

शास्त्रज्ञ, अधिकारी आणि शेतकरी यांना थेट जोडून शेताच्या गरजांनुसार कृषी विषयक सल्ला तयार करण्यात आला. मृदा आरोग्य पत्रिका आणि सातत्यपूर्ण संवादामुळे शेती हे केवळ हंगामी कार्य न राहता या क्षेत्राला सातत्यपूर्ण ज्ञान चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले.

4. वाचे गुजरात

'संपूर्ण राज्याने एक तास वाचन करावे' या आवाहनामुळे वाचनाला वैयक्तिक सवयीपासून सामायिक सार्वजनिक संस्कृतीचे स्वरूप मिळाले. विद्यार्थी आणि नागरिकांच्या जनसहभागातून वाचनालयांमध्येही सुधारणा करण्यात आल्या.

5. लोकसहभाग

नागरिकांना योजनांचे निष्क्रिय लाभार्थी न मानता शासनातील भागीदार बनवण्याच्या दृष्टिकोनामुळे धोरणनिर्मिती, अंमलबजावणी आणि देखरेख प्रक्रियेत त्यांच्या मतांना आणि अभिप्रायांना स्थान मिळाले. यामुळे विकास प्रक्रियेत सक्रिय सहभागाची भावना अधिक मजबूत झाली.

6. मन की बात

या मासिक रेडिओ संवादाने पंतप्रधान आणि नागरिकांमधील संवादासाठी एक वेगळे माध्यम निर्माण केले. धोरणे, उल्लेखनीय कार्ये आणि सामाजिक अभियानांवरील सहज-सोप्या चर्चेमुळे अधिकृत संवाद केवळ संबोधनापुरता मर्यादित न राहता अधिक व्यापक झाला.

7. गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्ती

रस्ते, शहरे, इमारती आणि संस्थांमधून वसाहतवादी नावे आणि चिन्हे काढून टाकून स्थानिक अस्मितेला स्थान देण्याचा प्रयत्न हा सार्वजनिक स्मृती आणि सांस्कृतिक आत्मविश्वास परत मिळवण्याचे एक साधन बनला. आता 2035 पर्यंत गुलामगिरीच्या मानसिकतेतून पूर्णपणे मुक्त होण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.





8. 'स्वेच्छेने सोडून द्या' मोहीम

एलपीजी अनुदान स्वेच्छेने सोडून देण्याच्या आवाहनाने सामायिक जबाबदारीची भावना दर्शवली. 1.13 कोटींहून अधिक कुटुंबांनी अनुदान सोडून दिल्यामुळे झालेल्या बचतीचा उपयोग उज्ज्वला योजनेअंतर्गत जोडण्या देण्यासाठी करण्यात आला.

9. आंतरराष्ट्रीय योग दिन

योगाला जागतिक स्तरावर ओळख मिळवून देण्यासाठीच्या प्रयत्नांमुळे 21 जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून ओळखला जाऊ लागला. ही भारतीय परंपरा एक सामायिक जागतिक सार्वजनिक आरोग्य उपक्रम बनली असून 190 हून अधिक देशांमध्ये आता योग दिन साजरा केला जातो. यावर्षी, भारताबाहेर 1,300 हून अधिक ठिकाणी योगदिन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, यातील अनेक कार्यक्रमांची नोंद 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये झाली आहे.

10. बेटी बचाओ, बेटी पढाओ

पूर्वी, दर 1,000 मुलांमागे 918 मुली होत्या. 2015 मध्ये सुरू करण्यात आलेल्या 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ' या योजनेने आरोग्य, शिक्षण आणि अंमलबजावणीच्या संयुक्त अभियानाद्वारे मुलींचे जीवन, शिक्षण आणि अधिकार यांना जोडले. मुलींचे संरक्षण आणि शिक्षण, हे राष्ट्रीय अभियान बनले.

11. जनतेचे पद्म पुरस्कार

ग्रामीण, दुर्गम आणि तळागाळातील योगदानकर्त्यांना राष्ट्रीय सन्मानाच्या केंद्रस्थानी आणण्यासाठी पद्म पुरस्कारांची प्रक्रिया व्यापक करण्यात आली. राष्ट्रीय सन्मान अभिजन वर्गाकडून जनसामान्यांच्या उत्कृष्टतेकडे वळला. अज्ञात नायकांना ओळखण्याची आणि त्यांना सन्मानित करण्याची एक नवीन परंपरा उदयास आली.

12. एक भारत, श्रेष्ठ भारत

राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील भाषा, शिक्षण, संस्कृती, खानपान आणि सण-उत्सवांच्या देवाणघेवाणीमुळे एकतेला घटनात्मक तत्त्वापासून जिवंत अनुभवामध्ये रूपांतरित करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

13. यूपीआय: एक क्रांतिकारक आणि लोकशाहीवादी उपक्रम

सुविधा म्हणून विकसित करण्याच्या दूरदृष्टीमुळे पेमेंट सेवा तत्काळ, विनामूल्य आणि सर्वसमावेशक बनली. यूपीआयने भारतातील डिजिटल पेमेंटच्या क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणला.

14. खेळ महाकुंभ ते खेलो इंडिया

स्पर्धांचा विस्तार गाव आणि शालेय स्तरापर्यंत केल्यामुळे, प्रतिभा ओळखण्याची प्रक्रिया मोठ्या शहरांच्या आणि निवडक अकादमींच्या मर्यादेबाहेर आणली गेली. खेळाला युवकांच्या सर्वांगीण विकासाचे व्यापक माध्यम बनवण्यात आले.

15. एक जिल्हा, एक उत्पादन (ओडीओपी)

प्रत्येक जिल्ह्यातील वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनाला ब्रँण्डिंग, जीआय टॅग, ई कॉमर्स आणि निर्यात सहाय्यतेशी सलंग्न केल्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला नवीन ओळख प्राप्त झाली. कारागीर आणि शेतकऱ्यांसाठी बाजारपेठांची व्याप्ती वाढली.

16. आकांक्षी जिल्हे आणि व्हायब्रण्ट गावे

वास्तविक वेळेतील डेटा, क्रमवारी आणि योजनांच्या माध्यमातून मागासलेल्या भागांमध्ये स्पर्धात्मक विकासाची संकल्पना रुजवण्यात आली. सर्वात दुर्गम आणि आव्हानात्मक भागांनाही विकासाच्या मुख्य प्रवाहाचा भाग बनवण्यात आले.

17. परीक्षा पे चर्चा

संवादाची नवीन परंपरा तयार झाली. परीक्षेतील ताणाला सार्वजनिक स्वरूपात होणाऱ्या संवादात बदलल्यामुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांसमवेत थेट संवाद साधणे शक्य झाले. परीक्षेला तणावाऐवजी एका संधीच्या स्वरुपात पाहण्याची आणि सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करण्याची दिशा निश्चित करण्यात आली.



"देशावर अनेक आपत्ती आल्या, आपण इतकी मोठी-मोठी चक्रीवादळे झेलली आहेत; परंतु देशाने त्यांचा अत्यंत धैर्याने आणि मजबुतीने सामना केला.

-नरेंद्र मोदी, पंतप्रधान



18. स्टॅचू ऑफ यूनिटी

182 मीटर उंचीचा जगातील सर्वात उंच पुतळा पर्यटन, मनोरंजन आणि संमेलने यांचा मेळ साधणारे आर्थिक घडामोडींचे केंद्र बनला आहे. या स्मारकाने स्थानिक परिसरासाठी शाश्वत रोजगार आणि पर्यटनाचा पाया निर्माण केला आहे, यामुळे पहिल्या सात वर्षांतच येथे 2.75 कोटींहून अधिक पर्यटकांनी भेट दिली.

19. वंदे भारत रेल्वेगाड्या

स्वदेशी डिझाइन आणि निर्मितीच्या क्षमतेच्या बळावर आधुनिक रेल्वे प्रवासाला नवे रूप देण्यात आले. भारताच्या गुंतागुंतीच्या रेल्वे व्यवस्थेत आत्मनिर्भर क्षमतेचे हे एक उदाहरण ठरले. स्वदेशीपणा, सुलभता आणि सुविधा यांचे ते प्रतिक बनले.

20. आत्मनिर्भर भारत

संरक्षण, औषधनिर्माण, सेमीकंडक्टर, सौर ऊर्जा आणि इलेक्ट्रॉनिक्स यांसारख्या क्षेत्रांमध्ये कालबद्ध पद्धतीने क्षमता निर्माण करण्यावर भर देण्यात आला. उत्पादनाशी निगडित प्रोत्साहन योजनांनी आत्मनिर्भरतेला स्पर्धात्मकतेशी जोडले. आत्मनिर्भरतेचे आवाहन एका जन आंदोलनाचे रूप घेऊ लागले.

21. स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन

'व्होकल फॉर लोकल' या उपक्रमातून ग्राहकांना स्थानिक उत्पादनांना प्राधान्य देण्याचे आवाहन करण्यात आले. यामुळे कारागीर, हातमाग तसेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना मागणी आणि बाजारपेठेशी जोडण्याची संकल्पना पुढे आली.

22. मिशन लाईफ: पर्यावरणपूरक जीवनशैली

हवामान बदलाच्या समस्येवरील उपाययोजनांना सरकारे आणि उद्योगांपुरते मर्यादित न ठेवता व्यक्तीच्या जीवनशैलीशी जोडण्यात आले. जागरूक आणि संयमित उपभोगाला सामूहिक जबाबदारी म्हणून पुढे आणण्यात आले.

23. श्री अन्न (भरड धान्य)


बाजरी, ज्वारी आणि नाचणी यांसारख्या पारंपरिक पिकांना उत्पादनासाठी मदत, सार्वजनिक वितरण व्यवस्था, शालेय पोषण आहार आणि निर्यात प्रोत्साहनाशी जोडून पोषण आणि हवामान-अनुकूल शेतीला चालना देण्यात आली. भारताच्या प्रस्तावावर संयुक्त राष्ट्रांनी 2023 हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष' म्हणून घोषित केले. त्यामुळे पावसावर आधारित शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना एक फायदेशीर पीक उपलब्ध झाले.

24. नारी शक्ती वंदन अधिनियम

लोकसभा आणि राज्य विधानसभेत महिलांसाठी एक-तृतीयांश जागांच्या आरक्षणाची तरतूद महिलांच्या राजकीय प्रतिनिधित्वासाठी संस्थात्मक आधार प्रदान करते. पंचायत ते संसद या प्रवासात महिला नेतृत्वाखालील विकासाची दिशा अधिक बळकट झाली.

25. शांततेच्या माध्यमातून भारताचे अणु पुनरुत्थान

भारताचे नागरी अणुऊर्जा क्षेत्र, आधुनिक उत्तरदायित्व आणि नियामक चौकटी अंतर्गत खाजगी आणि परदेशी गुंतवणुकीसाठी खुले करण्याची संकल्पना पुढे आली. या धोरणात्मक निर्णयामुळे ऊर्जा सुरक्षा, स्वच्छ आधारभूत वीज (**Baseload Power**) आणि दीर्घकालीन क्षमता विस्तार या तिन्ही आघाड्यांवर भारताने जागतिक स्तरावर एक नवा आदर्श प्रस्थापित केला आहे.





25 विचार ज्यांनी बदलली दिशा आणि प्रक्रिया

25 वर्षांच्या सुशासनाच्या प्रवासात, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्य ते राष्ट्रीय अशा विविध स्तरांवर अनेक संकल्पना आणि संस्थात्मक उपक्रम राबवले; जे केवळ योजनांपुरते मर्यादित न राहता, कार्यपद्धती आणि कामकाजाच्या शैलीला एक नवी दिशा देणारे ठरले. या उपक्रमांचे उद्दिष्ट केवळ व्यवस्था चालवणे हे नव्हते, तर त्यात संस्थात्मक पातळीवर परिवर्तन घडवून आणणे हे होते. या उपक्रमांमुळे काही ठिकाणी जबाबदारी सरकारकडून समुदायाकडे हस्तांतरित झाली, तर अन्य ठिकाणी नागरिक धोरणनिर्मिती प्रक्रियेत सहभागी झाले; तसेच काही वेळा तंत्रज्ञानाचा सार्वजनिक पाया म्हणून स्वीकार करण्यात आला आणि राष्ट्रीय प्रयत्नांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळाले.

1. **जल आणि स्वच्छता व्यवस्थापन संस्था (डब्ल्यूएसएमओ), गुजरात (2003):** ग्रामीण पाणीपुरवठा योजनांची जबाबदारी सरकारकडून गावांकडे पोहचली. पाणी समित्यांना नियोजन, बांधकाम, संचालन आणि देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी सोपवण्यात आली. महिलांच्या सहभागाने याला सामुदायिक प्रारूप बनवले ,जे पुढे 'जल जीवन मिशन'मध्येही स्वीकारण्यात आले.

2. **एसडीएमए (2003):** भुज येथील भूकंपानंतर, गुजरातने आपत्ती व्यवस्थापन केवळ मदतीपुरते सीमित न ठेवता सज्जता, क्षमता निर्मिती आणि जोखीम कमी करण्यासाठी एक कायदेशीर संस्थात्मक आराखडा तयार केला. 2005 मध्ये याच अनुषंगाने राष्ट्रीय स्तरावरही अशीच व्यवस्था उभारण्यात आली.

3. **विशिष्ट क्षेत्रांसाठी विद्यापीठ:** न्यायवैद्यक विज्ञान, अंतर्गत सुरक्षा , ऊर्जा, क्रीडा, शिक्षण, संस्कृत आणि योग यांसारख्या विशेष क्षेत्रांसाठी विविध संस्था व विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. यामुळे विशिष्ट गरजांनुसार प्रतिभेला आकार देण्यासाठी एक संस्थात्मक चौकट निर्माण झाली.

4. **गिफ्ट सिटी (2007):** भारतात आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवांसाठी एक 'ग्रीनफील्ड' केंद्र विकसित करण्यात आले. आंतरराष्ट्रीय मानकांना अनुरूप व्यवस्था आणि एकल नियामकाच्या माध्यमातून भारतात जागतिक वित्तीय व्यवहारांसाठी एक नवीन व्यासपीठ तयार झाले.

5. **स्वतंत्र हवामान बदल विभाग (2009) :** हवामान बदलाचा सामना करणे ही सरकारची कायमस्वरूपी जबाबदारी बनवण्यात आली. नवीकरणीय ऊर्जा, जलसंधारण, उत्सर्जन कपात आणि हवामान-अनुकूल योजनांसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प व प्रशासकीय व्यवस्था उभी राहिली.

6. **माय गव्ह (2014):** धोरण निर्मिती प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी नागरिकांना सूचना, चर्चा, सर्वेक्षणे आणि कल्पना -मोहिमांच्या माध्यमातून एक कायमस्वरूपी डिजिटल व्यासपीठ मिळाले. यामुळे जनतेची भूमिका केवळ प्रेक्षकाची न राहता ती सक्रिय सहभागाची झाली.

7. **नीती आयोग (2015):** नीती आयोगाने नियोजन आयोगाची जागा घेतली. राज्यांबरोबर संवाद , 'राज्य सहाय्य अभियान' आणि 'आकांक्षी जिल्हे कार्यक्रम' च्या माध्यमातून धोरण निर्मिती प्रक्रियेला परिणाम आणि सहकारी संघराज्यवादाशी जोडण्यात आले.

8. **प्रगति (2015):** रखडलेल्या प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली एक अशी व्यवस्था उभारण्यात आली, ज्याद्वारे केंद्र आणि राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांना संयुक्तपणे जबाबदार धरले जाते. यामुळे प्रकल्पांची प्रगती आणि समस्या एकाच व्यासपीठावर दिसू लागल्या.





9. **आंतरराष्ट्रीय सौर आघाडी (2015):** भारत आणि फ्रान्स यांच्या संयुक्त पुढाकाराने सौर ऊर्जेसाठी करार -आधारित आंतरराष्ट्रीय संघटना उभी राहिली. सामायिक खरेदी, मानक, प्रकल्प पूर्वतयारी आणि वित्तपुरवठ्याच्या माध्यमातून सौर ऊर्जेला जागतिक सहकार्याचा आधार मिळाला.

10. **डिजिटल पायाभूत सुविधा (2016):** आधार, यूपीआय आणि अकाउंट ॲग्रीगेटर यांसारखे खुले डिजिटल आराखडे तयार करण्यात आले. ज्यावर बँका, स्टार्टअप्स आणि सरकार नवीन सेवा विकसित करू शकतात. सार्वजनिक डिजिटल सुविधा एक सामायिक आधार बनल्या.

11. **जीईएम (2016):** सरकारी खरेदीला एका सामायिक ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर आणून किंमती, उत्पादने आणि विक्रेते यांच्याबाबतची पारदर्शकता वाढवण्यात आली. खरेदी व्यवस्थेला दलाल आणि मर्यादित स्पर्धेतून बाहेर काढून एका खुल्या डिजिटल बाजारपेठेच्या दिशेने नेण्यात आले.

12. **नादारी आणि दिवाळखोरी संहिता (2016)** डिफॉल्टशी संबंधित दीर्घ आणि विखुरलेल्या प्रक्रियांच्या जागी कालबद्ध आणि कर्जदाता नियंत्रित व्यवस्था आणण्यात आली. यामुळे कर्ज शिस्तीसाठी एक संस्थात्मक पाया तयार झाला.

13. **अटल इनोव्हेशन मिशन (2016):** नवोन्मेषाला शालेय स्तरावर पोहचवण्यासाठी 'अटल टिंकरिंग लॅब्स' आणि स्टार्टअप्ससाठी 'अटल इनक्युबेशन सेंटर्स'ची स्थापना करण्यात आली. यामुळे नवोन्मेष संस्कृतीला मोठी चालना मिळाली. आतापर्यंत 10,000 प्रयोगशाळा उभारण्यात आल्या आहेत; त्यापैकी सुमारे 60 टक्के प्रयोगशाळा सरकारी शाळांमध्ये आहेत आणि निम्म्याहून अधिक ग्रामीण भागात आहेत.

14. **रेरा (2016):** रिअल इस्टेट क्षेत्रात खरेदीदारांच्या अधिकारांना कायदेशीर संरक्षण मिळाले. प्रकल्पाची नोंदणी, खरेदीदारांच्या निधीसाठी स्वतंत्र खाते आणि वाद निवारण यंत्रणा यांसारख्या तरतुदींमुळे उत्तरदायित्वात वाढ झाली.

15. **जीएसटी परिषद (2016):** केंद्र आणि राज्यांना एका घटनात्मक संस्थेच्या माध्यमातून करविषयक सामायिक व्यवस्था निर्धारित करण्यासाठी एक व्यासपीठ मिळाले. जीएसटीने विविध अप्रत्यक्ष करांऐवजी एका सामायिक राष्ट्रीय बाजारपेठेचा मार्ग प्रशस्त केला.

16. **ओबीसी घटनात्मक आयोग (2018):** 'राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगा'ला घटनात्मक दर्जा देऊन त्याची संस्थात्मक चौकट अधिक बळकट करण्यात आली. यामुळे लोकसंख्येच्या एका मोठ्या घटकाला कायमस्वरूपी संस्थात्मक आवाज मिळाला.

17. **चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (2019):** तिन्ही सैन्य दलांमध्ये उत्तम समन्वय सुनिश्चित करण्यासाठी 'सीडीएस' पद आणि 'लष्करी व्यवहार विभाग' स्थापन करण्यात आला. संयुक्त सैन्य रचनेची जी संकल्पना दीर्घकाळापासून मांडली जात होती, तिला याद्वारे संस्थात्मक स्वरूप मिळाले.

18. **सीडीआरआय (2019):** भारताच्या पुढाकाराने आपत्ती-रोधक पायाभूत सुविधांसाठी एका आंतरराष्ट्रीय आघाडीची स्थापना करण्यात आली. संशोधन, तांत्रिक सहकार्य आणि भक्कम बांधकाम मानकांद्वारे प्रतिबंधक क्षमतेला सामायिक जागतिक प्राधान्य बनवण्यात आले.


19. **IN-SPACe अंतराळ क्षेत्रात खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढवणे (2020):** अंतराळ क्षेत्रातील खाजगी कंपन्यांसाठी 'सिंगल-विंडो' व्यवस्था सुरू करण्यात आली. यामुळे खाजगी क्षेत्राला प्रक्षेपण, उपग्रह, चाचणी सुविधा आणि अंतराळ सेवा यांसारख्या क्षेत्रांत प्रगतीसाठी संस्थात्मक मार्ग मिळाला.





20. मिशन कर्मयोगी –iGOT (2020): सनदी अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाला पद आणि ज्येष्ठता यांवर आधारित व्यवस्थेतून बाहेर काढून सतत आणि क्षमता-आधारित शिक्षणाशी जोडण्यात आले. अधिकाऱ्यांना त्यांच्या कामाला अनुरुप असे डिजिटल प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात आले.

21. सहकार मंत्रालय (2021): सहकार क्षेत्रासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करून, राष्ट्रीय सहकार डेटाबेस, 'बहु-राज्य सहकारी प्रणाली' आणि पीएसीएस चे संगणकीकरण यांसारख्या उपक्रमांना संस्थात्मक स्वरूप देण्यात आले.



22. अग्निपथ योजना (2022)

अग्निवीर व्यवस्थेच्या माध्यमातून जवानांची भर्ती आणि सेवा रचनेत बदल करण्यात आला. चार वर्षांचा सेवा कालावधी, निवडक कर्मचाऱ्यांना सेवेत कायम ठेवण्याची तरतूद आणि अन्य संधींच्या तरतुदीच्या माध्यमातून लष्कराला दीर्घकाळासाठी अधिक तरुण बनवण्याची दिशा ठरली.

23. मेरा युवा भारत (2023)

तरुणांसाठी कौशल्य, स्वयंसेवा, नेतृत्व आणि स्थानिक विकासाला एकाच व्यासपीठावर आणण्यात आले. नोंदणी आणि सामायिक डेटाबेसच्या माध्यमातून तरुणांच्या सहभागाला एक सुव्यवस्थित स्वरूप देण्यात आले.

24. इंटरनॅशनल बिग कॅट अलायन्स (2023)

सात बिग कॅट्सच्या संरक्षणासाठी एक सामायिक आंतरराष्ट्रीय व्यासपीठ स्थापन करण्यात आले. संशोधन, देखरेख, बेकायदेशीर शिकारीला प्रतिबंध आणि अनुभवांची देवाणघेवाण यांद्वारे वन्यजीव संरक्षणाला संस्थात्मक सहकार्य मिळाले.

25. जागतिक जैव इंधन आघाडी (2023)

भारत, ब्राझील आणि अमेरिकेच्या पुढाकाराने जैवइंधनाला एक सामायिक आंतरराष्ट्रीय व्यासपीठ स्थापन झाले. सामायिक मानके, तंत्रज्ञान आणि व्यापार यांच्या माध्यमातून जागतिक ऊर्जा परिवर्तनाला गती देण्याचा प्रयत्न झाला.

“धोरण आणि शासनाशी संबंधित परिसंस्थेत मला आता 25 वर्षे पूर्ण होणार आहेत. या काळात ज्यांनी माझे काम पाहिले , त्यांना हे ठाऊक आहे की, केवळ एखादा टप्पा गाठून किंवा एखादे यश साजरे करून संतुष्ट होणाऱ्यांपैकी मी नाही. जेव्हा एखादे लक्ष्य साध्य होते ,तेव्हा मी त्याहून मोठे लक्ष्य गाठण्याच्या तयारीला लागतो.

–नरेंद्र मोदी, पंतप्रधान



मुंबईत 'ग्लोबल फिनटेक फेस्ट 2026' चे उद्घाटन

युपीआय...
एका उत्क्रांतीची कथा

भारताची फिनटेक क्षेत्रातील वाटचाल अद्भुत अशीच आहे. यामागील एक प्रमुख घटक 'यूपीआय' आहे. यूपीआय ही केवळ तंत्रज्ञानाशी संबंधित एक कथा नाही, तर ती एक परिवर्तनकारी गाथा आहे, जी संपूर्ण राष्ट्राच्या उत्क्रांतीची कथा सांगते. 8 सप्टेंबर रोजी मुंबईत आयोजित 'ग्लोबल फिनटेक फेस्ट' (जीएफएफ) 2026 च्या उद्घाटनप्रसंगी बोलताना पंतप्रधान म्हणाले की, आज फिनटेक बाजारपेठेत मोठा वाटा पेमेंट्सचा आहे, मात्र आता आपल्याला इथून आणखी नव्या उंचीवर जायचे आहे...



तंत्रज्ञान हे सर्वसमावेशकतेचे सर्वात प्रभावी साधन आहे आणि 'यूपीआय'ने हे सिद्ध करून दाखवले आहे. जेव्हा फिनटेकचा विषय येतो , तेव्हा पारंपरिक पद्धती जिथे पोहोचू शकली नाहीत, तिथे पोहचणे हे अनोखे वैशिष्ट्य असायला हवे. जिथे पारंपरिक बँका पोहचू शकल्या नाहीत , जिथे बँकांच्या शाखा पोहोचू शकल्या नाहीत. 'यूपीआय'ने बँकिंग व्यवस्थेला त्या ठिकाणी, त्या व्यक्तीपर्यंत पोहोचवले आहे. 'ग्लोबल फिनटेक फेस्ट 2026 ' च्या उद्घाटनप्रसंगी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, फिनटेक बाजारपेठेत पेमेंट्सबरोबरच कर्ज पुरवठ्याचा वाटा देखील वाढायला हवा, विम्याचा वाटा वाढवायला हवा तसेच बचत, गुंतवणूक आणि निवृत्तीवेतन यांचाही समावेश व्हायला हवा.

25 ऑगस्ट रोजी यूपीआयला 10 वर्षे पूर्ण झाली. पंतप्रधान मोदींनी नमूद केले की, 10 वर्षांपूर्वी जेव्हा मी म्हणायचो की तुमची बँक तुमच्या हाताच्या बोटांवर उपलब्ध असेल, तेव्हा काहींना ही कल्पना अशक्य वाटत होती. मात्र आज 10 वर्षांनंतरची परिस्थिती पहा, तेच कोट्यवधी लोक पिढ्यानपिढ्या बँकिंग व्यवस्थेच्या बाहेर होते , ते भारतातील फिनटेक क्रांतीचे प्रमुख चालक बनले आहेत.

भारताच्या प्रगतीने जगाला दिला नवा विश्वास

जग सध्या संघर्ष आणि अनिश्चिततेच्या काळातून जात आहे. ऊर्जा आणि वस्तूंच्या पुरवठा साखळ्यांवर दबाव आणि व्यापाराबाबतही तणावाची स्थिती आहे. गेल्या काही महिन्यांपासून ही परिस्थिती आहे. यातही एप्रिल ते जून ही तिमाही विशेष आव्हानात्मक ठरली आहे. यात जेव्हा भारत 7.8% विकासदर गाठतो , तेव्हा जगाला एक नवा विश्वास मिळतो. भारतावरील या वाढत्या विश्वासाचे आणखी एक उदाहरण आपले 'सॉव्हरिन रेटिंग' (सार्वभौम पतमानांकन) देखील आहे. अलीकडेच, जपानच्या पत मानांकन संस्थेने भारताचे सार्वभौम पतमानांकन 'A' श्रेणीत अपग्रेड केले आहे. ही संधी तीन दशकांनंतर आली आहे. देशासाठी एक महत्त्वपूर्ण घटना आहे. भारताची विकासाची गती, स्थूल-आर्थिक स्थिरता आणि अलीकडच्या काळात राबवलेले संरचनात्मक सुधारणांचे उपाय यांबाबत जग किती आश्वस्त आहे हे यातून दिसून येते. भारताचा सुधारणांचा प्रवास आणखी वेगाने पुढे चालू राहील असा पुनरुच्चार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला.

ऑगस्ट महिन्यातच युपीआयद्वारे चोवीसशे कोटींहून अधिक व्यवहार झाले. भारताचे युपीआय आता जगभरातील 11 देशांमध्ये कार्यान्वित आहे.



डिजिटल इंडिया'ची यशोगाथा आता एका नवीन अध्यायासाठी सज्ज आहे. आपल्या फिनटेक यशोगाथेचे हे आतापर्यंतचे यश त्याचा प्रचंड विस्तार, व्याप्ती , सुरक्षित व्यवस्था आहे, तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण आहे आणि जनतेचा विश्वास आहे.

– नरेंद्र मोदी, पंतप्रधान

फिनटेक कंपन्यांसाठी पंतप्रधान मोदींनी निर्धारित केली उद्दिष्टे...

21 व्या शतकाचा दुसरा टप्पा आपल्यासाठी आणखी नवीन संधी घेऊन आला आहे. 'एजंटिक एआय' (**Agentic AI**), 'टोकनायझेशन' आणि 'क्वांटम' यांसारखे तंत्रज्ञान आर्थिक क्षेत्रात नव्या संधींची दारे खुली करत आहे. आता या संधींचे प्रत्यक्ष परिणामांमध्ये रूपांतर करणे हे एक आव्हान आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले की फिनटेक कंपन्यांनी एकत्रितपणे काही उद्दिष्टे ठरवावीत, माझ्या काही सूचना आहेत, जर त्यांनी या कसोट्यांवर स्वतःला पारखून पाहिले तर भारताचे फिनटेक क्षेत्र अमर्याद संधींचे प्रवेशद्वार बनू शकते...

1. भारतातील सायबर सुरक्षा अत्यंत उच्च दर्जाची बनवणे.
2. उद्योगांकडे स्वतःची नैतिक डेटा संरक्षण मानके असावीत.
3. एक मजबूत फिनटेक नियामक उद्योग नवोन्मेष परिसंस्था निर्माण करणे .
4. एक फिनटेक ग्राहक संरक्षण निर्देशांक असायला हवा, ज्याच्या आधारे प्रत्येक कंपनीचे पारदर्शक मानांकन असू शकेल.

पंतप्रधान मोदींचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

एका टप्प्यावर पोहचून संतुष्ट होणाऱ्यांपैकी नाही पंतप्रधान मोदी

कार्यक्रमात पंतप्रधान मोदी म्हणाले की, धोरण आणि शासन संबंधित परिसंस्थेत मला आता 25 वर्षे पूर्ण होणार आहेत. या काळात ज्यांनी माझे काम पाहिले , त्यांना हे ठाऊक आहे की, केवळ एखादा टप्पा गाठून किंवा एखादे यश साजरे करून संतुष्ट होणाऱ्यांपैकी मी नाही. जेव्हा एखादे लक्ष्य साध्य होते, तेव्हा मी त्याहून मोठे लक्ष्य गाठण्याच्या तयारीला लागतो. ते म्हणाले की, आज आपली यूपीआय प्रणाली अनेक देशांपर्यंत पोहोचली आहे, मात्र ही पहिली पायरी आहे. आता त्या देशांच्या पेमेंट प्रणालींशी जोडले जाणे हे आपले पुढील लक्ष्य असायला हवे. सिंगापूरबरोबर आपण हे आधी केले आहे.

8 ते 11 सप्टेंबर 2026 दरम्यान मुंबईत जीएफएफ चे आयोजन

ग्लोबल फिनटेक फेस्ट (जीएफएफ) 2026 ची सातवी आवृत्ती 8 ते 11 सप्टेंबर 2026 दरम्यान मुंबईत आयोजित करण्यात आली. 2020 पासून, जीएफएफ हे एक आंतरराष्ट्रीय 'विचार-नेतृत्व' व्यासपीठ म्हणून उदयास आले आहे; जे धोरणकर्ते, नियामक, मध्यवर्ती बँका, वित्तीय संस्था, फिनटेक कंपन्या, तंत्रज्ञान कंपन्या, गुंतवणूकदार, शिक्षणतज्ज्ञ आणि इतर जागतिक भागधारकांना एकत्र आणून वित्त क्षेत्राच्या भविष्याला आकार देण्याबाबत चर्चा घडवून आणते. ■



'फ्रेट कॉरिडोर'

विकसित होत असलेल्या भारताची जीवनरेखा

केंद्र सरकार 2047 सालापर्यंत 'विकसित भारत' बनण्याचे उद्दिष्ट घेऊन पुढे वाटचाल करत आहे. हे उद्दिष्ट गाठण्यात सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधांची मोठी भूमिका आहे. त्यामुळेच केंद्रातील विद्यमान सरकार देशाच्या प्रत्येक भागाचा वेगाने विकास करत आहे. याच अनुषंगाने, गुजरातच्या वडोदरा येथे 8 सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मालवाहतूक मार्गिका (फ्रेट कॉरिडॉर), बंदरे, रेल्वे मार्ग, रस्ते, वीज, गृहनिर्माण आणि पाणीपुरवठ्याशी संबंधीत 35,000 कोटी रुपये खर्चाच्या विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन केले...

विकसित भारतासाठी देशाला अशा संपर्क-व्यवस्थेची आवश्यकता आहे जी सुगम असेल , आजच्या गरजांशी सुसंगत असेल. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून, वडोदरा येथून 2,800 किलोमीटरहून अधिक लांबीचा समर्पित मालवाहतूक मार्गिका प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. या कॉरिडॉरच्या उभारणीबाबत 2004 मध्ये चर्चा सुरू झाली आणि 2006 मध्ये एका विशेष कंपनीची स्थापना करण्यात आली; मात्र 2014 पर्यंत या प्रकल्पाशी संबंधित फाइल्स इकडून-तिकडे जात राहिल्या. 2014 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेवर आले, तेव्हा या कॉरिडॉरचे काम पूर्ण होऊ शकले. आज, 'ईस्टर्न' आणि 'वेस्टर्न' डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर्स

2014 नंतर आतापर्यंत भारतात 50 हजार आधुनिक रेल्वे डब्यांची निर्मिती करण्यात आली आहे. रेल्वेच्या जाळ्यात अडीच लाख रेल्वे वॅगन्सचा समावेश करण्यात आला आहे.

(समर्पित मालवाहतूक मार्गिका) देशाच्या व्यापार आणि उद्योगाचा मुख्य आधार बनत आहे. समर्पित मालवाहतूक मार्गिका वेगाने विकसित होत असलेल्या भारताची जीवनरेखा आहे. आज पूर्व आणि पश्चिम मालवाहतूक मार्गिकांवर दररोज 430 हून अधिक मालगाड्या धावतात. पूर्वी, जी मालगाडी सहा तासांमध्ये 100 किलोमीटरचे अंतर कापायची, आज तीच मालगाडी अर्ध्याहून कमी वेळेत



उद्घाटन आणि पायाभरणी...

- वडोदरा आणि टांडा रोड दरम्यान नवीन रेल्वे सेवेलाही हिरवा झेंडा दाखवण्यात आला.
- छोटा उदेपूर-धार प्रकल्पांतर्गत विकसित करण्यात आलेली जोबत-टांडा रोड ही नवीन रेल्वे लाईन राष्ट्राला समर्पित करण्यात आली.
- राष्ट्रीय महामार्ग-48 च्या वडोदरा-सुरत भागातील रस्ते सुरक्षा सुधारण्यासाठी आणि वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी कंदारी चौकडी आणि लुवारा पाटिया येथे सहा-पदरी उड्डाणपुलांचे उद्घाटन.
- 1780 कोटी रूपये खर्चाच्या तीन राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांची पायाभरणी.
- 329 किमी लांबीच्या आणि 9700 कोटी रूपयांपेक्षा जास्त खर्चाच्या तीन रेल्वे प्रकल्पांची पायाभरणी.
- गुजरात सरकारच्या सुमारे 2600 कोटी रूपये खर्चाच्या विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

खोटे बोलून फसवणूक करणारे प्रत्येक चौकात आढळतात, भारताची युवा पिढी मात्र सत्याच्या गर्जनेसह वाटचाल करते, सत्यासोबत चालते, आणि सत्यासाठीच प्रेरित आहे. सरकार आज देशातील सौर, पवन, जलविद्युत, अणुऊर्जा अशा सर्वच क्षेत्रांवर किती लक्ष केंद्रित करून काम करत आहे, हे आमचे युवा मित्र पाहत आहेत.

100 किलोमीटरचे अंतर पार करेल. जिथे ट्रकने मालवाहतुकीला साधारणपणे 30 तास लागतात, तेच अंतर समर्पित फ्रेट कॉरिडॉरद्वारे 10-12 तासांत पार करता येते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रासमोर सादर केलेल्या विकासाच्या सात प्रवाहांपैकी, उत्पादन हा एक प्रवाह आहे. आता भारत चिपपासून शिपपर्यंत (जहाजांपर्यंत) उत्पादनांची एक नवीन गाथा लिहित आहे. याचा अर्थ असा की घटक आपले आहेत आणि उत्पादनेही आपली आहेत. भारतात पीव्ही मॉड्यूल्सचे उत्पादन सुरू झाले आहे, ज्यामुळे 200 गिगावॅटपेक्षा जास्त क्षमतेचा विकास झाला आहे. देशातील 55 लाख कुटुंबांनी त्यांच्या घरांच्या छतावर आणि गच्चीवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की जर देशाला कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये (AI) जागतिक महासत्ता व्हायचे असेल, तर त्यासाठी तयारी करून आपली परिसंस्था विकसित केली पाहिजे. भारत हे काम प्रत्यक्षात करत आहे. म्हणूनच काही देशांसोबत युरेनियमसाठी, तर इतरांसोबत महत्त्वपूर्ण खनिजे आणि दुर्मिळ मृदा खनिजांसाठी करार केले जात आहेत. देशातील युवा वर्गाचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी हे सर्व प्रयत्न केले जात आहेत. जगाच्या गरजा बदलत आहेत आणि त्याचबरोबर आपल्या शिक्षण पद्धतीही बदलत आहेत. त्यामुळे भारत आपले शिक्षण धोरण, अध्यापन आणि प्रशिक्षण संस्थांना नव्याने आकार देत आहे.

मालवाहतूक कॉरिडॉरची ठळक वैशिष्ट्ये

मुंबईतील जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणापासून (JNPT) वडोदरापर्यंत एक दुमजली कंटेनर मालगाडी चालवण्यात आली आहे. याचा अर्थ, एका डब्यावर दुसरा डबा ठेवून ही मालगाडी चालवण्यात आली. या मालगाडीने मुंबई ते वडोदरा दरम्यान एकाच वेळी 250 पेक्षा जास्त ट्रकमध्ये मावेल इतका माल वाहून नेला. या 326 किलोमीटर लांबीच्या कॉरिडॉरचे तीन विभाग 20,700 कोटी रुपये खर्च करून विकसित करण्यात आले आहेत. ■

राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेत्यांना पंतप्रधान मोदींचा मंत्र

खरी क्षमता...
ज्ञानातून जागृती, आणि जागृतीतून बदल

शिक्षक केवळ पुस्तकी धडे शिकवत नाहीत, ते जगण्याचे धडे देतात आणि प्रगती करायला शिकवतात. शिक्षक दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 5 सप्टेंबर रोजी लोक कल्याण मार्गावरील आपल्या निवासस्थानी राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेत्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विजेत्यांचे अनुभव, नवनवीन कल्पना आणि मुलांच्या भविष्याबद्दलचे महत्त्वाचे विचार जाणून घेतले. या संवादादरम्यान ते म्हणाले की मुलांच्या जीवनात शिक्षकांची भूमिका अधिकाधिक महत्त्वाची होते आहे.

मुलांमधील प्रतिभा ओळखण्यापासून ते त्यांची जिज्ञासा, सर्जनशीलता आणि बालपण जोपासण्यापर्यंत, शिक्षकांची भूमिका वर्गाच्या पलीकडेही कायम राहते. हे लक्षात घेत, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेत्यांची भेट घेतली, तेव्हा ते म्हणाले की बालपणातील निरागसता जतन करणे ही एक महत्त्वाची भूमिका आहे आणि शिक्षक ही भूमिका बजावू शकतात. ते म्हणाले की मुलांमध्ये एक समान मूलभूत स्वभाव आणि जिज्ञासा असते. शिक्षकांनी या जिज्ञासेला प्रोत्साहन देऊन तिला योग्य दिशा दिली, तर ते मुलांच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात.

योग्य वेळी मार्गदर्शन करू शकतात शिक्षक

शिक्षकाचे काम केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापुरते मर्यादित नाही, बालपणाला योग्य मार्गदर्शनही करणेसुद्धा त्यांचे काम आहे. शिक्षक दिनानिमित्त हा संवाद साधत असताना, विशेषतः स्क्रीनचे व्यसन आणि अंमली पदार्थांच्या सेवनाच्या वाढत्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर, मुलांचे वर्गाबाहेरचे जीवन समजून घेण्याच्या महत्त्वावर पंतप्रधान मोदींनी भर दिला. खेळ, सर्जनशीलता आणि समन्वित सहभागामुळे मुलांमध्ये चांगल्या सवयी आणि छंद निर्माण होऊ शकतात. एक दक्ष शिक्षक बालकांच्या वर्तनातील लहान बदल ओळखू शकतो आणि वेळेवर मार्गदर्शन करू शकतो.

मुलांमध्ये श्रमप्रतिष्ठेसारखी मूल्ये रुजवण्यासाठी मदत करा

राष्ट्रीय शिक्षण धोरणावर चर्चा करताना, पंतप्रधानांनी मुलांना वर्गाबाहेर नेऊन त्यांना वास्तविक जगातील कौशल्ये आणि विविध प्रकारच्या कामांमध्ये गुंतवण्याच्या महत्त्वावर भर दिला. त्यांनी शिक्षकांना केवळ अभ्यासक्रमाचे ज्ञान देण्यापुरते मर्यादित न राहता, मुलांमध्ये श्रमप्रतिष्ठेसारखी मूल्ये रुजवण्यासाठी मदत करण्याचे आवाहनही केले.





राष्ट्रपतींनी शिक्षकांना प्रदान केले राष्ट्रीय पुरस्कार

शिक्षक दिनानिमित्त 5 सप्टेंबर 2026 रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नवी दिल्ली येथे आयोजित एका समारंभात देशभरातील शिक्षकांना राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केले. आपल्या भाषणात राष्ट्रपती म्हणाल्या की आपल्या संविधानात नमूद केलेल्या 'समान संधी' या आदर्शाची पूर्तता करण्यासाठी शिक्षण हे सर्वात प्रभावी साधन आहे. प्राथमिक शाळांमधील गळतीचे प्रमाण नगण्य पातळीवर आणण्याचे यश शिक्षकांच्या प्रयत्नांतून साध्य झाले आहे. या राष्ट्रीय कामगिरीबद्दल त्यांनी सर्व शिक्षकांची प्रशंसा केली. देशाच्या विकासासाठी शैक्षणिक उत्कृष्टता, कौशल्य विकास आणि उद्योजकता महत्त्वपूर्ण आहेत. भारताला ज्ञान महासत्ता आणि जागतिक कौशल्य केंद्र म्हणून स्थापित करणे हे आमच्या राष्ट्रीय प्राधान्यक्रमांपैकी एक आहे, असेही त्यांनी सांगितले.

बदलाची सुरुवात

काही संवाद केवळ शब्द नसतात; ते बदलाची सुरुवात बनतात. एका शिक्षिकेने स्वच्छता आणि स्तनाच्या कर्करोगाविषयीची जागरूकता शिक्षणापलीकडे समाजापर्यंत पोहोचवण्याच्या आपल्या उपक्रमाबद्दल सांगितले. पंतप्रधान मोदींनी काशीतील स्तनाच्या कर्करोगाविषयीच्या जागरूकता मोहिमेची आठवण करून दिली, आणि या जागरूकतेमुळे अधिक महिलांना पुढे येऊन तपासणी करून घेण्याचे धैर्य दाखवण्यास प्रोत्साहन मिळाले असे त्यांनी नमूद केले. ज्ञानाचे जागृतीत रूपांतर करणे आणि जागृतीमधून परिवर्तन घडवणे, हीच शिक्षकाची खरी ताकद आहे.

प्रभावी वक्तृत्वाचा मंत्र - आत्मविश्वास + सराव

एका शिक्षकाने स्पष्ट केले की एक चांगला वक्ता होण्यासाठी आत्मविश्वास आणि सततचा सराव आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लगेचच एक विनोदी प्रश्न विचारला: "हा आत्मविश्वास येतो कुठून?" त्यानंतर संभाषणाला एक वेगळेच वळण मिळाले आणि संपूर्ण संभाषण हास्याने भरून गेले. अध्ययनाला हास्याची जोड देणे, हा बरेचदा शिकण्याचा सर्वात अविस्मरणीय मार्ग असतो.

82 शिक्षक आणि शिक्षणतज्ञांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान

यावर्षी, तीन विभागांतील 82 शिक्षक आणि शिक्षणतज्ञांची राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागातील 48 शिक्षक, उच्च शिक्षण संस्था आणि पॉलिटेक्निकमधील 21 शिक्षक/प्राध्यापक, तर कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयातील 13 कौशल्य प्रशिक्षकांचा समावेश आहे. पुरस्कार विजेत्यांनी आपले अध्यापनाचे अनुभव आणि नवनवीन कल्पनांबद्दल माहिती दिली. वर्गातील अध्यापन अधिक मनोरंजक आणि प्रभावी करण्यासाठी त्यांनी अवलंबलेल्या अनेक सर्जनशील पद्धतींबद्दलसुद्धा त्यांनी माहिती दिली. ■



मंत्रिमंडळ निर्णयांबाबतची पत्रकार परिषद पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय

रेल्वे जोडणीचा विस्तार

ईपीएफओची वेतन मर्यादा आता ₹25,000

केंद्र सरकार देशाच्या विकासासाठी आणि रेल्वे जोडणीच्या विस्तारासाठी कटिबद्ध असून या दिशेने सातत्याने कार्यरत आहे. या संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने नऊ राज्यांमध्ये पसरलेल्या आठ मल्टी-ट्रॅक प्रकल्पांच्या प्रस्तावांना मंजुरी दिली. या प्रकल्पांमुळे केवळ कनेक्टिव्हिटी आणि लॉजिस्टिक्सची कार्यक्षमता सुधारणार नाही, तर तेलाची आयात 200 दशलक्ष लिटरने कमी होईल. यामुळे रोजगाराच्या आणि पर्यटनाच्या नवीन संधी निर्माण होतील. याव्यतिरिक्त, ईपीएफओची वेतन मर्यादा आता ₹25,000 करण्यासही मंजुरी देण्यात आली आहे....

निर्णय : तामिळनाडू, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणामधील 17 जिल्ह्यांमध्ये पसरलेल्या पाच मल्टी-ट्रॅक प्रकल्पांना मंजुरी.

परिणाम: भारतीय रेल्वेचे सध्याचे जाळे अंदाजे 540 किलोमीटरने विस्तारले जाईल. या प्रकल्पांचा एकूण अंदाजे खर्च 10021 कोटी रूपये असून ते 2029-30 पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

- मार्गाच्या वाढलेल्या क्षमतेमुळे वाहतुकीत लक्षणीय सुधारणा होईल, परिणामी भारतीय रेल्वेची परिचालन कार्यक्षमता आणि सेवेची विश्वसनीयता वाढेल.
- या मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्पांमुळे कामकाज सुव्यवस्थित होईल आणि गर्दी कमी होईल.

या प्रकल्पांमध्ये खालील बाबींचा समावेश आहे:

- अरक्कोनम - अराक्कोनम-रेनिगुंटा तिसरा आणि चौथा मार्ग - 77 किमी
- व्हाईटफील्ड-बंगारपेट तिसरा आणि चौथा मार्ग - 47 किमी
- होसूर-ओमलूर दुहेरीकरण - 147 किमी
- सेलम-करूर-दिंडीगुल दुहेरीकरण - 159 किमी
- सिकंदराबाद (घाटकेसर) ते काझीपेट पर्यंत 110 किमी मल्टी-ट्रॅकिंग

10000 कोटी रूपयांपेक्षा जास्त खर्चाचे 5 मुख्य रेल्वे प्रकल्प. दक्षिण भारतातील सुधारित रेल्वे कनेक्टिव्हिटी. लाखो लोकांना फायदा होईल. मंत्रिमंडळाच्या निर्णयामुळे प्रवाशांची जलद वाहतूक, अधिक मजबूत संपर्क व्यवस्था आणि अतिरिक्त मालवाहतूक क्षमता सुनिश्चित होईल.

– नरेंद्र मोदी
पंतप्रधान



निर्णय : पश्चिम बंगाल, झारखंड, ओदिशा, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या 5 राज्यांतील 14 जिल्ह्यांना सामावून घेणाऱ्या तीन बहुपदरी रेल्वे प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली.

परिणाम : भारतीय रेल्वेच्या सध्याच्या जाळ्यामध्ये सुमारे 656 किलोमीटरची भर पडेल. या प्रकल्पांचा एकूण अंदाजित खर्च 10,783 कोटी आहे. हे प्रकल्प 2029-30 पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

- रेल्वे मार्गांची क्षमता वाढल्यामुळे वाहतुकीत लक्षणीय सुधारणा होईल. त्यामुळे भारतीय रेल्वेची कार्यक्षमता आणि सेवांची विश्वासार्हता वाढेल.
- या बहुपदरी रेल्वे प्रकल्पांमुळे रेल्वे वाहतूक अधिक सुरळीत होईल आणि गर्दी तसेच वाहतूक कोंडी कमी होईल.
- प्रस्तावित बहुपदरी प्रकल्पांमुळे सुमारे 4,790 गावांना चांगली संपर्क व्यवस्था उपलब्ध होईल. याचा फायदा सुमारे 56 लाख लोकसंख्येला होईल.
- रेल्वे मार्ग क्षमतेतील प्रस्तावित वाढीमुळे देशभरातील अनेक प्रमुख पर्यटनस्थळांपर्यंतची रेल्वे संपर्क व्यवस्था अधिक चांगली होईल.

या प्रकल्पांमध्ये खालील मार्गांचा समावेश आहे:

1. खरगपूर-झारसुगुडा (बागदेही) चौथी मार्गिका
2. कटनी-पेंड्रा रोड चौथी मार्गिका
3. बिलासपूर (उसलापूर)-पेंड्रा रोड तिसरी मार्गिका

51 लाखांपेक्षा जास्त कर्मचाऱ्यांना होणार फायदा

निर्णय : कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेची (ईपीएफओ) वेतन मर्यादा दरमहा 15,000 वरून 25,000 करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

परिणाम : हा निर्णय औपचारिक अर्थव्यवस्थेला चालना देणारा असून, भारताचे दीर्घकालीन सामाजिक सुरक्षा उद्दिष्ट पुढे नेणारा आहे. समावेशक, मजबूत आणि भविष्यासाठी सज्ज सामाजिक सुरक्षा व्यवस्था निर्माण करण्याच्या दिशेने हे आणखी एक महत्त्वाचे पाऊल आहे. देश 'विकसित भारत @ 2047' या संकल्पाकडे वाटचाल करत असताना, आर्थिक विकास, वाढती मजुरी आणि औपचारिक क्षेत्रातील रोजगाराच्या विस्ताराबरोबर सामाजिक सुरक्षेची व्याप्तीही वाढेल, याची खात्री हा निर्णय देत आहे.

- हा निर्णय 17 सप्टेंबर 2026 रोजी विश्वकर्मा दिवस आणि सेवा दिवस यांच्या निमित्ताने लागू करण्यात येईल.
- यामुळे कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी बचत, निवृत्ती वेतन आणि विमा संरक्षण यांचा लाभ मिळेल.
- कामगार कायद्याअंतर्गत सर्व कर्मचाऱ्यांना सामाजिक सुरक्षा पुरवण्याच्या दिशेने हे एक मोठे पाऊल आहे.
- यामुळे सामाजिक सुरक्षेसोबतच रोजगाराचे औपचारिकीकरण (कामगारांना अधिकृत रोजगार व्यवस्थेत आणणे) करण्यालाही प्रोत्साहन मिळेल.
- 51 लाखांहून अधिक कर्मचारी, ईपीएफओच्या भविष्य निर्वाह निधी योजनेच्या अनिवार्य कक्षेत येतील.
- सरकारच्या सध्याच्या 10,250 कोटी वार्षिक सरकारी खर्चाच्या तुलनेत आता दरवर्षी सुमारे 11,339 कोटी खर्च होण्याचा अंदाज आहे.
- पाच वर्षांत अंदाजित खर्च सुमारे 56,696 कोटी आहे.
- 2004 ते 2014 या दशकात ईपीएफओ अंतर्गत वेतन मर्यादेत कोणताही बदल करण्यात आला नव्हता. सप्टेंबर 2014 मध्ये ही मर्यादा वाढवून 15,000 करण्यात आली.
- या मंजुरीमुळे अधिक कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीतील बचत, कर्मचारी पेन्शन योजना (ईपीएस) अंतर्गत निवृत्ती वेतन आणि विमा संरक्षणाचा लाभ मिळू शकेल.
- कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी आणि निवृत्तीवेतनासाठीचे अनिवार्य योगदान तसेच त्यांच्या सध्याच्या वेतनानुसार त्यांचे निवृत्तीवेतनपात्र वेतन निश्चित करण्यास मदत होईल.

कॅबिनेटच्या निर्णयांवरील पत्रकार परिषद पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.





आंतरराष्ट्रीय अंतराळ शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संबोधन

अंतराळ संशोधनाचा मंत्र संघर्ष नाही, सहकार्य !

मानवाच्या कल्पकतेला आणि कल्पनाशक्तीला शतकानुशतके प्रेरणा देणारे अंतराळ आज पृथ्वीवरील हवामान, शेती, महासागर आणि मानवी जीवनालाही आकार देत आहे. अंतराळातील अमर्याद शक्यतांवर चर्चा करण्यासाठी 10 सप्टेंबर रोजी पॅरिस येथे पहिली 'आंतरराष्ट्रीय अंतराळ शिखर परिषद' आयोजित करण्यात आली होती. या परिषदेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून संबोधित केले. ते म्हणाले, अंतराळातील शक्यता अनंत आहेत आणि त्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे...


भारताचा दृष्टिकोन 'वसुधैव कुटुंबकम्' या तत्त्वावर आधारित आहे. याचा अर्थ 'एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य' असा होतो. या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, ही भावना आता पृथ्वीच्या पलीकडे अंतराळापर्यंतही घेऊन जाण्याची गरज आहे. भारत आंतरराष्ट्रीय कायदे, संवाद आणि बहुपक्षीय सहकार्याच्या आधारावर सुरक्षित, शांततापूर्ण आणि शाश्वत अंतराळ क्षेत्राचे समर्थन करतो. वैज्ञानिक माहितीचा उपयोग, प्रामाणिकपणे आणि पारदर्शकतेने, जनहितासाठी केला पाहिजे. ते पुढे म्हणाले की, अंतराळातील कक्षांमध्ये गर्दी वाढत असताना, तंत्रज्ञान अधिक प्रगत होत असताना आणि अंतराळ क्षेत्रात सहभागी होणाऱ्या देशांची संख्या वाढत असताना, आपली भूमिका स्पष्ट असली पाहिजे. संघर्षाऐवजी सहकार्याला, अल्पकालीन फायद्यांऐवजी शाश्वततेला आणि समावेशकतेला प्राधान्य दिले पाहिजे.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

अंतराळ क्षेत्रात भारताची भरीव कामगिरी

- चंद्रयान-3 मुळे भारत चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ उतरणारा जगातला पहिला देश ठरला.
- आदित्य-एल 1 सूर्याच्या रहस्यांचा शोध घेत आहे. गेल्या वर्षी एका भारतीय अंतराळवीराने आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला भेट दिली.
- भविष्यातील आपली उद्दिष्टे 2035 पर्यंत एक भारतीय अंतराळ स्थानक स्थापन करणे आणि 2040 पर्यंत चंद्रावर भारतीय अंतराळवीर पाठवणे, ही आहेत.
- 34 देशांचे 430 पेक्षा जास्त उपग्रह भारतीय प्रक्षेपकां (रॉकेट्स) द्वारे अंतराळात सोडण्यात आले आहेत.
- इस्रोचे तंत्रज्ञान आणि भागीदारी केवळ भारतासाठीच नव्हे तर संपूर्ण जगासाठी उपयुक्त ठरत आहेत.

> *आपण सर्वजण मिळून संपूर्ण मानवजातीसाठी आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी अंतराळाचा शोध घेऊ, एकत्र येऊन नवनिर्मिती करू आणि एकत्रितपणे अंतराळाचे रक्षण करू.*
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**





'नशामुक्त भारत'

हा संकल्प 2029 पर्यंत होणार साकार

नार्कोटिक्स अर्थात मादक/अंमली पदार्थांचा व्यापार हा असा गुन्हा आहे, जो येणाऱ्या पिढ्या नष्ट करू शकतो. या माध्यमातून मिळणाऱ्या पैशांचा वापर दहशतवादी कारवायांसाठी म्हणजेच नार्को-टेररिझमसाठीही केला जातो. नार्को-टेरर हे प्रारुप जगातील अनेक देशांमध्ये सक्रिय आहे आणि आज संपूर्ण जग या समस्येचा सामना करत आहे. याच पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने 2019 पासून मादक पदार्थांच्या तस्करीला आळा घालण्यासाठी ठोस व्यवस्था उभारली आहे. केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी 6 सप्टेंबर रोजी गोव्यातील पणजी येथे जाहीर केले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली 2029 पर्यंत 'नशामुक्त भारत'चे उद्दिष्ट साध्य केले जाईल.

देशभरात अंमली पदार्थांविरुद्ध सुरू असलेल्या मोहिमेसाठी 2026 ते 2029 या कालावधीसाठी एक विशेष मार्गदर्शक कृती आराखडा (रोडमॅप) तयार करण्यात आला आहे. या रोडमॅपअंतर्गत सर्व संबंधित विभाग आणि सर्व राज्य सरकारांना एकत्र आणून भारतातील प्रत्येक गाव आणि शहर अंमली पदार्थमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पणजी येथे आयोजित पत्रकार परिषदेत गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, 2014 च्या आधी मादक पदार्थांविरोधातील कारवाई मर्यादित स्वरूपात केली जात होती. किरकोळ प्रमाणात मादक पदार्थ जप्त करून आणि लहान आरोपींना पकडून कारवाई केली जात होती. मात्र, 2019 पासून मादक पदार्थांविरोधातील लढ्याला राष्ट्रीय सुरक्षा म्हणून प्राधान्य देण्यात आले आहे.

अंमली पदार्थांविरोधातील ही लढाई आता केवळ फाइल्स किंवा विविध संस्थांच्या स्वतंत्र कारवायांपुरती मर्यादित राहिलेली नाही. ती राष्ट्रीय स्तरावरील समन्वित आणि सातत्याने सुरू असलेली मोहीम बनली आहे. ज्याप्रमाणे देशातून नक्षलवाद संपवण्यासाठी प्रभावी पावले उचलली गेली, त्याचप्रमाणे अंमली पदार्थांची समस्या संपवण्याच्या दिशेनेही प्रयत्न सुरू आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितले की, आता अंमली पदार्थांची अगदी छोटी पुडी पकडली गेली, तरी ती देशात कुठून आली, याचा मुळापर्यंत जाऊन तपास केला जातो.

चार स्तंभांवर आधारित रोडमॅप : नशामुक्त भारताचा रोडमॅप चार प्रमुख स्तंभांवर आधारित आहे. इंटेलिजन्स आणि ऑपरेशन आधारित अंमलबजावणी, प्रीकर्सर आणि सिंथेटिक ड्रग्ज नियंत्रण, मागणी आणि हानी कमी करणे, क्षमता निर्माण आणि समन्वय.

तीन वर्षांचा रोडमॅप : 'नशामुक्त भारत' निर्मितीसाठी जुलै 2026 ते जुलै 2029 पर्यंतचा तीन वर्षांचा रोडमॅप तयार आहे.

अंमली पदार्थांवर जप्ती : 2004 ते 2014 या कालावधीत सुमारे 40 हजार कोटी रुपये किमतीचे 26 लाख किलोग्रॅम अंमली पदार्थ जप्त करण्यात आले. तर 2014 ते 2026 या कालावधीत 1 लाख 89 हजार कोटी रुपये किमतीचे 1 कोटी 19 लाख किलोग्रॅमपेक्षा अधिक अंमली पदार्थ जप्त करण्यात आले.

शपथ प्रदान : 'नशामुक्त भारत' अभियानांतर्गत 25 कोटी नागरिकांशी संपर्क साधून त्यांना नशामुक्तीची शपथ देण्यात आली. तसेच, 5 लाख 70 हजार नागरिकांना नशेच्या व्यसनातून मुक्त करण्यात आले.

व्यसनमुक्ती केंद्रांची संख्या : सामाजिक न्याय विभाग, आरोग्य विभाग आणि कारागृह प्रशासन एकत्र येऊन व्यसनमुक्ती केंद्रांची संख्या 3 पटीने वाढवत असून ती 1,751 केली जात आहे.

मोहीम : आर्थिक गुन्हे, दहशतवाद, अंमली पदार्थांची तस्करी आणि टोळीयुद्धात सहभागी असलेल्या फरार आरोपींविरोधात विशेष मोहीम राबवून, त्यांना भारतात आणून न्यायालयासमोर हजर करण्यात आले आहे.

संकल्प : शिक्षण, युवा आणि क्रीडा मंत्रालय तसेच शैक्षणिक संस्था या शाळा आणि महाविद्यालये 'ड्रग फ्री' म्हणजेच अंमली पदार्थमुक्त करण्याचा संकल्प करत आहेत.

'नशामुक्ती मित्र' निर्मिती : राष्ट्रीय छात्रसेना (एनसीसी), राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) आणि 'माय भारत' यांच्या माध्यमातून लाखो व्यसनमुक्तीचे दूत तयार केले जातील.

तपासाची नवीन संकल्पना : केंद्र सरकारने बॉटम-टू-टॉप आणि टॉप-टू-बॉटम ही तपासाची नवी संकल्पना स्वीकारली आहे. यामध्ये आर्थिक तपास आणि अंमली पदार्थांची अवैध तस्करी प्रतिबंधक कायद्याच्या (पीआयटी-एनडीपीएस) अंमलबजावणीवर विशेष भर दिला जात आहे.

पॅरिसमध्ये स्वामीनारायण मंदिराचे लोकार्पण

भारताचे प्राचीन ज्ञान आणि फ्रान्सच्या आधुनिक अभियांत्रिकीचा संगम

फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये 6 सप्टेंबर रोजी भव्य स्वामीनारायण मंदिराचे लोकार्पण झाले. हे मंदिर भारत आणि फ्रान्समधील सांस्कृतिक संबंधांचे नवे प्रतीक ठरले आहे. पूज्य संत आणि सनातन परंपरेतील श्रेष्ठ व्यक्तींच्या आशीर्वादाने झालेला हा लोकार्पण सोहळा 'वसुधैव कुटुंबकम्' या भावनेचे व्यासपीठही ठरला. मंदिराच्या उद्घाटनप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, हे मंदिर 'मेड इन इंडिया' आणि 'बिल्ट इन फ्रान्स' आहे.

जगातील विविध देशांमध्ये मंदिरांची प्राणप्रतिष्ठा होते, तेव्हा त्याबरोबरच भारताचे प्राचीन विचार आणि मानवी मूल्येही तेथे पोहोचतात. भारताची प्राचीन शिकवण सांगते 'समानं मनः सह चित्तमेषाम्', म्हणजेच आपली मने एकसारखी असोत आणि आपली हृदये एकमेकांशी जोडलेली राहोत. कार्यक्रमादरम्यान आपल्या संबोधनात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, गेल्या काही वर्षांत भारत आणि फ्रान्सचे संबंध नव्या उंचीवर पोहोचले आहेत.

स्वामीनारायण मंदिरे नेहमीच भक्तीसोबत सेवेचेही माध्यम राहिली आहेत आणि हे मंदिरही अशाच सेवाभावाचे केंद्र बनेल. ते म्हणाले की, या मंदिरातून भारतीय संस्कृतीचे जे सूर उमटतील, त्याचा लाभ संपूर्ण युरोपमधील लोकांना होईल, असा मला विश्वास आहे. भविष्यात मला जेव्हा वेळ मिळेल, तेव्हा या मंदिरात दर्शनासाठी येण्याचा मी नक्की प्रयत्न करेन.



पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

सहकार्य आणि शक्यतांचे प्रतीक ठरेल मंदिर

अलीकडच्या काळात भारत आणि फ्रान्समधील संयुक्त उपक्रमांच्या शक्यतांवर मोठ्या प्रमाणावर चर्चा होत असते. पॅरिसमधील स्वामीनारायण मंदिराने या सहकार्याला एक नवा पैलू दिला आहे. हे मंदिर 'मेड इन इंडिया' आणि 'बिल्ट इन फ्रान्स'चे उत्तम उदाहरण आहे. मंदिरातील बहुतांश दगडांचे कोरीव काम भारतात झाले आहे. भारताची प्राचीन कला आणि कारागिरी, तसेच फ्रान्सचे आधुनिक अभियांत्रिकी तंत्रज्ञान यांचा सुंदर संगम या मंदिराच्या उभारणीत पाहायला मिळतो. या दोन्ही देशांच्या सहकार्यामुळे पॅरिसमध्ये हे भव्य मंदिर साकारले आहे. त्यामुळे हे मंदिर भारत आणि फ्रान्समधील सहकार्याच्या नव्या संधींचेही प्रतीक ठरेल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.

विशेष जागतिक धोरणात्मक भागीदारी करत आहेत भारत आणि फ्रान्स


भारत आणि फ्रान्स हे दोन्ही देश एक विशेष जागतिक धोरणात्मक भागीदारी निर्माण करत आहेत. तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि संरक्षणापासून ते अंतराळ आणि हवामानबदल निरसनाच्या कृतीपर्यंत, दोन्ही देश एका नव्या गतीने आणि नव्या ऊर्जेने एकत्र पुढे जात आहेत. दोन्ही देश, 2026 हे वर्ष 'भारत-फ्रान्स नवोन्मेष वर्ष' म्हणून साजरे करत आहेत. भारत-फ्रान्सची ही धोरणात्मक भागीदारी त्यामुळेही विशेष आहे, कारण ती जुन्या सांस्कृतिक आणि राजकीय संबंधांच्या मजबूत पायावर उभी आहे. फ्रान्समध्ये भारतीय सैनिकांच्या बलिदानाचे आजही आदराने स्मरण केले जाते, यासाठी इतिहास साक्षीदार आहे. भाषा आणि साहित्याच्या क्षेत्रातही भारत आणि फ्रान्सचे संबंध जुने आहेत. फ्रेंच विद्वानांनी संस्कृत भाषेचा अभ्यास आणि प्रसार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर फ्रेंच लेखक रोमँ रोलां यांनी केलेल्या लेखनामुळे दोन्ही देशांतील समाज अधिक जवळ आले. तसेच, पॅरिसपासून पुद्दुचेरीतील श्री अरविंद आश्रमापर्यंत 'द मदर' अर्थात श्री माँ यांचा आध्यात्मिक प्रवास भारतीय आणि फ्रेंच साधकांसाठी प्रेरणादायक ठरला आहे.

दोन्ही देशांच्या सांस्कृतिक संबंधांचा एक नवा अध्याय

काही दशकांपूर्वी श्रील प्रभुपाद स्वामी फ्रान्समध्ये आले होते. इस्कॉनच्या माध्यमातून त्यांनी भारत आणि फ्रान्समधील आध्यात्मिक संबंधांचा एक नवा अध्याय सुरू केला. आज योग हे देखील भारत आणि फ्रान्समधील लोकांमधील परस्पर संपर्काचे एक महत्त्वाचे माध्यम बनले आहे.आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयफेल टॉवरसमोर होणारे योगाचे कार्यक्रम, फ्रान्समध्ये योग किती लोकप्रिय आहे, हे दाखवून देतात. आता बीएपीएस या स्वामीनारायण संस्थेच्या भव्य मंदिरामुळे भारत आणि फ्रान्सच्या सांस्कृतिक संबंधांना आणखी एक नवी जोड मिळाली आहे.

> *"हे मंदिर फ्रान्सच्या विविधतेला तर समृद्ध करेलच, शिवाय यामुळे भारत आणि फ्रान्सच्या सांस्कृतिक संबंधांना नवी ऊर्जाही मिळेल.*
>
> *-नरेंद्र मोदी, पंतप्रधान*





ज्यांनी खाली पडू दिला नाही राष्ट्रध्वज

एक असे स्वातंत्र्यसैनिक, ज्यांनी इंग्रजांसमोर राष्ट्रध्वज अर्थात तिरंगा जमिनीवर पडू दिला नाही. ध्वजाचे रक्षण करताना त्यांचे प्राण गेले, तरीही त्यांनी तिरंगा हातातून सोडला नाही. देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या या स्वातंत्र्यसैनिकाचे नाव तिरुप्पूर कुमारन. त्यावेळी ब्रिटिश सरकारने भारतीय ध्वजावर बंदी घातली होती. तिरुप्पूर कुमारन यांच्या बलिदानाने केवळ ब्रिटिश सत्तेला विरोध केला नाही, तर देशवासीयांमध्ये एकता, राष्ट्रीय सन्मान आणि धैर्याची भावना जागवली. आजही तिरुप्पूर कुमारन यांचे हे दुर्दम्य धाडस आणि देशभक्ती नागरिकांना प्रेरणा देत आहे.

जन्मः 4 ऑक्टोबर 1904 I मृत्यूः 11 जानेवारी 1932

स्वातंत्र्यसैनिक आणि क्रांतिकारक तिरुप्पूर कुमारन यांचा जन्म 4 ऑक्टोबर 1904 रोजी चेन्नीमलाई येथे झाला. हे ठिकाण सध्या तमिळनाडूच्या ईरोड जिल्ह्यात आहे. देशात स्वातंत्र्याची चळवळ जोर धरू लागली, तसतसे कुमारनही या चळवळीने प्रभावित झाले. महात्मा गांधींच्या विचारांनी आणि आदर्शांनी प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेण्यास सुरुवात केली. 1932 मध्ये गांधीजींनी मुंबईत एका आंदोलनाचे नेतृत्व केले. त्यावेळी ब्रिटिश सरकारने त्यांना अटक करण्याचा निर्णय घेतला. गांधीजींच्या अटकेच्या विरोधात देशभरात निदर्शने झाली. या आंदोलनांमध्ये लोक बंदी असलेला राष्ट्रीय ध्वज अर्थात तिरंगा हातात घेऊन सहभागी होत होते. हा तिरंगा त्यांच्या दृष्टीने राष्ट्रीय सन्मान आणि ब्रिटिश सत्तेविरोधातील निषेधाचे प्रतीक होता. ध्वज धरणाऱ्या आंदोलकांमध्ये तिरुप्पूर कुमारन यांचाही समावेश होता. ब्रिटिश पोलिसांनी आंदोलकांवर लाठीमार केला, तरीही कुमारन तिथून हटले नाहीत. पोलिसांनी कुमारन यांच्यासह इतर आंदोलकांना बेदम मारहाण केली. या मारहाणीत कुमारन खाली कोसळले, मात्र त्यांनी राष्ट्रध्वज जमिनीवर पडू दिला नाही. ध्वज हातात घट्ट धरून ठेवत त्यांनी देशासाठी प्राण दिले. गंभीर दुखापतीमुळे 11 जानेवारी 1932 रोजी या 27 वर्षीय स्वातंत्र्यसैनिकाचे निधन झाले.

'कोडी काथा कुमारन', म्हणजेच 'तिरंग्याचे रक्षण करणारे कुमारन' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या तिरुप्पूर कुमारन यांचा वारसा देशभक्ती आणि अन्यायाविरुद्धच्या ठाम लढ्याची प्रेरणा देतो. शेवटच्या क्षणीही तिरंगा हातातून न सोडण्याची त्यांची जिद्द आपल्याला आठवण करून देते की, अशा असंख्य स्वातंत्र्यसैनिकांच्या धैर्य, त्याग आणि मातृभूमीवरील अपार प्रेमातून देशाला स्वातंत्र्य मिळाले आहे. तिरुप्पूर कुमारन यांचे बलिदान आजही प्रत्येक पिढीला राष्ट्रध्वजाचे संरक्षण करण्याची, कष्टाने मिळवलेल्या स्वातंत्र्याचे महत्त्व जाणून घेण्याची आणि निष्ठा आणि त्यागातून देशसेवा करण्याची प्रेरणा देते.

पदभार स्वीकारल्यानंतर तामिळनाडूच्या पहिल्या दौऱ्यावर कोइम्बतूर येथे गेलेल्या उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी तिरुप्पूर कुमारन यांच्या पुतळ्याला पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 4 ऑक्टोबर 2025 रोजी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील महान स्वातंत्र्यसैनिक तिरुप्पूर कुमारन यांना त्यांच्या जयंतीनिमित्त भावपूर्ण आदरांजली अर्पण केली. या वेळी पंतप्रधान म्हणाले की, आज आपण भारतमातेचे महान सुपुत्र तिरुप्पूर कुमारन यांचे स्मरण करून त्यांना वंदन करत आहोत. तिरुप्पूर कुमारन हे तमिळनाडूच्या महान भूमीतील थोर स्वातंत्र्यसैनिक होते. भारताच्या स्वातंत्र्यासाठी आणि देशात राष्ट्रभावना जागृत करण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य समर्पित केले. हातात राष्ट्रध्वज घेऊन त्यांनी देशासाठी बलिदान दिले आणि दुर्दम्य धैर्य आणि निःस्वार्थ त्यागाचा आदर्श देशासमोर ठेवला. तिरुप्पूर कुमारन यांचे योगदान देशाच्या इतिहासात सर्वांच्या सदैव स्मरणात राहील. त्यांचे बलिदान आपल्याला ब्रिटिश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळवण्यासाठी असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी केलेल्या संघर्षाची आणि सोसलेल्या यातनांची आठवण करून देते. त्यांचे योगदान आपणा सर्वांना देशाच्या विकासासाठी आणि एकतेसाठी कार्य करण्याची प्रेरणा देत राहो. ■



PMO India ✓
@PMOIndia

आज जग एका मोठ्या उलथापालथीच्या टप्प्यातून जात आहे. जगातील अनेक भागांमध्ये संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली आहे.
अन्न, इंधन किंवा पुरवठा साखळी - प्रत्येक क्षेत्रात अनिश्चितता आहे.
या आव्हानात्मक वातावरणातही भारताच्या अर्थव्यवस्थेने आपला वेग कायम ठेवला आहे.
मागील तिमाहीत आपण 7.8 टक्क्यांची वाढ नोंदवली आहे.

आज भारताची विकासगाथा जगासाठी विश्वास आणि नवीन संधींचा स्रोत बनत आहे. PM @narendramodi



Rajnath Singh ✓
@rajnathsingh

स्वावलंबन म्हणजे केवळ शस्त्रे आणि उपकरणे स्वतः तयार करणे नव्हे. ते आपल्या विचारांचा, व्यक्तिमत्त्वाचा आणि आत्मविश्वासाचा भाग असायला हवे. ज्या देशाकडे स्वतःचे तंत्रज्ञान असते, त्या देशाकडे स्वतःचे भविष्य घडवण्याची ताकदही असते.



Amit Shah ✓
@AmitShah

लोकशाहीत सरकारने केलेली कामे आणि जनतेपर्यंत ती पोहोचवल्यानंतर होणारा परिणाम हेच सर्वात मोठे प्रमाणपत्र असते. गेल्या 25 वर्षांत जनतेने नरेंद्र मोदी यांना दिलेला जनादेश हा याच विश्वासाचे प्रतिबिंब आहे.
#SevaSankalpAbhiyan



Nitin Gadkari ✓
@nitin_gadkari

ग्लोबल साऊथच्या भविष्याला आकार देणारा क्षण!

भारत 18 व्या ब्रिक्स शिखर परिषदेचे यजमानपद भूषवण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहे. यामध्ये 11 देश, जगातील 49% लोकसंख्या आणि जागतिक जीडीपीचा 40% भाग एकत्र येत आहे.
#BRICS2026 #BRICSIndia2026



Shivraj Singh Chouhan ✓
@ChouhanShivraj

यशस्वी पंतप्रधान श्री @narendramodi जी यांच्या नेतृत्वाखाली आपले सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने काम करत आहे. शेतकरी दिवस-रात्र मेहनत करतो, अशा वेळी त्याला जर बनावट किंवा निकृष्ट दर्जाचे बी-बियाणे आणि खत मिळाले तर त्याच्या सर्व मेहनतीवर पाणी फिरते.

म्हणूनच बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांविरुद्ध कठोर कायदा आणण्याच्या दिशेने आपण पुढे जात आहोत. 10 सप्टेंबर रोजी देशभरातील शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेऊन प्रस्तावित बियाणे कायद्यावर (सीड ॲक्ट) त्यांचे म्हणणे ऐकून घेऊ आणि त्यांच्या सूचना घेऊ.

शेतकऱ्याला चांगल्या दर्जाचे बी-बियाणे मिळावे आणि बनावट बियाणे विकून त्याचे नुकसान करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी; हाच आमचा संकल्प आहे.



Kiren Rijiju ✓
@KirenRijiju

हॅलो इंडिया! भारताशी जोडले जातेय जग.
उझबेकिस्तानपासून दक्षिण आफ्रिकेपर्यंत आणि बेलारुसपासून व्हिएतनाम आणि युगांडापर्यंत प्रत्येक देशात भारताबद्दलचा आपलेपणा आणि आदर दिसून आला. नवी दिल्लीत ब्रिक्सच्या व्यासपीठावर विविध देशांबरोबर 'वसुधैव कुटुंबकम्' या भावनेचे सुंदर दर्शन घडले.



भारतीय कूटनीति की बड़ी जीत : ब्रिक्स का दिल्ली घोषणापत्र जारी...पहलगाम आतंकी हमले की एक सुर में निंदा

युद्ध-टैरिफ थोपने व आतंक के खिलाफ एकजुट

अमेरिका और इस्राइल का नाम लिए बगैर फलस्तीन के हक की बात भी

डब्ल्यूटीओ के नियम माने जाएं : जबरन लगाए आर्थिक प्रतिबंध स्वीकार्य नहीं



ब्रिक्स सम्मेलन के पहले दिन पीएम मोदी, पुतिन व शिनपिंग की यह गर्मजोशी सबसे ज्यादा चर्चा में रही। ट्विटर

किसने क्या कहा...

अब दुनिया के नियम ब्रिक्स देश बनाएं : मोदी

- सुधार का 10 सूत्रीय रोडमैप

चीन : जिनपिंग बोले-
आंतरिक मामलों में दूसरों के दखल का विरोध करना चाहिए

ईरान : पेजेश्कियान बोले-
पश्चिम एशिया को अमेरिकी पुलिसगीरी की जरूरत नहीं

विरोधाभासों का पितामह नहीं, साझेदारी का मंच

सहमति के लिए तड़के 4 बजे तक चला विमर्श

शी की सहमति : पाकिस्तान पर परोक्ष प्रहार

केंद्र ने कैबिनेट बैठक में आठ रेल परियोजनाओं को मंजूरी दी

फैसला : दबाव वाले रेलवे कॉरिडोर चार लेन के होंगे



कैबिनेट बैठक के बाद इंफाल को रेलमार्ग की जानकारी देते रेल मंत्री अश्विनी वैष्णव। • एजेंसी

कहां क्या काम

- अलकनंज–रेमुना खंड (77 किमी: तीसरी, चौथी लाइन
- बथलाघोप–बागपोत रेल खंड (47 किमी: तीसरी, चौथी लाइन
- खानपुर–झारसुगुडा रेल खंड (83 किमी): चौथी लाइन
- खटनी–पैंड्रा रोड: चौथी लाइन
- बिलासपुर (उसलापुर)–पैंड्रा रोड रेल खंड: डीजल लड़ान
- होसूर–ओमलूर रेल खंड (147 किमी): डेडीकेटेड
- सलेम–ऊकर–डिंडीगुल रेल खंड (159 किमी): डीटीकरण
- पाटलेकार से काजीपेट तक (110 किमी): मल्टीट्रेकिंग

इन परियोजनाओं से बेहतर संपर्क, त्वरित आवाजाही, लागत में कमी सुनिश्चित होगी। इससे लाखों लोगों को फायदा होगा। दूसरों की क्षमता बढ़ेगी। -नरेंद्र मोदी, प्रधानमंत्री

20 हजार करोड़ रुपये से अधिक इन प्रोजेक्ट पर खर्च किए जाएंगे

1200 किलोमीटर की पटरियां से वृद्धि होगी रेल नेटवर्क में

ये फायदे भी होंगे

- कोयला, सीमेंट, लौह और स्टील परिवहन के लिए अलग इस मार्ग में हर साल 2.7 करोड़ टन अतिरिक्त माल की ढुलाई होगी।
- अमलगेटल, काकनाद टाइगर रिजर्व, एकम्बा नालमाड मंदिर, अलनाथपुरी जैसे पर्यटनस्थलों।

मई-जून तक बुलेट ट्रेन का परीक्षण संभव

रेल मंत्री अश्विनी वैष्णव ने बुलेट ट्रेन प्रोजेक्ट पर कहा, देश में जिस तरह की जो रही हार्ड- भारत ट्रेन अगले सत्र मई-जून तक परीक्षण के लिए तैयार हो जाएगी। 100 किलोमीटर 488 में सेवा अगस्त से शुरू होगी।

ये परियोजनाएं सरकार के न्यू इंडिया के विजन के अनुरूप हैं। इससे व्यापक विकास की बड़ावा मिलेगा, जिससे लोगों के लिए रोजगार और स्वरोजगार के अवसर बढ़ेंगे। - अश्विनी वैष्णव, रेलमंत्री

प्रौद्योगिकी व दुर्लभ खनिजों का हथियारों के तौर पर इस्तेमाल खतरनाक : मोदी



भारत मंडपम में ब्रिक्स शिखर सम्मेलन के सत्र को संबोधित करते हुए प्रधानमंत्री नरेंद्र मोदी • पी.टी.आई

- ब्रिक्स शिखर सम्मेलन के उद्घाटन सत्र में प्रधानमंत्री ने कहा - इनका गलत इस्तेमाल वैश्विक स्थिरता के लिए होगा बड़ा खतरा
- चीन के लक्ष्मण के दौरान द्विपक्षीय भी मौजूद थे प्रधानमंत्री मोदी और राष्ट्रपति शी जिनपिंग की मुलाकात
- ब्रिक्स देशों के लिए 21वीं सदी की बड़ी चुनौती है आतंकवाद : मोदी

दुनिया में कोई भी संकट एक क्षेत्र तक सीमित नहीं

पीएम मोदी ने सत्र के दूसरे में कहा जलवायु बड़ा संकट है और हमारा सौर अभियान मोदी के जीवन का एक हिस्सा है। व्यापारिक, व्यावसायिक आयकर और आतंकी फंडिंग से आई कमाओं ने चिंताओं है कि एक-दूसरे का बिना दुनिया में कोई संकट किसी एक क्षेत्र तक सीमित नहीं रहा। हमारा दृष्टिकोण भी समान होना चाहिए। उन्होंने कहा कि हमें एक-दूसरे का सम्मान करना चाहिए। एक-दूसरे की संप्रभुता और अखंडता का सम्मान करना चाहिए। हमें एक-दूसरे के आंतरिक मामलों में हस्तक्षेप नहीं करना चाहिए। हमें एक-दूसरे के हितों का सम्मान करना चाहिए। हमें एक-दूसरे के विकास पथ का सम्मान करना चाहिए।

पीएम मोदी ने दी देशवासियों को शुभकामनाएं, राष्ट्र के प्रगति की कामना की

'गणपति बप्पा मोरया' के जयकारों के बीच विराजे भगवान श्री गणेश

नई ऊर्जा और उत्साह का संचार हो: पीएम मोदी



देशवासियों पर कृपा बनाए रखें: नवीन











20 साल का हुआ 21 देशों का ब्रिक्स




डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती

15 ऑक्टोबर रोजी देशाकडून कृतज्ञतापूर्वक अभिवादन

ज्यांच्या शब्द-विचारांमध्ये दिसला भविष्यातील भारत

21 व्या शतकात ऊर्जेची आणि पाण्याची वाढती मागणी ही आपल्या जीवनावर परिणाम करणाऱ्या प्रमुख आव्हानांपैकी एक असेल.

आता नद्या जोडण्याच्या योजनेची पूर्ण गांभीर्याने आणि वेगाने अंमलबजावणी करण्याची वेळ आली आहे.



ऊर्जा क्षेत्रात स्वावलंबी होणे, याला देशाचे सर्वोच्च आणि सर्वात महत्त्वाचे प्राधान्य असायला हवे.

आपले ध्येय असा देश घडवण्याचे असावे, जो समृद्ध आणि आनंदी तर असेलच, पण त्याचबरोबर पूर्णपणे सुरक्षितही असेल.

कोणत्याही बाह्य आक्रमणापासून देशाचे कायम संरक्षण झाले पाहिजे. भविष्यात अंतराळातून होणाऱ्या कोणत्याही आक्रमणापासूनही देशाचे रक्षण करता आले पाहिजे.

भविष्यातील भारताची तयारी कशी असावी, आव्हानांसाठी भारत सज्ज राहावा. वर नमूद केलेले विचार भारताच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या, विज्ञान, संरक्षण आणि तांत्रिक नवोन्मेषाच्या माध्यमातून देशाला सक्षम बनवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भारताच्या माजी राष्ट्रपतींचे, डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचे आहेत. आज देश या विचारांच्या दिशेने ठोसपणे वाटचाल करत आहे. 'इंडिया 2020: ए व्हिजन फॉर द न्यू मिलेनियम' या पुस्तकातून, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी भविष्यातील भारताचे जे स्वप्न मांडले होते, त्याच विचारांना पुढे नेत भारत आज विकसित राष्ट्र बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.



डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांना त्यांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी नमस्कार. एक द्रष्टे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचे सदैव स्मरण केले जाते. त्यांनी देशातील नागरिकांना मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्याची प्रेरणा दिली. त्यांचे जीवन आपल्याला शिकवते की, यशासाठी नम्रता आणि अथक परिश्रम अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांनी ज्याचे स्वप्न पाहिले त्या सशक्त, आत्मनिर्भर आणि करुणाकर भारताच्या निर्मितीसाठी आपण सतत प्रयत्न करत राहूया. **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

न्यू इंडिया समाचार
पाक्षिक

आर.एन.आय, DELHIN/2020/78812, 1-15 ऑक्टोबर, 2026
आरएनआय DELHIN/2020/78812 (प्रकाशन दिनांक- 22 सप्टेंबर 2026, एकूण पृष्ठे-64)

मुख्य संपादक
धीरेन्द्र ओझा, प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

प्रकाशक
कंचन प्रसाद
महासंचालक, केंद्रीय संचार ब्यूरो

खोली क्रमांक-278, केंद्रीय संचार ब्यूरो,
सूचना भवन, दुसरा मजला,
नवी दिल्ली- 110003 येथून प्रकाशित